**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९२/०२**

**श्री. दत्तात्रेय कोलेकर,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.१३८, नव तरुन नाईक नगर,**
**रहिवासी कमेटी, एस.एम.रोड,**
**ॲन्टॉप हिल चर्च, मुंबई- ४०० ०३७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.) मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रकल्प अधिकारी / वरिष्ठ वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.) मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. दत्तात्रेय कोलेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि.१६.२.२००८ रोजी अर्ज करुन, जी/उत्तर विभाग, धारावी येथील अनधिकृत बांधकाम तोडून निष्कासन केलेल्या कारवाईसंबंधीची दि.१.१.२००५ ते ७.२.२००८ या कालावधीतील मनपा डायरी अहवालाची साक्षांकित नक्कल व अनुषंगिक एकूण २९ मुद्दयांबाबतची माहिती मागितली होती.

माहितीपोटी शुल्क प्रति प्रत रु.२/-कार्यालयात भरुन सदर माहिती प्रत्यक्ष प्राप्त करुन घेण्याबाबत दि.११.३.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी मागणी केलेल्या आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रती विहित कालावधीत दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती समाधानकारक असल्याचे निदर्शनास येते असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील निकालात काढले. यामुळे

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, धारावी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जी/उत्तर विभाग, धारावी येथील अनधिकृत बांधकाम तोडून निष्कासन केलेल्या कारवाईसंबंधीची दि.१.१.२००५ ते ७.२.२००८ या कालावधीतील मनपा डायरी अहवालाची साक्षांकित नक्कल व अनुषंगिक एकूण २९ मुद्दयांबाबतची माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधी प्रति प्रत रु.२/-एवढे शुल्क भरुन आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रती प्रत्यक्ष प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. अपिलकार प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने माहितीपोटी आवश्यक ते शुल्क कार्यालयात भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर तात्काळ माहिती द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९३/०२**

**श्री. दत्तात्रेय कोलेकर,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.१३८, नव तरुन नाईक नगर,**
**रहिवासी कमेटी, एस.एम.रोड,**
**ॲन्टॉप हिल चर्च, मुंबई- ४०० ०३७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.) मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रकल्प अधिकारी / वरिष्ठ वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.) मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. दत्तात्रेय कोलेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि.१६.२.२००८ रोजी अर्ज करुन, जी/उत्तर विभाग, धारावी येथील अनधिकृत बांधकाम तोडून निष्कासन केलेल्या कारवाईसंबंधीची दि.१.१.२००५ ते ७.२.२००८ या कालावधीतील मनपा डायरी अहवालाची साक्षांकित नक्कल व अनुषंगिक एकूण २९ मुद्दयांबाबतची माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती प्रश्न स्वरुपाची व मोघमपणे नमूद केलेली आहे. अपिलकारास निश्चितपणे कोणत्या प्रकारची माहिती अभिप्रेत आहे हे समजून येत नाही. स्पष्टपणपे नमूद केल्यास अभिलिखित माहिती देणे सुकर होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.५.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराच्या सुनावणीच्या अपील अर्जावर कलम १९ (१) माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या नियमानुसार रु.२०/- चे मुद्रांक शुल्क नसल्याने ग्राहय धरता येत नाही. असे नमूद करुन अपील अर्ज रद्द करण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय

अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, धारावी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जी/उत्तर विभाग, धारावी येथील अनधिकृत बांधकाम तोडून निष्कासन केलेल्या कारवाईसंबंधीची दि.१.१.२००५ ते ७.२.२००८ या कालावधीतील मनपा डायरी अहवालाची साक्षांकित नक्कल व अनुषंगिक एकूण २९ मुद्दयांबाबतची माहिती मागितली होती. याच विषयावर अपिलकाराने आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी अपील क्र.१२९२ दाखल केले आहे. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी दुपारी ४.२० वा.सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपोली प्रति प्रत रु.२/-एवढे शुल्क भरुन आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रती प्रत्यक्ष प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. त्यानुसार अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपील क्र.१२९२ मध्ये आदेशित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. दोन्ही अपिलाचा विषय एकच असल्यामुळे आणि अपील क्र.१२९२ मध्ये आदेश दिले असल्यामुळे मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९८/०२**

**श्री. प्रभाकर सिताराम तुर्भेकर,** **------ अपीलकर्ता**
**तुर्भेकर हाऊस, बावकर बावडीजवळ,**
**ट्रॉम्बे कोळीवाडा, मुंबई- ४०० ०८८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,**
**२ रा माळा, रुम नं.१०८,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,**
**२ रा माळा, रुम नं.१०८,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रभाकर सिताराम तुर्भेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि.१७.११.२००७ रोजी अर्ज करुन, कै.गमशा धमशा कोळी यांचे मृत्यूच्या नोंदीविषयी तसेच मूळ नोंदीमध्ये केलेल्या दुरुस्तीविषयी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक माहिती अधिकारी, एम-पूर्व विभाग यांचेकडून दि.२.११.२००७ च्या पत्रान्वये अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कै.गमशा धमशा कोळी यांचे मृत्यूच्या नोंदीविषयी तसेच मूळ नोंदीमध्ये केलेल्या दुरुस्तीविषयी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक माहिती अधिकारी, एम-पूर्व विभाग यांचेकडून दि.२.११.२००७ च्या पत्रान्वये अनुषंगिक माहिती मागितली होती. जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम क्र.१५ व महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी २००० क्र.११ नुसार जन्म आणि मृत्यूसंबंधीच्या नोंदवहीमधील नोंदीमध्ये दुरुस्ती करणे अथवा नोंदी रद्द करणे अशी तरतूद आहे.

डॉक्टरांच्या व पोलिसांच्या प्रमाणपत्रानुसार कै. गमशा धमशा कोळी यांची नोंद झालेली आहे. श्री.महादेव सहादेव कोळी यांनी मृत्यू नोंदणीमध्ये चुकून घनश्याम धनशा कोळी अशी नोंद झाली असून, ती दुरुस्त करुन, आत्माराम धनशा कोळी असे करण्यासाठी अर्ज दिला होता. त्यानुसार तत्कालिन वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी जोडलेली कागदपत्रे तपासून लिपिकास जोडण्यासाठी सांगितले व त्यांनी सही केली. दुरुस्ती केल्यानंतर सर्व कागदपत्रे रेकॉर्ड सेक्शन फलटण रोड येथे पाठविली जातात. एकदा नावात दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा करु शकत नाही. याप्रमाणे मृत्यू नोंदणी रजिस्टरमधील छायाप्रती मिळण्यासाठी रु.२/-प्रती प्रत याप्रमाणे सी.एफ.सी.एम-पूर्व येथे भरण्यास अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी सांगितले असता अपिललकाराने शुल्क भरण्यास नकार दिला. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने माहितीपोटी आवश्यक ते शुल्क भरुन जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपिलकाराने आवश्यक शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-२९/११/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३९३/०२**

**श्री. मूलचंद दशरथ यादव,** **------ अपीलकर्ता**
**केळेवाडी चाळ, चाळ नं.२२५-बी,**
**रुम नं.५४, फर्ग्युसन रोड,**
**लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त, (बाजार ),.**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**महात्मा ज्योतीराव फुले मंडई, १ ला मजला,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**महात्मा ज्योतीराव फुले मंडई, १ ला मजला,**
**मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अधिक्षक (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**महात्मा ज्योतीराव फुले मंडई, १ ला मजला,**
**मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मूलचंद दशरथ यादव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (बाजार) आणि वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि.२९.१२.२००६ रोजी अर्ज करुन, १९७८ साली लोअरपरेल येथील सर्वश्री मूलचंद यादव आणि जनता काशी यादव यांना टी.एम.पी.पीच परवाना देण्यात आला होता हे खरे आहे का, याबाबत एकूण १९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२५.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी

आयोजित करुन, जन माहिती अधिका-यांनी सात दिवसांचे आत अपिलकारास मुद्देनिहाय माहिती देण्याबाबत नमूद करुन दि.३.४.२००७ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.९.४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपुरी व चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक (बाजार) आणि वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, १९७८ साली लोअरपरेल येथील सर्वश्री मूलचंद यादव आणि जनता काशी यादव यांना टी.एम.पी.पीच परवाना देण्यात आला होता हे खरे आहे का, याबाबत एकूण १९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.९.४.२००७ च्या पत्रान्वये दिलेली माहिती अपूर्ण/चुकीची असल्याचे अपिलकाराने प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२८५/०२**

**श्री. जॉर्ज अलबुर्कक,** **------ अपीलकर्ता**
**६/३२, बी.आय.टी.चाळ,**
**आग्रीपाडा, मुंबई- ४०० ०११.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**३ रा मजला, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**३ रा मजला, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जॉर्ज अलबुर्कक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.३१.३.२००८रोजी अर्ज करुन, आग्रीपाडा चाळ क्र.१६, बीआयटी, ट्रान्झीट कॅम्पच्या पुनर्बांधणीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.११.४.२००८ च्या पत्राने अपिलकारास माहितीपोटी आवश्यक ते शुल्क भरण्याबाबत कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.४.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२१.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.२२.५.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-याना अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आग्रीपाडा चाळ क्र.१६, बीआयटी, ट्रान्झीट कॅम्पच्या पुनर्बांधणीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती अपिलकारास देणे सोईचे व्हावे यादृष्टीने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३९२/०२**

**श्री. महावीर शिवप्रसाद यादव,** **------ अपीलकर्ता**
**अभिलास नगर, सोसायटी नं.३,**
**खोली क्र.२, इरानीवाडी रोड नं.४,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डॉ.डी.एन. रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डॉ.डी.एन. रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. महावीर शिवप्रसाद यादव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई, यांच्याकडे दि. २९.१२.२००६ रोजी अर्ज करुन, सन १९७८ साली लोअरपरेल येथील सर्वश्री मूलचंद यादव आणि जनता काशी यादव यांना टी.एम.पी.पीच परवाना देण्यात आला होता हे खरे आहे का, याबाबत एकूण १९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२२.१.२००७ च्या पत्राने अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन सात दिवसांचे आत अपिलकारास मुद्देसूद माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना निर्देश देऊन दि.३.४.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन १९७८ साली लोअरपरेल येथील सर्वश्री मूलचंद यादव आणि जनता काशी यादव यांना टी.एम.पी.पीच परवाना देण्यात आला होता हे खरे आहे का, याबाबत एकूण १९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकि-यांनी पुरविलेली माहिती अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२७८/०२**

**श्री. गणेश विठ्ठल नखाते,** **------ अपीलकर्ता**
**२०९/४, ५, ६, हिराबाई चाळ, गणेशबाग लेन,**
**कुर्ला पोलीस स्टेशनच्या मागे,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (पवि-५),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम विभाग,**
**३ रा मजला, शरद आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**देवनार पशुवधगृह, देवनार, मुंबई.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. गणेश विठ्ठल नखाते, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.५.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका, देवनार पशुवधगृह, मुंबई, यांच्याकडे दि.३१.१.२००८ रोजी अर्ज करुन, गेल्या सहा वर्षात अनधिकृत मटण, बीफ व पिग यावर कुठल्या- कुठल्या पोलीस स्थानकांनी कारवाई केली, त्यांचे नांव, जागेचा तपशील, अनधिकृत मटण विक्रेत्यांची नांवे व त्यांचा तपशील इ, अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १०.३.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.५.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका, देवनार पशुवधगृह, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, गेल्या सहा वर्षात अनधिकृत मटण, बीफ व पिग यावर कुठल्या- कुठल्या पोलीस स्थानकांनी कारवाई केली, त्यांचे नांव, जागेचा तपशील, अनधिकृत मटण विक्रेत्यांची नांवे व त्यांचा तपशील इ, अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१०.३.२००८ च्या पत्राने समर्पक व नियुमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२७७/०२**

**श्री. गणेश विठ्ठल नखाते,** **------ अपीलकर्ता**
**२०९/४, ५, ६, हिराबाई चाळ, गणेशबाग लेन,**
**कुर्ला पोलीस स्टेशनच्या मागे,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गणेश विठ्ठल नखाते, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक (बाजार) बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई, यांच्याकडे दि.२७.२.२००८ रोजी अर्ज करुन, खाजगी बक-यांचे मटण विक्रेत्यांचे अभिलेख्यावर असलेले नाव व पत्ते मिळण्याबाबतअनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. २२.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.५.२००८ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले. अपिलकाराने मूळ अर्जानुसार विचारलेल्या माहितीची जेवढी कागदपत्रे असतील त्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास द्याव्यात असे जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी निदेश दिले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या निदेशानुसार माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन ल्थक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक (बाजार) बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, खाजगी बक-यांचे मटण विक्रेत्यांचे अभिलेख्यावर असलेले नाव व पत्ते मिळण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-याने अपिलकारास दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झालेले नाही. अपुरी माहिती दिली असल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३१७/०२**

**श्री. किरण के. गुलगुले,** **------ अपीलकर्ता**
**४०२/ नागरी टेरेस को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सुनावाला अग्यारी लेन,**
**माहीम (प.), मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई (१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक/विभागीय सहनिबंधक (जी/एन विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई (१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. किरण के.गुलगुले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक/विभागीय सह निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.११.२.२००८रोजी अर्ज करुन, नागरी टेरेस सहकारी गृहनिर्माण संस्था, सुनावाला अग्यारी लेन, माहिम (प.) मुंबई या संस्थेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, ७९ (१) खाली दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावर उपलब्ध आहे. जन माहिती अधिका-यांनी संस्था स्तरावर असलेली माहिती अपिलकारास प्राप्त करुन देण्यासाठी संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (१) (२) खाली आदेश देवून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलकारास द्यावी असे नमूद करुन दि. १२.५.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम

अपिलीय अधिका-याच्या निदेशानुसार जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक/विभागीय सह निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नागरी टेरेस सहकारी गृहनिर्माण संस्था, सुनावाला अग्यारी लेन, माहिम (प.) मुंबई या संस्थेला मनपा अधिनियम, ७९ (१) खाली दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सहकारी गृहनिर्माण संस्थेस शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या आर्थिक सहाय्य मिळाले नसल्यास अशा संस्थेस माहितीच्या अधिकारासंबंधीच्या तरतुदी लागू होत नाहीत. परंतु अपिलकारावर जर अन्याय होत असेल तर तो दूर करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र सहकारी कायद्याने सहकार विभागातील सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकालात काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८३६/०२**

**श्री. जनार्दन ना. वैद्य,** **------ अपीलकर्ता**
**माजी पोस्ट वॉर्डन,**
**माहीम मच्छिमार नगर,**
**इमारत क्र.६/२२१, कॉजवे रोड,**
**माहीम (प.), मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक भूव्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. जनार्दन ना. वैद्य, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक भूव्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२.३.२००७ रोजी अर्ज करुन, माहीम मच्छिमार नगरातील रहिवाश्यांना स्टॉल चालविण्यास परवाना देणे, स्टॉल समोरील भिंत तोडून असणारे अडथळे दूर करण्याबाबत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळास सूचित केले होते.

सदर बाबी अनुक्रमे मुंबई महानगरपालिका व गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारित येत असल्यामुळे अपिलकाराच्या अर्जाची प्रत संबंधितांकडे पाठविण्यात आली असल्याचे व त्यांच्याकडे परस्पर संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.१५.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने

राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक भूव्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, माहीम मच्छिमार नगरातील रहिवाश्यांना स्टॉल चालविण्यास परवाना देणे, स्टॉल समोरील भिंत तोडून असणारे अडथळे दूर करण्याबाबत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळास सूचित केले होते. स्टॉल समोरील भिंत तोडून असणारे अडथळे दूर करण्याबाबत गृहनिर्माण मंडळाकडे संपर्क साधण्याबाबत कळविले होते. त्यानुसार अपिलकाराने मिळकत व्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्याकडे दि.२९.१.२००७, दि.१३.६.२००७ रोजी पत्र पाठवून कार्यवाहीची मागणी केली होती. याबाबत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्याकडून काहीही कारवाई करण्यात आली नाही. मंडळाचे वसाहतीतील अनधिकृत स्टॉल नियमित करुन त्यांना भाडे आकारणीचे मंडळाचे कोणतेही धोरण नाही. यामुळे अपिलकाराची सदर मागणी नाकारण्यात आली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.२ बाबत काहीही माहिती दिली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८२/०२**

**श्री. अशोक एस. गुलाटी,** **------ अपीलकर्ता**
**जेवा देवसी बिल्डिंग,**
**तळमजला, रुम नं.७ व ८,**
**रानडे रोडजवळ, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगपालिका, जी/उत्तर विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अशोक एस.गुलाटी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी अर्ज करुन, रानडे रोड, दादर, मुंबई येथील जेवा देवर्सी इमारतीच्या जुन्या आराखडयाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

मागितलेली माहिती फार जुनी सन १९४५ पूर्वीची असल्याने नस्ती उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पूर्वी कळविले होते. यामुळे समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. यावरुन अपिलकारास या प्रकरणी कोणतेही स्वारस्य नसल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१.१.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रानडे रोड, दादर, मुंबई येथील जेवा देवसी इमारतीच्या जुन्या आराखडयाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जेवा देवसी इमारतीच्या आतील ड्रेनेजचा नकाशा कार्यालयात उपलब्ध नाही. सदर नकाशा उपलब्ध होण्यासाठी सहाय्यक अभियंता, पर्यावरण, जी/उत्तर यांनी कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव (शहर) III यांचेकडे दि.४.३.२००७ रोजी पत्र पाठविण्यात आलेले आहे. जेवा देवसी इमारतीच्या आतील ड्रेनेज चेंबर्स व मलवाहीनी मध्ये नेहमी चोक होत असल्यामुळे इमारतीच्या रहिवाशांनी मलवाहिनी चोक होऊ नये म्हणून नव्याने चेंबर्स बांधलेले आहेत. इमारतीच्या रहिवाशांनी सादर केलेल्या अर्जाची प्रत अपिलकारास दि.७.३.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. सहाय्यक अभियंता (पर्यावरण) यांनी सदरहू इमारतीच्या आतील मलवाहीनीची पाहणी केली असता सदर मलवाहीनी कोठेही भरुन वाहत असलेली आढळून आली नाही. असेही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यावरुन अपिलकारास उक्त संस्थेच्या इमारतीच्या आतील ड्रेनेजचा नकाशा अद्याप उपलब्ध करुन दिलेला दिसत नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेली सदर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२८०/०२**

**श्रीमती प्रमिला चं. गिरप,**
**१८३/४९८५, पंतनगर,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५.** **------ अपीलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंघक सहकारी संस्था,**
**म्हाडा कार्यालय, दुसरा माळा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती प्रमिला चं. गिरप, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.६..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा कार्यालय, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. १४.४.२००८ रोजी अर्ज करुन, सन २००६, २००७ व २००८ या कालावधीत पंतनगर फ्रेन्ड्स को.ऑ.है. सोसायटीने उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा कार्यालयाकडे केलेल्या पत्र व्यवहाराच्या छायाप्रती, कार्यालयातील फाईलवरील टिप्पणीची प्रत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिल जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१ अधीन उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा यांचेविरुध्द अपील केलेले आहे. सदर अपिलासाठी उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा हे प्रथम अपिलीय अधिकारी असल्याने अपिलकाराचे प्रथम अपील पुढील कारवाईसाठी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे दि.१३.५.२००८ रोजी हस्तांतरित केले व तसे अपिलकारास अवगत केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा कार्यालय, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन २००६, २००७ व २००८ या कालावधीत पंतनगर फ्रेन्ड्स को.ऑ.है. सोसायटीने उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा कार्यालयाकडे केलेल्या पत्र व्यवहाराच्या छायाप्रती, कार्यालयातील फाईलवरील टिप्पणीची प्रत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. याप्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन, आवश्यक ते आदेश पारित करावेत. सदर आदेशाने समाधान न झाल्यास अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा त्यांचा हक्क अबाधित राहील. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकालात काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२८२/०२**

**श्रीमती नीता एन. ससाणे,** **------ अपीलकर्ता**
**सचिव, गोल्डस्टार को.ऑप.हौ.सो.लि.**
**सी.टी.एस.नं.९१२, दत्त मंदिर रोड,**
**डहाणूकरवाडी, कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**डॉ. आंबेडकर मार्केट बिल्डिंग,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/साऊथ विभाग, मुंबई.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्रीमती नीता एन. ससाणे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण विभाग, मुंबई, यांच्याकडे दि. २७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, डहाणूकरवाडी, दत्तमंदिर रोड, कांदिवली (प.), मुंबई येथील सिटी सर्वे क्र.९१२ या प्लॉटवर सन १९७८ ते १९८४ या कालावधीत बांधकाम केलेल्या बंगल्याच्या महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली फाईल क्र.सीई/३१८२/एआर, १०७९ या वर्षाची फार जुनी म्हणजे २८ वर्षापूर्वीची असल्याने या फाईलचा जाणिवपूर्वक शोध घेतला तरीही फाईल उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.२.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकाराने मागणी केलेली माहितीसबंधीची नस्ती फार जुनी असल्याने फाईल सापडली नसल्याने माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. याबाबत पुन्हा

संबंधित फाईलचा शोध घेण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांस सूचना दिल्या. तरीही संबंधित फाईल जाणिवपूर्वक शोध घेऊन सापडली नसल्याने अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याने प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलकाराचे अपील निकालात काढले व तसे अपिलकारास दि.२७.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डहाणूकरवाडी, दत्तमंदिर रोड, कांदिवली (प.), मुंबई येथील सिटी सर्वे क्र.९१२ या प्लॉटवर सन १९७८ ते १९८४ या कालावधीत बांधकाम केलेल्या बंगल्याच्या महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्र फार जुनी म्हणजे २८ वर्षापूर्वीची आहेत. याबाबत जन माहिती अधिका-यांनी जाणिवपूर्वक दोनवेळा शोध घेतला असता संबंधित नस्ती सापडत नाही. यामुळे अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानरगपालिका, कांदिवली यांनी अपिलकाराने मागण्ी केलेली नस्ती सापडत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास कळवावे. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकालात काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९७/०२**

**श्री. शैलेश आर. घेडिया,** **------ अपीलकर्ता**
**बी/२०२, लाभ आशिष ओल्ड पोलीस क्वॉर्टर्स लेन,**
**अंधेरी (पूर्व.), मुंबई- ४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे,(पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे,(पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.शैलेश आर.घेडिया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.६..२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. ११.९.२००७ रोजी अर्ज करुन, वर्सोवा संदिप सहकारी गृहनिर्माण संस्था, अंधेरी (प.), मुंबईबाबत एकूण ९ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी तशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.१०.२००७ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्थेच्या दप्तरातील असल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी संस्थेला पत्र दिलेले आहे. असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ७.६.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा संदिप सहकारी गृहनिर्माण संस्था, अंधेरी (प.), मुंबईबाबत एकूण ९ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य दिले जात नाही अशा सहकारी गृहनिर्माण संस्था उक्त अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाहीत. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.१०.२००७ व दि.१०.१०.२००७ च्या पत्राने कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकालात काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९३५/०२**

**श्री. जयंत के. कारुलकर,** **------ अपीलकर्ता**
**४२९, पारिजात दादर मकरंद को.ऑ.हौ.सो.लि.**
**सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर निबंधक,**
**वसूली व नियोजन, सहकारी संस्था, पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालय,**
**नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जयंत के. कारुलकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे, यांच्याकडे दि. १७.३.२००७ रोजी अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदनिका खरेदी करण्याकरिता अल्प उत्पन्न गटातील सभासदांना शासनामार्फत सवलत देण्यात येते. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपनिबंधक सहकारी संस्था, जी/एन, विभाग मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलकाराचा दि.१७.३.२००७ चा अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी संबंधितांकडे पाठवून जन माहिती अधिका-यांनी तसे अपिलकारास दि.९.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने शासकीय माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था जी/एन, मुंबई विभाग यांचे कार्यालयाविरुध्द अपील केल्याचे आढळून आल्याने सदर अपिलासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई-१ शहर प्रथम अपिलीय अधिकारी असल्याने पुढील कार्यवाहीकरिता त्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.७.२००७ च्या पत्राने कळविले. प्रथम अपिलावर दि.५.७.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर न राहिल्यामुळे अपिलकाराचे अपील

फेटाळण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे, यांच्याकडे अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदनिका खरेदी करण्याकरिता अल्प उत्पन्न गटातील सभासदांना शासनामार्फत सवलत देण्यात येते. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती उप निबंधक सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलातील सुनावणीच्यावेळी अपिलकार हजर नसल्याच्या कारणावरुन अपील फेटाळण्यात आले.या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३८/०२**

**श्री.जान मो.गुलाम मो.खान, ------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं.२७/ए/४६, रोड नं.२,**
**शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,**
**२ रा मजला, कै.शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,**
**२ रा मजला, कै.शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. जान.मो.गुंलाम मो.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि. २५.२.२००८ रोजी अर्ज करुन, एम/पूर्व विभागातील भ्रष्ट अधिका-यांद्वारे बोगस अहवाल देऊन वरिष्ठांची दिशाभूल करुन, दिलेल्या त्रासाबाबत तथा पीएपी स्कीम अनुसार पर्यायी जागा न दिल्याबाबत एकूण सात मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहितीपोटी रु.२/- एवढी रक्कम सुविधा केंद्रात भरुन माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याबाबत दि.१३.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.९.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीसाठी अपिलकार हजर राहिले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती खरी असल्याचे नमूद करुन, अपिलकाराचा अर्ज फेटाळण्यात आला व तसे अपिलकारास दि.११.४.२००८ च्या पत्रान्पये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एम/पूर्व विभागातील भ्रष्ट अधिका-यांद्वारे बोगस अहवाल देऊन वरिष्ठांची दिशाभूल करुन, दिलेल्या त्रासाबाबत तथा पीएपी स्कीम अनुसार पर्यायी जागा न दिल्याबाबत एकूण सात मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकार यांना रफीनगर नाल्यालगत दिलेले भूखंड ओळखपत्रास प्रात्र नसले तरी संरक्षणास पात्र आहे असे अपिलकारास कळविण्याबद्दल चाचणाी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी यांनी संबंधित कगदपत्रावर प्रस्तावित केल्याचे तसेच अपिलकारास प्रकल्पग्रस्त सदनिका देण्यासाठी त्यांचा प्रस्ताव सक्षम अधिका-याच्या मंजुरीकरिता सादर करण्यात आल्याचे कळविले होते. यानंतर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराची पीएमपी धोरणानुसार २२५ चौ.फू.जागा देण्याची विनंती अमान्य करण्यात आली असल्याचे कळवून ओळखपत्र देता येत नसल्साचे दि.८.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलकारास भूखंड क्र.२७ अे अे ५० वर पर्यायी जागेचे वाटप करण्यात आले होते. परंतु सदर भूखंडावर दुसरे प्रकल्पग्रस्त बाधित कर्मचारी श्री.नूर मोहम्मद यांनी अनधिकृतपणे ताबा घेतल्यामुळे त्यांना ३५४-अे अन्वये नोटीस बजावली होती. त्याविरुध्द त्यांनी शहर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. मा.न्यायालयने जैसे थे स्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यावरुन अपिलकारास पर्यायी जागा देण्याची बाब न्यायप्रविष्ट असल्याचे दिसून येते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या माहितीमध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई/दिनांक :-१२/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६३/०२**

**श्री. मच्छिंद्र एन.कारळकर, अध्यक्ष** **------ अपीलकर्ता**
**सबर्बन रेसिडेंट्स वेल्फेअर असो. मुंबई,**
**हजराबाई हाऊस, रुम नं.५, इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले, (प.) मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का),**
**नवीन प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी (अति/निष्का),**
**नवीन प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मच्छिंद्र एन. कराळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१०.३.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.१९५ (पीटी), ३० (पीटी) आणि ३१ (पीटी), न्यू जुहू वर्सोवा रोड, डी. एन. नगर, अंधेरी येथील लोकनायक नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक एकूण सहा मुद्दयांवर माहिती मागितली होती.

मुद्दा क्र.१ व ४ चिटणीस, जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयाशी संबंधित असल्याचे तसेच मुद्दा क्र.२ व ३ बाबतचा तपशील पुरविण्यात येईल. मुद्दा क्र.५ व ६ बाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे यांचे कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.४.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.

२०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप जिल्हाधिकारी, नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई, अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.१९५ (पीटी), ३० (पीटी) आणि ३१ (पीटी), न्यू जुहू वर्सोवा रोड, डी. एन. नगर, अंधेरी येथील लोकनायक नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक एकूण सहा मुद्दयांवर माहिती मागितली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अर्जातील मुद्दा क्र. १, २ आणि ४ बाबत अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी माहिती द्यावी. उर्वरित मुद्दयानुसार मागितलेली माहिती गृहीतकृत्यात्मक, प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याने उक्त अधिनियमांतर्गत मोडत नाही.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३६/०२**

**श्रीमती शिल्पा आठवले,** **------ अपीलकर्ता**
**मॅनेजिंग डायरेक्टर,**
**मुंबई गोल्ड कॅब्स प्रा.लि.**
**बी-००३, न्यू गोकुळ प्लाझा, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य),**
**ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य),**
**ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती शिल्पा आठवले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), तुळशीवाडी, मुंबई, यांच्याकडे दि. २६.३.२००८ रोजी अर्ज करुन, गोल्ड कॅब्स प्रा.लि. अंतर्गतच्या फ्लीट टॅक्सी सेवा योजना, २००६ चे परमिट नुतनीकरणाबाबत श्री.संजय खेमका यांनी मागितलेली माहिती देऊ नयें असा गोल्ड कॅबने आक्षेप घेता होता.

श्री.संजय खेमका यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर दि.१७.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन श्री.संजय खेमका यांना विनामूल्य माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांचे दि.१७.३.२००८ चे आदेश स्थगित करण्याबाबत अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), तुळशीवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, गोल्ड कॅब्स प्रा.लि. अंतर्गतच्या फ्लीट टॅक्सी सेवा योजना, २००६ चे परमिट नुतनीकरणाबाबत श्री.संजय खेमका यांना माहिती देऊ नये असा गोल्ड कॅब्सने आक्षेप घेतला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधित कोणतीही माहिती पुरवावयाची असेल तत्पूर्वी माहिती प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत त्रयस्थ पक्षास लेखी नोटीस देवून माहिती प्रकट करावी किंवा कसे यासंबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल अशी तरतूद आहे. सदर प्रकरणी गोल्ड कॅब्सने म्हणजे त्रयस्थ पक्षाने त्यांचे परमिट नुतनीकरणाची श्री.संजय खेमका यांना माहिती पुरवू नये अशी जन माहिती अधिकारी यांना अर्ज करुन विनंती केली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. उक्त अधिनियमातील कलम ११ (१) परंतूकानुसार कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करुन माहिती प्रकट करता येईल अशी तरतूद आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम, ५६ मध्ये, कोणत्याही अर्जदारास विहित शुल्क भरणा करुन कोणत्याची वाहनांचे नोंदणी विवरण प्राप्त करता येईल अशी तरतूद आहे. सदर बाब लक्षात घेता, अपिलकाराची विनंती मान्य करता येत नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३५/०२**

**श्रीमती शिल्पा आठवले, ------ अपीलकर्ता**
**मॅनेजिंग डायरेक्टर,**
**मुंबई गोल्ड कॅब्स प्रा.लि.**
**बी-००३, न्यू गोकुळ प्लाझा, ठाकूर कॉम्प्लेक्स,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य),**
**ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य),**
**ओल्ड बॉडीगार्ड लाईन्स, तुळशीवाडी,**
**ताडदेव, मुंबई- ४०० ०३४. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती शिल्पा आठवले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), तुळशीवाडी, मुंबई, यांच्याकडे दि.२६.३.२००८ रोजी अर्ज करुन, गोल्ड कॅब्स प्रा.लि. अंतर्गतच्या फ्लीट टॅक्सी सेवा योजना, २००६ चे परमिट नुतनीकरणाबाबत श्री.संजय खेमका यांनी मागितलेली माहिती देऊ नये असा गोल्ड कॅबने आक्षेप घेतला होता.

श्री.संजय खेमका यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर दि.१७.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन श्री. संजय खेमका यांना विनामूल्य माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांचे दि.१७.३.२००८ चे आदेश स्थगित करण्याबाबत अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), तुळशीवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, गोल्ड कॅब्स प्रा.लि. अंतर्गतच्या फ्लीट टॅक्सी सेवा योजना, २००६ चे परमिट नुतनीकरणाबाबत श्री.संजय खेमका यांना माहिती देऊ नये असा गोल्ड कॅब्सने आक्षेप घेतला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधित कोणतीही माहिती पुरवावयाची असेल तत्पूर्वी माहिती प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत त्रयस्थ पक्षास लेखी नोटीस देवून माहिती प्रकट करावी किंवा कसे यासंबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल अशी तरतूद आहे. सदर प्रकरणी गोल्ड कॅब्सने म्हणजे त्रयस्थ पक्षाने त्यांचे परमिट नुतनीकरणाची श्री.संजय खेमका यांना माहिती पुरवू नये अशी जन माहिती अधिकारी यांना अर्ज करुन विनंती केली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. उक्त अधिनियमातील कलम ११ (१) परंतूकानुसार कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करुन माहिती प्रकट करता येईल अशी तरतूद आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम, ५६ मध्ये, कोणत्याही अर्जदारास विहित शुल्क भरणा करुन कोणत्याची वाहनांचे नोंदणी विवरण प्राप्त करता येईल अशी तरतूद आहे. सदर बाब लक्षात घेता, अपिलकाराची विनंती मान्य करता येत नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७१/०२**

**श्री. सुबोधकुमार दयानंद केडीया,** **------ अपीलकर्ता**
**केडिया कुंज, फ्लॅट नं.१०/११, दुसरा मजला,**
**उत्तर पश्चिम दक्षिण एव्हेन्यू, प्लॉट नं.२३,**
**श्री.राजस्थान को.ऑप.हौ.सो.लि.**
**जे.बी.नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-३,**
**पश्चिम उपनगरे, के/पूर्व विभाग, म्हाडा बिल्डिंग,**
**तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुबोधकुमार डी.केडीया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१७.९.२००७ रोजी अर्ज करुन, श्री राजस्थान को.ऑप.हौ. सो.लि. अंधेरी (पूर्व), मुंबई या संस्थेतील सदनिका क्र.२३ कन्सेंट डीड नसताना दयानंद केडीया यांचे नावावरुन श्रीमती परमेश्वरी देवी केडीया यांचे नांवे हस्तांतरित केली. संचालक मंडळाची मंजुरी घेण्यात आली नाही. गाळा हस्तांतरणावेळी दस्तमुद्रक व नोंदणी फी भरण्यांत आली नाही. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती कार्यालयात नसून ती संस्था स्तरावर असल्याने ती अपिलकारास देता येत नाही असे यापूर्वीच जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले होते. तसेच सदर संस्थेस शासकीय अर्थसहाय्य प्राप्त झाले नसल्याने ती माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही असेही अपिलकारास कळविण्यांत आले. अपिलकाराने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिका-यांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन त्याच्या छायाप्रती अपिलकारास दि.१५.१०.२००७ च्या पत्रासोबत पाठविल्या.. प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.११.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने समुचित संस्थेस शासनाद्वारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य नसल्याने तिचा समावेश

सामाजिक प्राधिकरणामध्ये होऊ शकत नाही. तसेच उपनिबंधक सहकारी संस्था, के/पूर्व विभाग यांनी दि.१५.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती दिल्याचे नमूद करुन दि. १९.११.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

अपिलातील कागदपत्राची तपासणी केली असता असे दिसून येते की, श्री.दयानंद केडीया व श्रीमती परमेश्वरी देवी केडीया यांच्या दि.१८.१२.९२ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार संस्थेने शेअर् क्र.१८१ ते १९० संयुक्तरित्या श्री.दयानंद केडीया व त्यांची पत्नी श्रीमती परमेश्वरी देवी केडीया यांचे नावे करण्यात आल्याचे संस्थेने दि.११.३.९२ च्या पत्रानुसार श्री.दयानंद केडीया यांना कळविले असल्याचे दिसून येते. श्री.दयानंद केडीया व श्रीमती परमेश्वरी देवी केडीया हे उक्त संस्थेतील सदनिका क्र.२३ चे संयुक्त मालक आहेत. श्री. श्री.दयानंद केडीया यांनी श्रीमती परमेश्वरी देवी केडीया यांचे नावे नॉमिनेशन केलेले आहे. याप्रकरणी पूर्वी दि.२१.१०.२००८ रोजी द्वितीय अपिलावर सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते. यामुळे सदर अपिलावरील सुनावणी पुढे ढकलून दि.१७.११.२००८ रोजी आयोजित केली. सदर सुनावणीचेवेळी अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकाराने दि.१७.११.२००८ रोजी लेखी निवेदन सादर करुन असे प्रतिपादन केले की, "राज्य माहिती आयुक्तांनी दि.२३.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलकारास माहिती देण्याबाबत आदेश पारित करण्याचे तोंडी मान्य केले होते. तेव्हा याप्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्याची अधिनियमात तरतूद नाही."याबाबत येथे नमूद करण्यात येते की, सदर द्वितीय अपील प्रकरणी दि.२३.१०.२००८ रोजी सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. यामुळे याप्रकरणी सुनावणी स्थगित करुन ती पुढे ढकलून पुन्हा दि.१७.११.२००८ रोजी आयोजित केली. सुनावणीचेवेळी कागदपत्राची पहाणी केली असता राजस्थान सहकारी गृहनिर्माण संस्थेने दिलेल्या शेअर्स सर्टिफिकेटची प्रत, नॉमिनेशनची प्रत अपिलकारास प्राप्त झाल्या असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :१५/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४७/०२**

**श्री. अनंत गोविंद हरावडे,** **------ अपीलकर्ता**
**७०१, दत्तप्रसाद को.ऑप.हौ.सो.**
**शनिमंदिर समोर, सावरपाडा,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग,**
**जयवंत सावंत मार्ग,दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग,**
**जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अनंत गोविंद हरावडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग, बोरीवली (पूर्व) मुंबई, यांच्याकडे दि.७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, संदेश व्यायामशाळा व समाजकल्याण केंद्राबाबत एकूण नऊ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.५.१.२००८ रोजी पत्र पाठवून अभिलेख तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या प्रती विहित आकार भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपिलकारास कळविले होते. तथापि, सदर पत्र पोहोचण्यापूर्वी दि.९.१.२००८ रोजी अर्जदाराने ३० दिवसांत मागितलेली कागदपत्रे देण्यास विलंब केला या कारणास्तव प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकाराने मागितलेली सर्व माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश देवून दि.२४.१.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी कागदपत्रे देण्याचे आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/उत्तर विभाग, बोरीवली (पूर्व) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, संदेश व्यायामशाळा व समाजकल्याण केंद्राबाबत एकूण नऊ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संदेश कल्याणकेंद्र व समाजमंदिर बांधण्यास महापालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्राकरिता अर्ज करुन, महापालिकेने दि.२.६.२००३ रोजी अटी व शर्ती घालून दुरुस्ती परवाना दिल्याबाबतच्या कागदपत्राची अपिलकाराने मागणी केली आहे. संबंधित कागदपत्र अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले आहेत. तथापि, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेली माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावेत. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२८३/०२**

**श्री. विपुल घरोड,** **------ अपीलकर्ता**
**७३/३, गुरुकृपा,**
**सायन (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विपुल घरोड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.१५.१२.२००७ रोजी अर्ज करुन, भंडारवाडा सायन (पूर्व), मुंबई येथील सायन कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहिती संदिग्ध व लागू नसलेली माहिती पुरविण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.२५.२.२००८ व दि.३.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मुद्दा क्र.ब मध्ये विचारलेली माहिती अभिप्राय स्वरुपाची आहे. माहिती स्वरुपाची नसल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी तसे अपिलकारास कळविले असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.३.२००८ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भंडारवाडा सायन (पूर्व), मुंबई येथील सायन कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने सायन कामगार गृहनिर्माण संस्थेबाबत (१) शासनाकडे प्रलंबित असलेल्या सात पुनर्निरीक्षण अर्जावर केव्हा आदेश पारित करण्यात येतील व (२) अद्यापपर्यंत सात पुनर्निरीक्षण अर्जावर कोणतेही आदेश पारित केलेले नसल्यामुळे तसेच दि.२६.२.२००७ व दि.१५.१०.२००७ च्या पत्रासंदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतची माहिती मागितली होती. दि.५.६.२००७ रोजी याप्रकरणी मा.मंत्री (सहकार) यांचेसमोर सुनावणी होऊन प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आले आहे. यासंदर्भात मा.मंत्री (सहकार) यांनी आजपर्यंत कोणतेही आदेश पारित केले नाहीत अशी मुद्दा क्र.ए बाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. मुद्दा क्र.ब अन्वये विचारलेली माहिती अभिप्राय स्वरुपाची असल्याने ती माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही. परंतु, यासंदर्भात दि.३०.३.२००७ रोजी अपिलकार व इतर सहा यांच्या मागणी प्रमाणे मा.मंत्री (सहकार) यांनी स्थगन आदेश दिले आहेत असे अपिलकारास कळवून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास स्थगन आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२८४/०२**

**श्री. संदिप तुकाराम पाटील,** **------ अपीलकर्ता**
**१/६०१, मिलेनियम पार्क, हरिओम नगर,**
**मुलूंड ऑक्ट्रॉय नाक्याजवळ,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, १ ला मजला,**
**आर.के.पालकर मार्ग, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, १ ला मजला,**
**आर.के.पालकर मार्ग, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. संदिप तुकाराम पाटील, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे दि. ५.२.२००८ रोजी अर्ज करुन, हॉटेल ग्रँट हयात, कालिना, सांताक्रूझ याबाबत सहा मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.३.२००८ रोजी पत्र पाठवून माहितीपोटी शुल्क रु.३५,८८०/- इतके भरुन कार्यालयीन दिवशी ११.०० ते १.३० या वेळेत माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी दि. १५.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्यावेळी अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीबाबत चर्चा करुन अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची नस्ती अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती आवश्यक शुल्क आकारुन १० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात असे दि.३०.५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, हॉटेल ग्रँट हयात, कालिना, सांताक्रूझ याबाबत सहा मुद्दयांबाबत अनुषंगिक अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून संबंधित नस्ती अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे अपिलकारास छायाप्रती उपलबध करुन द्याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुन जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या आहेत. परंतु अपिलकाराने संबंधित नस्तीचे निरीक्षण केल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. यावरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशाप्रमाणे अपिलकाराने कार्यालयात जाऊन संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास द्याव्यात.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९६/०२**

**श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण, ------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी स्वदेशी मिल,**
**सायन, चुनाभट्टी, मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. ------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, सामाजिक न्याय संस्थेचे कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागातील अधिकारी /कर्मचा-यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने अर्जामध्ये नमूद केलेली नेमकी कोणती माहिती अपिलकारा आवश्यक आहे याचा अर्थबोध होत नाही. तरी अपिलकाराने जन माहिती अधिका-यांशी संपर्क साधावा असे दि.७.४.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असून, अपिलकारास कोणती व कशाप्रकारे माहिती हवी आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. यामुळे यासंदर्भात दि.१७.६.२००८ रोजी विभागात प्रत्यक्ष येऊन चर्चा केल्यास अपिलकारा हवी असलेली माहिती देणे शक्य होईल असे दि.९.६.२००८ च्या पत्राने पुन्हा अपिलकारास कळविण्यात आले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सामाजिक न्याय संस्थेचे कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागातील अधिकारी /कर्मचा-यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील अधिकारी/ कर्मचा-यांची विहित कार्यपध्दतीने नेमणूक केल्याबाबतची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९९/०२**

**श्री. उदयकुमार अनंत आंबोणकर,** **------ अपीलकर्ता**
**४२, केनेडी ब्रिज, हंसराज दामोदर बिल्डिंग,**
**ऑपेरा हाऊस, गिरगांव, मुंबई.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कर्मचारीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी (मावक),**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. उदयकुमार अनंत आंबोणकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी (मावक), बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी अर्ज करुन, टाटा कन्सलटन्सी सर्विसेसने बेस्ट उपक्रमाच्या कामकाजाबाबत/ सुधारणाबाबत/ एम.आय.एस.बाबत बेस्ट उपक्रमास सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. बेस्ट उपक्रमाने मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पांतर्गत संस्थात्मक विकास, अभ्यास व व्यवस्थापन माहिती पध्दती यासाठी मे.टाटा कन्सलटन्सी सर्विसेस यांना सल्लागार म्हणून नियुक्त केले होते. सदर सल्लागार संस्थेने सादर केलेला अहवाल प्रशासनाने अद्याप सक्षम प्राधिकरणाला सादर केला नसून, सदर अहवालाची प्रत अपिलकारास देता येत नाही. सदर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने देखिल निर्देश दिलेले आहेत, असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.४.२००८ च्या पत्राने कळविले. मागितलेली माहिती योग्य कारण न देता देण्यात आलेली नाही या कारणास्तव अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी (मावक), बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, टाटा कन्सलटन्सी सर्विसेसने बेस्ट उपक्रमाच्या कामकाजाबाबत/ सुधारणाबाबत/ एम.आय.एस.बाबत बेस्ट उपक्रमास सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. सल्लागार संस्थेने सादर केलेला अहवाल प्रशासनाने सक्षम प्राधिकरणाला सादर केला नसल्याने जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास अहवालाची प्रत दिलेली नाही असे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सक्षम प्राधिकरणाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास अहवालाची प्रत उपलब्ध करुन द्यावी सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३०१/०२**

**श्री. सतीश हणमंत कोलते, ------ अपीलकर्ता**
**२१, मनाली अपार्टमेंट, हनुमान क्रॉस रोड नं.२,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मुंबई,**
**६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, मुंबई- ४०० ००१. ------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. सतीश हणमंत कोलते, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस, मुंबई, यांच्याकडे दि. २१.२.२००७ रोजी अर्ज करुन, विलेपार्ले (पूर्व) मुंबई, हनुमान क्रॉस रोड नं.२ येथील मनाली सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दि.६.६.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित करुन, दि.२५.९.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी अपिलकारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निदेश दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मल्होत्रा हाऊस मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, विलेपार्ले (पूर्व) मुंबई, हनुमान क्रॉस रोड नं.२ येथील मनाली सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मनाली सहकारी गृहनिर्माण संस्थेतील पाच व्यवस्थापक समिती सदस्यांनी एम-२० मध्ये कोणत्या तारखेला बंधपत्र सही करुन दिलेले आहे, नवीन उपविधी कोणत्या तारखेस स्विकारण्यात आला असून, संस्थेला तो केव्हापासून लागू आहे, अपिलकाराच्या दि.१३.२.२००७ च्या तक्रारीवर जन माहिती अधिका-यांनी केलेली कार्यवाही याकरिता जबाबदार असलेल्या अधिका-यांचे नाव, पदनाम इ. माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती आणि उक्त संस्थेने कार्यालयाकडे एम-२० नमुन्यात दि.२३.९.२००७ रोजी सादर केलेल्या बंधपत्राच्या छायाप्रती दि.३.३.२००८ रोजी शासकीय कोषागारात चलनाद्वारे रक्कमेचा भरणा केल्यानंतर अपिलकाराने कार्यालयाकडून प्रत्यक्ष प्राप्त करुन घेतल्या आहे असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुरन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत कार्यवाही केलेली नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विलंबाने माहिती दिली. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३०३/०२**

**श्री. इकबाल जी. पटेल,** **------ अपीलकर्ता**
**फरदीन मेन्शन,**
**१५/१५ अे. व्ही. एस. मार्ग,**
**माहीम, मुंबई-४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सब डिव्हीजनल अधिकारी आणि उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा, ९ वा मजला, चेतना कॉलेजजवळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**दादाभाई नवरोजी रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. इकबाल जी.पटेल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, दादाभाई नवरोजी रोड, अंधेरी (प.) मुंबई, यांच्याकडे दि.१७.३.२००८ रोजी अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील जमिनीवर बिनशेती सारा आकारणीचे कामासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.५.२००८ च्या पत्राने असे कळविले की, जमिनीवर बिनशेती सारा आकारणीचे काम (१) उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, (२) अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपगनर जिल्हा, (३) अप्पर तहसिलदार, (बिनशेती) अंधेरी, बोरीवली, कुर्ला यांच्या कार्यालयातून होते. तरी या कामी अपिलकाराने संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित करुन दि.११.६.२००८ रोजी आदेश पारित केले. तहसिलदार, अंधेरी यांच्या पत्र दि.१९.३.२००८ नुसार अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना निदेश दिले. जन माहिती

अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, दादाभाई नवरोजी रोड, अंधेरी (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील जमिनीवर बिनशेतीसारा आकारणीचे कामासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.५.२००८ च्या पत्राने कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संमर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता सर्व संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३०४/०२**

**श्री. युसुफ एस. खान,** **------ अपीलकर्ता**
**हजराबाई हाऊस, २ रा मजला, ब्लॉक नं.७,**
**इर्ला रोड, विलेपार्ले, मुंबई-४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालीराम पथ, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**२ रा मजला, पालीराम पथ, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. युसूफ एस.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, दादाभाई नवरोजी रोड, अंधेरी (प.) मुंबई, यांच्याकडे दि.६.३.२००८ रोजी अर्ज करुन, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प.), मुंबई येथील क्लासिक टेलिकम्युनिकेशन आणि ऐश्वर्या ब्रिदाल लॉजबाबत एमआरटीपी ५३ (१) अन्वये दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.४.४.२००८ च्या पत्रान्वये पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याबाबत कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.८.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि. १८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी उपलबध माहिती अपिलकारास विहित कालावधीत द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी निदेश देऊन दि.३०.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, दादाभाई नवरोजी रोड, अंधेरी (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प.), मुंबई येथील क्लासिक टेलिकम्युनिकेशन, ऐश्वर्या ब्राईडल लॉजला एमआरटीपी ५३ (१) अन्वये दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरणी सहाय्यक अभियंता यांच्या कार्यालयाने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविली होती. त्यास अनुसरुन पोलीस स्टेशनने पंचनामा करण्याकरिता कार्यालयास कळविले. जन माहिती अधिका-याच्या कार्यालयातील कर्मचा-याने पोलीस स्टेशनला ३-४ वेळा भेटी दिल्या. परंतु पंचनामा करण्याकरिता पोलीस स्टेशनमधील संबंधित अधिकारी भेटले नाहीत. या प्रकरणी लवकरात लवकर पंचनामा करण्यात येईल असे सहाय्यक अभियंता यांनी दि.१२.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले असे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या प्रकरणी क्लासिक टेलिकम्युनिकेशन अणि ऐश्वर्या ब्रिदाल लॉजबाबत दिलेल्या नोटीसीनुसार केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास अद्याप पुरविल्याचे सदर कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तरी जन माहिती अधिका-यांनी अपिलकाररस हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३८/०२**

**श्री. शशीकांत रामचंद्र पाटील,** **------ अपीलकर्ता**
**म्युन्सि.चाळ, ४५ के.एफ.खोली क्र.३,**
**लालबाग मासळी मार्केट,**
**श्री गणेश नगर, मुंबई-४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /दक्षिण विभाग,**
**डॉ. बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /दक्षिण विभाग,**
**डॉ. बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शशीकांत रामचंद्र पाटील, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग, परळ, मुंबई, यांच्याकडे दि. २८.११.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.मारुती नारायण जाधव आणि सोनाबाई कदम यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम १०५ (ब) अन्वये दाखल केलेली चौकशी क्र.-४/एफ-द/ २०४ बंद करण्याबाबत चौकशी अधिकारी, एफ/दक्षिण यांना दि.८.१२.२००४ रोजी दिलेल्या अर्जाची नक्कल व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी हजर न राहिल्याने भाडे पर्यवेक्षक (मालमत्ता) यांना सुनावणीकरिता हजर राहण्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश दिली. भाडे पर्यवेक्षक यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, सदर प्रकरण चौकशी अधिकारी यांच्याकडे पाठविले होते, परंतु, श्रीमती सोनाबाई कदम या मृत्यू पावल्यामुळे सदरची चौकशी रद्द करण्यात

आली. जन माहिती अधिका-यांनी चौकशी अधिका-याकडून माहिती घेऊन अपिलकारास माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१९.३.२००८ रोजी आदेश पारित केले. मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग, परळ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.मारुती नारायण जाधव आणि सोनाबाई कदम यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम १०५ (ब) अन्वये दाखल केलेली चौकशी क्र.-४/एफ-द/ २०४ बंद करण्याबाबत चौकशी अधिकारी, एफ/दक्षिण यांना दि.८.१२.२००४ रोजी दिलेल्या अर्जाची नक्कल व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. चौकशी अधिका-या कडून माहिती घेऊन अपिलकारास माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-याला निदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरची जन माहिती अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-यांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३७/०२**

**श्री. जगनारायण एम. कहार,** **------ अपीलकर्ता**
**सि.आय.टी.यु.सेंटर, भक्तावर बिल्डिंग,**
**२ रा मजला, अंधेरी (प.) मुंबई-४०० ०५८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अति/ निष्का.)**
**मुंबई उपनगर जिल्हा, पश्चिम उपनगरे,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपजिल्हाधिकारी (अ/नि.) मालाड,**
**एम.एच.बी.इमारत क्र.३८, १ ला मजला,**
**सिध्दार्थनगर, गोरेगांव (प.) मुंबई- ४०० ०६२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जगनारायण एम.कहार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड, एम.एच.बी.इमारत, सिध्दार्थनगर, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे दि.२०.१२.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.सुखदेव कृष्णा कुरुप यांच्याकडून हिरादेवी झोपडपट्टी भाटीगांव येथील घरावर अनधिकृतरित्या स्लॅब टाकून, माळा तयार करुन गल्लीत बाहेरुन शिडी उभी केल्याबाबत, केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.१.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे समाधान झ ाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.१३.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दिलेले उत्तर कार्यालयातील अभिलेख काळजीपूर्वक न तपासता दिले असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येते. अपिलकारास मूळ अर्जातील तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची यथास्थिती माहिती देणे अपेक्षित आहे. एखादी कार्यवाही का केली नाही यासारख्या प्रश्नावर माहितीच्या अधिकारात माहिती देणे बंधनकारक नसले तरी केलेल्या कार्यवाहीची अर्ज प्राप्त होण्याच्या दिनांकाला असणारी वस्तुस्थिती अपिलकारास देणे बंधनकारक आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कार्यालयाकडून करण्यात आलेल्या वा येत असलेल्या कार्यवाहीबद्दल यथास्थिती माहिती तात्काळ पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवून दि.१३.३.२००८ रोजी

आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.३.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड, एम.एच.बी.इमारत, सिध्दार्थनगर, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.सुखदेव कृष्णा कुरुप यांच्याकडून हिरादेवी झोपडपट्टी भाटीगांव येथील घरावर अनधिकृतरित्या स्लॅब टाकून, माळा तयार करुन गल्लीत बाहेरुन शिडी उभी केल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, मालाड यांनी मागितलेली माहिती जाणूनबुजून खोटे कारण सांगून दिलेली नाही. म्हणून माहिती अधिका-यास दंडित करावे अशी अपिलकाराची मागणी आहे. संबंधित ठिकाणी भूमापक यांना पाठवून प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यास जन माहिती अधिका-याने सांगितले होते. त्याप्रमाणे भूमापक यांनी पाहणी करुन जागेचा नकाशा व जबाब घेतल्यानंतर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ झेड- २ च्या तरतुदीन्वये कारणे दाखवा नोटीस दि.१८.३.२००८ रोजी बजावण्यात आली व सदरचे अनधिकृत बांधकाम असल्यास ते निष्कासित करण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.२६.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. तथापि सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित केले किंवा कसे याबाबत अपिलकारास माहिती दिल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अनधिकृत बांधकाम निष्कासित केल्याबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३६/०२**

**श्रीमती जयश्री विजयकुमार कोर्डे, ------ अपीलकर्ता**
**५, अरुणोदय, १३२, सेनापती बापट मार्ग,**
**माटुंगा (प.रे.) स्टेशन समोर,**
**माहीम, मुंबई-४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिकाप, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिकाप, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती जयश्री वि. कोर्डे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सेनापती बापट मार्ग, माटुंगा पश्चिम रेल्वे स्टेशन समोरील, अरुणोदय दुकान क्र.५ च्या पाठीमागे असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.२६.११.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.११.२००७ रोजी आदेश पारित केले. सहा महिन्याचा कालावधी उलटला तरी जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सेनापती बापट मार्ग, माटुंगा पश्चिम रेल्वे स्टेशन समोरील, अरुणोदय दुकान क्र.५ च्या पाठीमागे असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३५/०२**

**डॉ. गिरीष संघवी,** **------ अपीलकर्ता**
**३, कृष्णा इमारत, ३४ खेतवाडी,**
**६ वी लेन, मुंबई-४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई (१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार डॉ. गिरीष संघवी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई, जीपीओसमोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१०.५.२००८ रोजी अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेंमार्फत लावण्यात आलेली शास्ती कोणत्या सहकारी नियम/ कायद्यानुसार लावण्यात आली आहे, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. ती माहिती कागदपत्राच्या स्वरुपात कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे ती अपिलकारास देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई, जीपीओसमोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेंमार्फत लावण्यात आलेली शास्ती कोणत्या सहकारी नियम/ कायद्यानुसार लावण्यात आली आहे, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने प्रश्नार्थक स्वरुपाची मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात येत नसली तरी जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलकारास आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३४/०२**

**श्री. विनायक देवराम अडांगळे,** **------ अपीलकर्ता**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**१५२/ ५१०८, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**इमारत क्र. १५२, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. विनायक देवराम अडांगळे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सो.लि. नेहरुनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.११.३.२००८ रोजी अर्ज करुन, भिम-लाईट सहकारी गृहनिर्माण संस्था, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई, संस्थेच्या आस्थापना खर्चासाठी दिलेल्या रकमेच्या पावतीची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.२०.५.२००८ रोजी अपिलकारास पत्र पाठवून असे कळविले की, अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सो.लि. नेहरुनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भिम-लाईट सहकारी गृहनिर्माण संस्था, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई, संस्थेच्या आस्थापना खर्चासाठी दिलेल्या रकमेच्या पावतीची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी् केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २०.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्यचे कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३३/०२**

**श्री. शशीकांत रामचंद्र पाटील,** **------ अपीलकर्ता**
**म्युन्सि.चाळ, ४५ के.एफ.खोली क्र.३,**
**लालबाग मासळी मार्केट,**
**श्री गणेश नगर, मुंबई-४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /दक्षिण विभाग,**
**डॉ. बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /दक्षिण विभाग,**
**डॉ. बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शशिकांत रामचंद्र पाटील, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/ दक्षिण विभाग, परेल, मुंबई, यांच्याकडे दि.२८.११.२००७ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका पत्र क्र.सआ/ एफद/ओडी/५७३/प्रअ/मालमत्ता, दि.२.९.२००४ या पत्रात "जुना पत्रव्यवहार या कार्यालयाकडे उपलब्ध नाही' या विधानाबद्दल अनुषंगिक सहा मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.१२.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याच्या वतीने हजर असलेले भाडे पर्यवेक्षक (मालमत्ता) यांनी असे प्रतिपादन केले की, प्रकरण चौकशी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आले होते. परंतु, श्रीमती सोनाबाई कदम या मृत्यू पावल्यामुळे चौकशी रद्द करण्यात आली. जन माहिती अधिका-यानी याबाबत चौकशी अधिका-याकडून माहिती घेऊन अपिलकारास दि.२६.३.२००८ पर्यंत माहिती द्यावी असे दि.१९.३.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय

अधिकाऱ्याच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/ दक्षिण विभाग, परेल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अनुषंगिक बृहन्मुंबई महानगरपालिका पत्र क्र.सआ/ एफद/ओडी/५७३/प्रअ/मालमत्ता, दि.२.९.२००४ या पत्रात "जुना पत्रव्यवहार या कार्यालयाकडे उपलब्ध नाही' या विधानाबद्दल अनुषंगिक सहा मुद्दयांवर माहिती मागितली होती. श्री.मारुती नारायण जाधव (मनपा भाडेकरु) यांच्या खोली क्र.२ मध्ये पोटभाडेकरु ठेवला असून, त्याचा त्रास होत असल्याचे निवेदन श्री.शशिकांत पाटील यांनी लोकशाही दिनी मनपा यांना दि.१.३.२००४ रोजी सादर केले होते. त्याची प्रत अपिलकाराने मागितली होती. याबाबतचा जुना पत्रव्यवहार कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यानी अपिलकारास दि.२.९.२००४ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर कागदपत्र का उपलब्ध होत नाहीत याबाबतचा अपिलकाराने खुलासा मागितला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी संबंधित कागदपत्राचा पुन्हा जाणिवपूर्वक शोध घ्यावा. त्यानतर संबंधित कागदपत्र सापडली नाहीत तर प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी या प्रकरणी जाणिवपूर्वक निर्णय घेऊन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत याबाबत कळवावे. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३१/०२**

**श्री. रामचंद्र सखाराम पोवळे, ------ अपीलकर्ता**
**सुभाषनगर सहकारी गृहनिर्माण संस्था (एस.आर.ए.),**
**सी बिल्डिंग, २ रा मजला, रुम नं.२०१,**
**संत गोरा कुंभार मार्ग, धारावी, मुंबई-४०० ०१७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा इंजिनियरिंग सेक्शन,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**वांद्रे, (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**वांद्रे, (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. रामचंद्र सखाराम पोवळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) मुंबई, यांच्याकडे दि.९.४.२००८ रोजी अर्ज करुन, मे.शहा इंजिनियरिंग कंपनी या वातानुकुलित भाग बनविणा-या कारखान्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अपिलकाराने दि.७.२.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवर कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतचा तपशील मागितला होता.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मे.शहा इंजिनियरिंग कंपनी या वातानुकुलित भाग बनविणा-या कारखान्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अपिलकाराने दि.७.२.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवर कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतचा तपशील मागितला होता. सुभाषनगर को.ऑप.हौ.सोसायटी, संत गोरा कुंभार मार्ग, धारावी, मुंबई या अे निवासी इमारतीमध्ये तळमजल्यामध्ये कार्यरत असलेल्या वातानुकुलित पार्टस्च्या कारखान्यामुळे इमारतीमध्ये ध्वनी प्रदूषण होऊन रहिवाश्यांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत अपिलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलकाराने केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नसल्याने विलंबाबाबत त्यांचे विरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३२/०२**

**श्री. राकेश कुमार सिंघ,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- श्री. हेमंत चिराग,**
**दिप्ती कलेक्शन, ३, रामनिवास,**
**रानडे रोड, दादर (प.) मुंबई-४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.११४, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कॅम्पस, एम.जी.रोड, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक,**
**मुंबई विद्यापीठ, रुम नं.११४, विद्यापीठ इमारत,**
**फोर्ट कॅम्पस, एम.जी.रोड, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. राकेशकुमार सिंघ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस, मुंबई, यांच्याकडे दि.२.१.२००८ रोजी अर्ज करुन, क्र.Exam/Rev/VCD/७८५- २००४, दि. १७.११.२००४ च्या परिपत्रकाची प्रत वअनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. २.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच, दि.१७.११.२००४ च्या परिपत्रकाकरिता रु.८/-इतके शुल्क भरण्याबाबत अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी दि. ३.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.२.२००८ व दि.२१.४.२००८ रोजी माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.५.२००८ रोजी आदेश पारित केले. आवश्यक माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते.जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, क्र.Exam/Rev/VCD/७८५- २००४, दि. १७.११.२००४ च्या परिपत्रकाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२.२.२००८ व दि.२१.४.२००८ रोजी माहिती अपिलकारास दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपिलकारास माहिती प्राप्त झाली. अपिलकारा सुनावणी करिता हजर नव्हते. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३००/०२**

**श्री. एकनाथ दत्तात्रय राणे व इतर** ------ **अपीलकर्ता**
**१९, मिशन कंपाऊंड, ऑगस्ट क्रांती मार्ग,**
**रुम नं.७, नाना चौक,मुंबई-४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,**
**विल्सन महाविद्यालय,**
**चौपाटी, मुंबई- ४०० ००७.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य,**
**विल्सन महाविद्यालय,**
**चौपाटी, मुंबई- ४०० ००७.** ------- **उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. एकनाथ दत्तात्रय राणे व इतर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, विल्सन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई, यांच्याकडे दि.१०.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सन १९९४ पासून विनापरवानगी/ विनासूचना १०० टक्के घरभाडे भत्ता वेतनातून कपात करण्यात येत आहे. हा घरभाडे भत्ता कपात करु नये . जन माहिती अधिका-यांनी रहाती जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी घरभाडे भत्ता कोणत्या नियमानुसार वेतनातून कपात करतात, सदर घरभाडे भत्ता कोणाकडे जमा करतात व त्याचा पुरावा काय, अशी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.९.१,२००८ व दि.१२,४,२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता एकत्रित अर्ज न करता वैयक्तिकरित्या अर्ज करावा. एकत्रित माहिती देता येणार नाही. प्रत्येकाने माहितीपोटी रु.६४/-इतके शुल्क टपाल खर्चासह कॉलेजच्या लेखाधिका-याकडे जमा करावे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.११.२००८रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार .जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, विल्सन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन १९९४ पासून विनापरवानगी/ विनासूचना १०० टक्के घरभाडे भत्ता वेतनातून कपात करण्यात येत आहे. हा घरभाडे भत्ता कपात करु नये . जन माहिती अधिका-यांनी रहाती जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी घरभाडे भत्ता कोणत्या नियमानुसार वेतनातून कपात करतात, सदर घरभाडे भत्ता कोणाकडे जमा करतात व त्याचा पुरावा काय, अशी अनुषंगिक माहिती मागितली होती. कर्मचा-यास निवासस्थानाची सोय नियुक्ती अधिका-याने उपलब्ध करुन दिली असेल तर प्रचलित शासकीय वित्तीय नियमानुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय होत नाही. अपिलकारांचे नियुक्ती अधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य असून, त्यांनी अपिलकर्त्यांना निवासस्थान उपलब्ध करुन दिलेले नाही. असे असताना अपिलकारांच्या वेतनातून विनापरवानगी/ विनासूचना घरभाडे भत्ता कपात करण्यात येतो. सदर कपात थांबविण्यात यावी. कपात केलेला घरभाडे भत्ता परत द्यावा अशी अपिलकाराची मागणी आहे. अपिलकारांना विल्सन कॉलेजच्या प्राचार्यांनी/ संबंधित शिक्षण संस्थेने निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आली आहेत किंवा कसे, अपिलकार संबंधित शैक्षणिक संस्थेच्या जागेत राहात आहेत काय, याबाबत अपिलातील कागदपत्रावरुन खुलासा होत नाही. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकाछ्यांनी हे ओदश प्राप्त झ्ल्यापासून ४५ दिवसाच्या आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान न झाल्यास अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४१/०२**

**श्री. सुधीर वसंत हडकर,** **------ अपीलकर्ता**
**बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, वसंत सागर हॉटेलच्या बाजूला,**
**शासकीय कुटीर, बॅरेक्स क्र.१९,मुंबई-४०० ०३२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (वैद्यकीय)**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**पंचदीप भवन, ना.म.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशासन),**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**पंचदीप भवन, ना.म.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सुधीर वसंत हडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय, पंचदीप भवन, लोअर परेल, मुंबई, यांच्याकडे दि. २४.३.२००८ रोजी अर्ज करुन, राज्य कामगार विमा योजने अंतर्गतच्या पदाच्या आढाव्यासंदर्भात एकूण ४ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास अर्जातील मुद्दा क्र.२, ३, ४, ५, ९, १० हे राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, वरळी, अंधेरी, कांदिवली, मुलूंड, ठाणे, उल्हासनगर, औंध- पुणे, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर व वैद्यकीय प्रशासन अधिकारी, रा.का.वि.योजना, मुंबई, पुणे, नागपूर यांचेशी संबंधित असल्याने अर्जाच्या प्रती सर्व संबंधित रुग्णालय/ वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय यांच्याकडे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत. तरी याबाबत पुढील पत्रव्यवहार सर्व संबंधितांशी करावा असे अपिलकारा दि. १४.४.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली नाही. रा.का.वि.योजनेंतर्गत पदाचा आढावा शासन निर्णय, दि.१.१०.२००७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. सदर आढाव्याच्या विरोधात राज्य कामगार विमा योजना संघटना यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे जनहित याचिका क्र.२९४००/२००७ दाखल केली आहे. अपिलकाराने मागणी केलेली माहिती राकावि योजनेतील पदांच्या आढाव्यासंदर्भात असल्याने व सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सदरची माहिती उक्त अधिनियमातील कलम-८ (१) (ख) मधील तरतुदीनुसार देणे योग्य होणार नाही असे दि.५.५.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. दरम्यान अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच .जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय, पंचदीप भवन, लोअर परेल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, राज्य कामगार विमा योजने अंतर्गतच्या पदाच्या आढाव्यासंदर्भात एकूण ४ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. पदाच्या आढाव्याची यादी राकाविने शासनाकडे सादर केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अपिलकाराने मागितलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.५.२००८ च्या पत्राने कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरण सेवाविषयक बाबीशी संबंधित असल्याने गोपनीयतेच्या कारणावरुन माहिती नाकारणे योग्य होणार नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३३९/०२**

**श्रीमती अंजली अशोक लोटणकर,** **------ अपीलकर्ता**
**६०१, लोटस कोर्ट, हरिसदास नगर,**
**देरासर लेन, बोरीवली (प.),मुंबई-४०० ०९२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**महापालिका मार्केट इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**महापालिका मार्केट इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०० ०९२.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्रीमती अंमली अ.लोटणकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड, बोरीवली, मुंबई, यांच्याकडे दि. ३.३.२००८ रोजी अर्ज करुन, प्लॉट नं.६७८ टीपीएस-३, रामनगर शिंपोली, बोरीवली (प.) मुंबई येथे रोपवाटीकेकरिता बोअरवेल मंजूर करण्यात आली असताना टँकर भरभरुन पाण्याचा उपसा अनधिकृतपणे करण्यात येत असल्याबाबत तसेच अनधिकृत बांधकामाविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१५.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास उत्तर दिले. सदर उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय यांच्याकडे दि.५.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित करुन दि.२६.५.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराच्या अर्जातील मुद्दयानुसार अनधिकृत बांधकामाबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, मोठया प्रमाणात बोअरवेलमधून पाण्याचा उपसा करण्यात येत आहे याबाबतही आवश्यक कारवाई करुन .१५ दिवसांचे आत केलेल्या कारवाईचा अहवाल अपिलकारास कळवावा. असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी

जन माहिती अधिका-यांस निर्देश दिले. अनधिकृत बांधकामाबाबत मनपा अधिनियमातील कलम-३५१ अन्वये दि.१९.३.२००८ रोजी विश्वस्त गीतांजली जैन संघ यांना नोटीस दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.६.२००८ रोजी कळवून नोटीशीची प्रत उपलब्ध करुन दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच .जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड, बोरीवली, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, प्लॉट नं.६७८ टीपीएस-३, रामनगर शिंपोली, बोरीवली (प.) मुंबई येथे रोपवाटीकेकरिता बोअरवेल मंजूर करण्यात आली असताना टँकर भरभरुन पाण्याचा उपसा अनधिकृतपणे करण्यात येत असल्याबाबत तसेच अनधिकृत बांधकामाविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्याबाबत मागणी केली होती. रामनगर शिंपोली, बोरीवली, मुंबई येथे प्लॉट नं.६८७ येथे रोपवाटीकेकरिता बोअरवेलची मनपाने विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजुरी दिली होती. शर्ती व अटीचे उल्लंघन केल्यामुळे मनपाने दिलेल्या मंजूरीस आव्हानित करण्यात आले. या प्रकरणी दावा मा.उच्च न्यायालयात दाखल असून, गुन्हेगारास मा.उच्च न्यायालयासमोर उपस्थित राहण्याबाबत दि.१.८.२००८ रोजी वॉरंट निर्गमित करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे दिसून येते. तसे अपिलकारास अवगत करण्यात आले आहे, असे सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४०/०२**

**श्रीमती नाझनीन एस.मनियार,** **------ अपीलकर्ता**
**६०८/सी, चंचल, कल्याण कॉम्प्लेक्स,**
**यारी रोड, अंधेरी (प.),मुंबई-४०० ०६१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (३), मुंबई यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती नाझनीन एस.मनियार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२८.३.२००८ रोजी अर्ज करुन, सन १९९९ पासून किती वेळा निवडणूका घेण्यात आल्या, १९९० पासून घेतलेल्या निवडणूका, पदाधिका-यांची पदासह नांवे, पदाधिका-यांचा कालावधी, पदासाठी नामनिर्देश केलेले सभासद इ.दिप्ती शक्ती मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने सदरची माहिती पुरविता येत नाही. एम-२० बंधपत्रासाठी वापरलेले स्टॅम्प पेपर हे अनुक्रमांकाप्रमाणे असणे बंधनकारक नाही. हे संस्था स्तरावर ठेवले जातात. सदर संस्थेकडून बंधपत्राबाबतची माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच अपिलकारास पाठविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.४.२००८ च्या पत्राने कळविले. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.१७.६.२००८ रोजी सुनावणी

आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच .जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन १९९९ पासून किती वेळा निवडणूका घेण्यात आल्या, १९९० पासून घेतलेल्या निवडणूका, पदाधिका-यांची पदासह नांवे, पदाधिका-यांचा कालावधी, पदासाठी नामनिर्देश केलेले सभासद इ.दिप्ती शक्ती मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या एम-२० बंधपत्राच्या प्रती अपिलकारास उपलब्ध करुन दिल्या असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन आढळून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४२/०२**

**श्री. संदिप अर्जुन शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.पारगांव, भातोडी,**
**ता.जि.अहमदगनर- ४११ ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी,**
**आर.ए.किडवाई मार्ग,**
**ॲकवर्थ लेप्रसी कॉम्प्लेक्स,,**
**वडाळा (प.), मुंबई- ४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह संचालक,**
**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी,**
**आर.ए.किडवाई मार्ग,**
**ॲकवर्थ लेप्रसी कॉम्प्लेक्स,,**
**वडाळा (प.), मुंबई- ४०० ०३१** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संदिप अर्जुन शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्प्लेक्स, वडाळा, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य एडस कर्मचारी संघटनेने आजतागायत केलेला पत्रव्यवहार, त्यास दिलेले उत्तर याची लेखी सविस्तर माहिती, कामगार कायद्याप्रमाणे प्रयोगशाळा, तंत्रज्ञ, समुपदेशक यांना देत असलेल्या सोयी सुविधा याबाबत शासन मार्गदर्शन सूचना, जी.आर. जोखमीच्या ठिकाणी काम करीत असलेले समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना देण्यात येणारे संरक्षण, नुकसान भरपाई इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.३.२००८ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे एकूण ५८ पाने असून, प्रती प्रत रु.२/- प्रमाणे छायाप्रतीचा खर्च रु.११६/- अधिक टपाल खर्च असे एकूण रु.२२६/-इतके शुल्क भरुन प्रत्यक्ष येऊन

माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यानी अपिलकारास दि.१८.६.२००८ रोजी कळविले. अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते..जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्प्लेक्स, वडाळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य एडस कर्मचारी संघटनेने आजतागायत केलेला पत्रव्यवहार, त्यास दिलेले उत्तर याची लेखी सविस्तर माहिती, कामगार कायद्याप्रमाणे प्रयोगशाळा, तंत्रज्ञ, समुपदेशक यांना देत असलेल्या सोयी सुविधा याबाबत शासन मार्गदर्शन सूचना, जी.आर. जोखमीच्या ठिकाणी काम करीत असलेले समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना देण्यात येणारे संरक्षण, नुकसान भरपाई इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने मागितलेली माहिती मोफत मिळण्याबाबत अपिलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास संबंधित कागदपत्राच्या छायाप्रती दिल्याचे दिसून येत नाही. अतिरिक्त प्रकल्प संचालक यांनी माहितीसंबंधीच्या छायाप्रती शुल्क भरुन देण्याची तयारी दर्शविली. यावरुन अपिलकारास विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आत मोफत माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४४/०२**

**श्री. युसूफ एस. खान,** **------ अपीलकर्ता**
**हजराबाई हाऊस, २रा मजला,**
**ब्लॉक नं.७, इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २रा मजला,**
**पालीराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,**
**एस.व्ही.रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २रा मजला,**
**पालीराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,**
**एस.व्ही.रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. युसूफ एस. खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस.व्ही.रोड, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि.१६.२.२००८ रोजी अर्ज करुन, विलेपार्ले (प.) मुंबई इर्ला सोसायटी रोड येथील रियाझ हाऊस मधील तिस-या मजल्यावर अतिरिक्त बांधकाम व फेरफार केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२७.२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.३.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यानी सुनावणी आयोजित केली . जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती दिली असल्याचे नमूद करुन, दि.३०.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते..जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस.व्ही.रोड, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, विलेपार्ले (प.) मुंबई इर्ला सोसायटी रोड येथील रियाझ हाऊस मधील तिस-या मजल्यावर अतिरिक्त बांधकाम व फेरफार केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याच्या कार्यालयातील कर्मचा-यांना तक्रारीस अनुसरुन संबंधित अनधिकृत बांधकाम, फेरफारबाबत निरीक्षण करुन सदर काम मंजूर आराखडयाप्रमाणे केले आहे किंवा कसे याबाबत अहवाल सादर करण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले. परंतु अद्याप या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास दिल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४५/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव शहर-२),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**१०, शेख हाफिजउद्दीन मार्ग,**
**भायखळा, (प.), मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव शहर-२),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**१०, शेख हाफिजउद्दीन मार्ग,**
**भायखळा, (प.), मुंबई- ४०० ००८.**

**वॉर्ड ऑफीसर, ई/ विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**१०, शेख हाफिजउद्दीन मार्ग,**
**भायखळा, (प.), मुंबई- ४०० ००८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, १०, शेख हाफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. २७.११.२००७ रोजी अर्ज करुन, मनपा क्र.ईईबीपी/६४८६/एफ एल/ए, दि.१६.९.२००४ च्या बेसमेंट फ्लोअर प्लॅनमध्ये तीन कार पार्कींग एरिया आणि ड्राईव्ह वे दाखविण्यात आलेला आहे. तो फक्त कागदावरच आहे. प्रत्यक्षात मोटार बेसमेंटमध्ये येण्या जाण्यास कोणताही मार्ग ठेवलेला नाही. बेसमेंट फ्लोअर प्लॅनला मान्यता कशी

देण्यात आली, तसेच दि.१६.९.२००४ ला बीसीसी देण्यापूर्वी राजबागच्या बेसमेंटसंबंधी केलेल्या इनस्पेक्शन केलेल्या अहवालाच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१.१२.२००७ च्या पत्रान्वये असे कळविले की, अपिलकारास हवी असलेली माहिती ऊक्त अधिनियमातील कलम-२ (च) अन्वये माहितीच्या व्याख्येत बसत नाही. तसेच, राजबागच्या बेसमेंटसंबंधी केलेल्या इनस्पेक्शन प्रतीकरिता संबंधित नस्तीची अपिलकाराने पाहणी करुन, प्रती प्रत रु.२/- प्रमाणे कार्यालयात आगाऊ भरल्यानंतर अहवालाची प्रत देण्याची येईल असे कळविले. उत्तर समाधानकारक मिळाले नसल्याचे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यानी दि.१६.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी इमारत पूर्तता प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी स्थल निरीक्षण अहवालाची प्रत व जागेच्या प्रत्यक्ष पाहणीनुसार केलेल्या अहवालाची प्रत आठ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे दि.२८.४.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार अपिलकारास जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, १०, शेख हाफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मनपा क्र.ईईबीपी/६४८६/एफ एल/ए, दि.१६.९.२००४ च्या बेसमेंट फ्लोअर प्लॅनमध्ये तीन कार पार्कीग एरिया आणि ड्राईव्ह वे दाखविण्यात आलेला आहे. तो फक्त कागदावरच आहे. प्रत्यक्षात मोटार बेसमेंटमध्ये येण्या जाण्यास कोणताही मार्ग ठेवलेला नाही. बेसमेंट फ्लोअर प्लॅनला मान्यता कशी देण्यात आली, तसेच दि.१६.९.२००४ ला बीसीसी देण्यापूर्वी राजबागच्या बेसमेंटसंबंधी केलेल्या इनस्पेक्शन अहवालाच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन

माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, वॉर्ड ऑफीसर, ई/विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा (प.) मुंबई यांनी इमारतीचे निरीक्षण करुन मंजूर मूळ आराखडयानुसार नसलेले बांधकाम काढून तसे अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावे. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७२७/०२**

**श्री. इरोल सिक्वेइरा,** **------ अपीलकर्ता**
**३ अे, पृथ्वी निवास, प्रभात कॉलनी,**
**साताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (इमारती कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,**
**प्रभात कॉलनी, सांताकूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,**
**प्रभात कॉलनी, सांताकूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. इरोल सिक्वेइरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इमारत व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, सांताक्रूझ, मुंबई, यांच्याकडे दि.३.२.२००७ रोजी अर्ज करुन, पृथ्वी निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील फ्लॅट क्र.७ आणि ८ मध्ये श्री.प्रफूल शहा यांनी अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या केलेले बांधकाम काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.३.२००७ रोजी पत्रं पाठवून कार्यालयात सात दिवसाचे आत भेटण्याबाबत कळविले होते. सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास सुनावणीकरिता कार्यालयात बोलाविण्याची अधिनियमात तरतूद नाही. दि.३.२.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती विहित कालावधीत द्यावी असे अपिलकाराने दि.७.३.२००७ रोजी पत्र पाठवून जन माहिती अधिका-यांना कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग यांचेकडे दि.२८.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित

होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्री.व्ही.जे.देसाई (इमारती व कारखाने) एच/पूर्व विभाग हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इमारत व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, सांताक्रूझ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पृथ्वी निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील फ्लॅट क्र.७ आणि ८ मध्ये श्री.प्रफूल शहा यांनी अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या केलेले बांधकाम काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही. सुनावणीचे वेळीही माहिती सादर केली नाही. यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाला आहे. यामुळे उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई का करु नये याबाबत जन माहिती अधिकारी यांना दि.१७.११.२००८ रोजी पत्र पाठवून आयोगाकडे दि.२९.११.२००८ पूर्वी प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार विलंबाने, चुकीची माहिती दिल्याबद्दल, विहित कालावधीत माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिका-यांना शास्ती लावण्यापूर्वी त्यांना आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. परंतु, जन माहिती अधिका-यांनी खुलासा सादर केला नाही. माहितीच्या अर्जाची प्रकरणे जन माहिती अधिका-यांनी अधिक काळजीपूर्वक व तातडीने हाताळणे आवश्यक आहे. तसे या प्रकरणी जन माहिती अधिका-याकडून झालेले नाही. अपिलकाराने दि.३.२.२००७ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि.३.३.२००७ पर्यंत माहिती देणे आवश्यक होते. तेव्हा याप्रकरणी दीड वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. तरी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती पुरविलेली नाही. विलंबासाठी माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रु.२५०/- इतकी शास्ती लादण्याची अधिनियमात तरतूद आहे. तथापि, शास्तीची एकूण रक्कम रु.२५,०००/-पेक्षा अधिक असणार नाही अशी अधिनियमात तरतूद आहे.

सबब जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री.व्ही.जे.देसाई यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही. यासाठी त्यांना या प्रकरणी जबाबदार धरण्यात येत आहे व त्यांच्यावर रु.१५,०००/-इतकी शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती श्री.व्ही.जे.देसाई यांच्या वेतनातून समान पाच हप्त्यात

रुपये ३०००/- प्रमाणे वसूल करण्यांत यावी. जानेवारी, २००९ (देय फेब्रूवारी, २००९) या महिन्यापासून सदर शास्ती वसूल करण्यात यावी व शासनाच्या संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करुन, याबाबतचा अहवाल आयोगास पाठवावा. हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी. सबब, पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**अपिलकाराने मागितलेली माहिती पुरविलेली नाही. यासाठी जबाबदार सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) यांच्यावर रु.१५,०००/- एवढया रकमेची शास्ती लादण्यात येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४६/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.३०६, बिल्डिंग नं.१०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,**
**मानखुर्द, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मिळकत व्यवस्थापक-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विशाल रामदास भोगे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांच्याकडे दि.२२.२.२००८ रोजी अर्ज करुन, ॲन्थोनी सॅबेस्टीन व हेनत सॅबेस्टीन यांच्या कागदपत्रांचा व बळकावलेल्या म्हाडाच्या जागेचा संबंध आहे का, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ॲन्थोनी सॅबेस्टीन व हेनत सॅबेस्टीन यांच्या कागदपत्रांचा व बळकावलेल्या म्हाडाच्या जागेचा संबंध आहे का, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. ॲन्थोनी सॅबेस्टीन यांना म्हाडा कार्यालयाने निष्कासन नोटीस क्र.४२३४, दि.२८.१०.२००५ दिली होती. नोटीसला अनुसरुन त्यांनी कागदोपत्री पुरावे साक्षांकित करुन कार्यालयात दिले असल्याचे म्हटले आहे. त्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व सिटी सर्वे क्र.१४२४, ऑफीय बि.नं.५ च्या मागे, सुभाषनगर, चेंबूर, ७१ या जागेशी या कागदपत्राचा संबंध जुळतो का ? खुलासा मिळणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेले कागदपत्र विहित कालावधीत दिले नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेशं देतो की, अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४७/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.३०६, बिल्डिंग नं.१०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,**
**मानखुर्द, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मिळकत व्यवस्थापक-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक-३,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. विशाल रामदास भोगे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबस्टीन व हेलन ॲन्थोनी सॅबेस्टीन यांचे २५०० चौ.फूट जागेचे अनधिकृतपणे केलेले बांधकाम तोडण्यासाठी कार्यालयाने दि.२८.१०.२००५ रोजी नोटीस दिलेली होती. वकीलाच्या पत्रावरुन स्थगिती कां दिली पत्र क्र.सीए-१/म्हाडा/१२९०५ यांची प्रत व वकीलाच्या नोटीस ची साक्षांकित प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहितकालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबर्स्टीन व हेलन ॲन्थोनी सॅबेस्टीन यांचे २५०० चौ.फूट जागेचे अनधिकृतपणे केलेले बांधकाम तोडण्यासाठी कार्यालयाने दि.२८.१०.२००५ रोजी नोटीस दिलेली होती. वकीलाच्या पत्रावरुन स्थगिती कां दिली़ पत्र क्र.सीए-१/म्हाडा/१२९०५ यांची प्रत व वकीलाच्या नोटीस ची साक्षांकित प्रत व इतर नुषंगिक माहिती मागितली होती. श्री.ॲन्थेनी सॅबेस्टीन व त्यांची पत्नी श्रीमती हेलन सॅबेस्टीन यांचे अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी नोटीस दिल्यानंतर पुढे काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती अपिलकरास जन माहिती अधिका-यांनी दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश् देतो की, अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१३४८/०२**

**श्री. राकेशकुमार सिंघ,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- श्री.हेमंत चिराग,**
**३, रामनिवास रानडे पोस्ट ऑफीस समोर,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई विद्यापीठ,रुम नं.११४,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**पुनर्मूल्यांकन आणि पडताळणी युनिट,**
**परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. राकेशकुमार सिंघ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा पुनर्मूल्यांकन आणि पडताळणी युनिट, परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई, यांच्याकडे दि.३०.११.२००७ रोजी अर्ज करुन, सन २००७ मध्ये घेण्यात आलेल्या एम.ए. राज्यशास्त्र बैठक क्र.३०९८ च्या निकालासंबंधी मागणी केलेल्या पुनर्मूल्यांकनाचा निकाल सहा दिवसांत जाहीर केला नसल्याबाबतची कारणे व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.१२.२००७ च्या पत्राने माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ४.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराने मागणी केलेली माहिती दि.१८.१२.२००७ च्या पत्राने दिली असल्याने नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.३.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा पुनर्मूल्यांकन आणि पडताळणी युनिट, परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सन २००७ मध्ये घेण्यात आलेल्या एम.ए. राज्यशास्त्र बैठक क्र.३०९८ च्या निकालासंबंधी मागणी केलेल्या पुनर्मूल्यांकनाचा निकाल सहा दिवसांत जाहीर केला नसल्याबाबतची कारणे व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. पुनर्मूल्यांकनाचा निकाल ८.११.२००७ रोजी जाहीर केला. पुनर्मूल्यांकन समितीच्या निर्णयाची प्रत गोपनीय असल्याच्या कारणावरुन अपिलकारास नाकारण्यात आली. प्रश्नानिहाय मिळालेले गुण व पुनर्मूल्यांकनानुसार निश्चित केलेले दोन्ही पेपरच्या गुणासंबंधीची माहिती अपिलकारास दिलेली नाही. सदर मागणी प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन नाकारण्यात आल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश् देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जरी प्रश्न स्वरुपाची असली तरी जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५१/०२**

**श्री. सदाशिव तुकाराम सोनवणे,** **------ अपीलकर्ता**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**१५२/ ५११९, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**इमारत क्र. १५२, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सदाशिव तुकाराम सोनवणे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि. नेहरुनगर, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे दि.११.३.२००८ रोजी अर्ज करुन, भिम-लाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन खर्चासाठी दिलेल्या रकमेच्या पावत्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी अशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत, असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि. नेहरुनगर, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भिम-लाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन खर्चासाठी दिलेल्या रकमेच्या पावत्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्या कारणाने ती माहिती अपिलकारास देण्यात आलेली नाही. ती माहिती अपिलकारास पुरविण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेस शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या भरीव आर्थिक सहाय्य मिळाले नसेल तर अशा संस्था माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाहीत. यावरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकालात काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५२/०२**

**श्री. रोमन एन.सिल्व्हेरा,** **------ अपीलकर्ता**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**१५२/ ५१०५, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**वांद्रे (प.),मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**वांद्रे (प.),मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रोमन एन.सिल्व्हेरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२९.१.२००८ रोजी अर्ज करुन, सावेनिअर अपार्टमेंट, डॉ.पीटर दायस रोड, वांद्रे (प.), मुंबई येथील सदनकिा क्र..१२ मध्ये केलेल्या अनधिकृत कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडली नाहीत. संबंधित फाईलचा पुन्हा जन माहिती अधिका-यांनी शोध घ्यावा. त्यानंतर अपिलकारा आवश्यक ती माहिती पुरवावी असे दि.९.५.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशान समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सावेनिअर अपार्टमेंट, डॉ.पीटर दायस रोड, वांद्रे (प.), मुंबई येथील सदनकि क्र..१२ मध्ये केलेल्या अनधिकृत कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबधीची कागदपत्रे पुन्हा शोध घेऊनही सापडली नाहीत. त्यामुळे माहिती देता आली नाही. जन माहिती अधिका-यांनी श्री.सिल्व्हेरा आणि श्रीमती एम.डिक्रूझ यांच्या समवेत नव्याने सदनिका क्र.१२.चे निरीक्षण करण्यांत आले. सदनिका धारकास ग्रिल व घडीचा दरवाला बदलण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच याबाबत सदनिका क्र.१२ च्या मालकास पत्र देण्यात अले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२८.७.२००८ रोजी कळविण्यात आल्याचे प्रतिपादन केले. यावरुन अपिलकाराने मागणी केल्यानुसार सदर प्रकरणी कारवाई पूर्ण झाली असल्याचे दिसून येते.सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५३/०२**

**श्रीमती स्वाती देवचंद कनवाळू, ------ अपीलकर्ता**
**सोव्हेनिर अपार्टमेंट्स, फ्लॅट नं.११,**
**डॉ.पीटर दायस रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**भिम- लाईट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**इमारत क्र. १५२, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई-४०० ०२४. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती स्वाती देवचंद कनवाळू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि. नेहरुनगर, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी अर्ज करुन, भिम लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि.या संस्थेच्या मालमत्ता कर दि.१.४.८६ ते दि.३१.३.९३ या कालावधीसाठी भरणा केलेल्या रकमेच्या पावत्या इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले की, अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत असल्याचे दि.२०.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, भिम-लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि. नेहरुनगर, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, भिम लाईट को.ऑप.हौ.सोसायटी लि.या संस्थेच्या मालमत्ता कर दि.१.४.८६ ते दि.३१.३.९३ या कालावधीसाठी भरणा केलेल्या रकमेच्या पावत्या इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. सहकारी गृहनिर्माण संस्थेस शासनाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या आर्थिक सहाय्य झाले नसल्यास अशा संस्था माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाहीत. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. परंतु अपिलकारावर जर अन्याय होत असेल तर तो दूर करण्यासाठी त्यांनी सहकार कायद्याने सहकार विभागातील सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी.

. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकालात काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५९/०२**

**श्री. अनिल ठाकूर,** **------ अपीलकर्ता**
**अब्बास चाळ, ८१, रुम नं.५,**
**व्ही.एन.पुरव मार्ग, चुनाभट्टी,**
**सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा वित्त नियंत्रक**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. अनिल ठाकूर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २७.५.२००८ रोजी अर्ज करुन, सीटीएस नं. ४७१, ४७१/१ ते ३० आणि ४७२, ४७२/१ ते २० व्हीलेज कुर्ला, व्ही.एन.पुरव मार्ग, सायन, चुनाभट्टी (पूर्व), श्री.सत्यनारायण सोसायटी, अमेय विकासकाबाबत परिशिष्ट-३ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३० मे,२००८ च्या पत्राने पुढीलप्रमाणे उत्तर दिले. "विकासकाकडील परिशिष्ट-३ व इतर कागदपत्रे /दस्तऐवज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक दि.१३.११.९७ अन्वये गोपनीय ठेवले जातात. उक्त अधिनियमातील कलम-८ च्या पोटकलम (१) (ड) अन्वये अशी माहिती उघड करण्यास प्रतिबंध आहे. यास्तव अशी माहिती देता येत नाही ".

सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२६.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सीटीएस नं. ४७१, ४७१/१ ते ३० आणि ४७२, ४७२/१ ते २० व्हीलेज कुर्ला, व्ही.एन.पुरव मार्ग, सायन, चुनाभट्टी (पूर्व), श्री.सत्यनारायण सोसायटी, अमेय विकासकाबाबत परिशिष्ट-३ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण परिपत्रक-२ प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसनविषयक इमारत प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) मध्ये शासनाने विकासकांच्या पाच वर्षामध्ये मुंबई व आसपास केलेल्या बांधकामाची माहिती व त्यावरचा एकूण खर्च, त्याचप्रमाणे ज्या योजनेसाठी विकासक पुढे येत आहे त्यांच्या प्रस्तावित बांधकामाच्या निदान २५% क्षेत्रफळाएवढे बांधकाम त्याने गेल्या पाच वर्षात केलेले असणे आवश्यक आहे. अन्यथा तो त्या कामासाठी अपात्र ठेरल व हे नियम ५०० चौ.मी.च्यावर असल्यास लागू होतो. त्याप्रमाणे दि.२७.५.२००८ रोजी माहितीच्या आधारे कामाचा अनुभव मागितला असता दि.३०.५.२००८ रोजी कामाचा अनुभव विषयीचे कागदपत्रे विकासकाने परिशिष्ट-३ सोबत जोडले आहे व ते गोपनीय ठेवले जातात असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३६१/०२**

**श्री. रमेश चरणदास चांदेकर,** **------ अपीलकर्ता**
**ब-२७०/६, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक,**
**प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,**
**डॉ.आम्ब्रेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक,**
**प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,**
**डॉ.आम्ब्रेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. रमेश चरणदास चांदेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक, प्रशासकीय इमारत, शासकीय वसाहत, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २१.२.२००८ रोजी अर्ज करुन, कार्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंत अनुसूचित जमाती या प्रवर्गामधील सरळ सेवेने व पदोन्नतीने भरलेली पदे इ.एकूण आठ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१९.३.२००८ च्या पत्राने माहिती दिली. इतर संवर्गाची माहिती व जोडपत्र-क नुसार मागितलेली कगदपत्रे उपलब्ध करुन देण्याचे अधिनियमातील कलम-८(१), पोटकलम (त्र) नुसार आबंधन नाही असे अपिलकारास कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी  दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.  तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भाषा संचालक, प्रशासकीय इमारत, शासकीय वसाहत, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कार्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंत अनुसूचित जमाती या प्रवर्गामधील सरळ सेवेने व पदोन्नतीने भरलेली पदे इ.एकूण आठ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.  जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अर्धवट, अपुरी व संदिग्ध असलयामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते.  प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली होती. परतु अद्याप आदेश पारित केले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की,  प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून सदर प्रकरणी १५ दिवसाचे आंत आवश्यक ते आदेश पारित करुन अपिलकारास कळवावे.  यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५५/०२**

**श्री. मोहम्मद युसूफ फारुख खान, ------ अपीलकर्ता**
**ब-८मुस्तफा चाळ, अचनाक नगर,**
**मुब्रा- ठाणे, ४०० ६१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ,**
**खोली नं.७४, तळमजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा),**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक,**
**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ,**
**खोली नं.७४, तळमजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा),**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. मोहम्मद युसूफ फारुख खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१२.५.२००८रोजी अर्ज करुन, अपंग वित्त विकास महामंडळ चालू झाल्यापासून ते आजतागायत मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच ठाणे जिल्हयातून किती अपंगांनी महामंडळाकडे कर्जासाठी अर्ज केले आहेत याबाबतची अनुषंगिक चार मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१९.७.२००८ च्या पत्राने माहितीपोटी अंदाजे रु.३६,०००/- इतके शुल्क कार्यालयात भरण्याबाबत कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन माहितीपोटी रु.३६,६००/- इतके शुल्क कार्यालयात भरण्याबाबत अपिलकारास दि.२३.७.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिका-यांनी कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अपंग वित्त विकास महामंडळ चालू झाल्यापासून ते आजतागायत मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच ठाणे जिल्हयातून किती अपंगांनी महामंडळाकडे कर्जासाठी अर्ज केले आहेत याबाबतची अनुषंगिक चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलकाराने मोठया प्रमाणात कागदपत्राची मागणी केलेली दिसते. सदर मागणीचे स्वरुप लक्षात घेता मी असे आदेश् देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक तेवढया उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याचे दिसून येते. माहिती पुरविण्याकरिता केलेल्या विलंबाबात जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५८/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार,** **------ अपीलकर्ता**
**हनुमान मित्रमंडळ, परळ,**
**अंबा चाळ वाडी, जहाँगिर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. संजय गंगाराम पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२९.१०.२००७ रोजी अर्ज करुन, अंबा चाळ वाडी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या प्रस्तावाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, अभिलेख टिप्पण्या तसेच काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत, पत्रव्यवहाराची पाहणी व आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती इ. अनुषंगिक माहिती देण्याची मागणी केली होती.

उपलब्ध दस्तऐवज अभिलेख व सामुग्रीचे निरीक्षण करण्याकरिता विहित शुल्क भरुन सोमवार ते शुक्रवार या दिवशी कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० ते ५.०० या कालावधीत निरीक्षणाकरिता हजर रहाण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २१.११.२००७ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-यांनी कागदपत्राच्या निरीक्षणाकरिता वेळ देवूनही कार्यालयात उपस्थित राहिले नसल्याने कागदपत्राचे निरीक्षण करता आले नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.१२.२००७रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.

अपिलकारास संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता दि.१६.२.२००८ रोजी व्यवस्था करावी अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना तोंडी सूचना दिलया. आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास निरीक्षणाकरिता कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नाहीत. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अंबा चाळ वाडी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या प्रस्तावाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, अभिलेख टिप्पण्या तसेच काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत, पत्रव्यवहाराची पाहणी व आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. आवश्यक कागदपत्र अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यानी जन माहिती अधिका-यांस सूचना देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कागदपत्र उपलब्ध करुन दिले नाहीत. सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश् देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आवश्यक ती कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे संबंधित कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास निरीक्षणाकरिता विहित कालावधीत कागदपत्र उपलब्ध करुन दिली नाहीत. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत १५ दिवसाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५७/०२**

**डॉ. एस.एस. प्रभू,** ------ **अपीलकर्ता**
**बी-२३,उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक म्हाडा,**
**२ रा मजला, रुम नं.३६९, गहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक म्हाडा,**
**२ रा मजला, रुम नं.३६९, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** ------- **उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२१.२.२००८ रोजी अर्ज करुन, दि.६.८.२००७, १३.८.२००७, १२.११.२००७, १४.११.२००७ व २०.११.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची एकूण आठ मुद्दयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने सदर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा

उपनिबंधक म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.६.८.२००७, १३.८.२००७, १२.११.२००७, १४.११.२००७ व २०.११.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची एकूण आठ मुद्दयाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही तर अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करण्याची उक्त अधिनियमातील कलम १९ (१) अनुसार अपिलकारास एक संधी आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान न झाल्यास अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीली दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३५६/०२**

**डॉ. एस.एस. प्रभू,** **------ अपीलकर्ता**
**बी-२३,उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक म्हाडा,**
**२ रा मजला, रुम नं.३६९, गहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक म्हाडा,**
**२ रा मजला, रुम नं.३६९, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २४.३.२००८ रोजी अर्ज करुन, शास्त्रीनगर, द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत क्र.७, शास्त्रीनगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई या संस्थे संबंधीची नस्ती/ कागदपत्रांचे निरीक्षण करण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा

उपनिबंधक म्हाडा,  गृहनिर्माण भवन, वांद्रे,  मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन,  शास्त्रीनगर, द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत क्र.७, शास्त्रीनगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई या संस्थे संबंधीची नस्ती/ कागदपत्रांचे निरीक्षण करण्याची मागणी केली होती. अपिलकाराने निरीक्षणाकरिता मागणी केलेली कागदपत्रे/ नस्ती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही.  प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही तर अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करण्याची उक्त अधिनियमातील कलम १९ (१) अनुसार अपिलकारास एक संधी आहे.  या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान न झाल्यास अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३६०/०२**

**श्री. संजय रामकृष्ण सुरवाडे,** **------ अपीलकर्ता**
**एच-२, बी.बी. रुम नं.४, लेकसाईड,**
**आय.आय.टी.पवई, मुंबई- ४०० ०७६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**आय.आय.टी.पवई, मुंबई- ४०० ०७६.**

**जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, एच.सी.यु.**
**आय.आय.टी.पवई, मुंबई- ४०० ०७६.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. संजय रामकृष्ण सुरवाडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, एच.सी.यु. आय.टी. पवई, मुंबई, यांच्याकडे दि.१७.३.२००८ रोजी अर्ज करुन, कोणाच्या आदेशाने अपिलकारावर चौकशी समिती बसविण्यात आली याबाबत सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, एच.सी.यु. आय.टी. पवई, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कोणाच्या आदेशाने अपिलकारावर चौकशी समिती बसविण्यात आली याबाबत सविस्तर माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत

सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. अपिलकाराने एच.सी.यु. आय.आय.टी. पवई, मुंबई या संस्थेच्या जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली आहे. आय.आय.टी.पवई, मुंबई ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारितील संस्था असल्याने ती राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. सदर प्रकरणी अपिलकाराने केंद्रिय माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३६३/०२**

**श्री. सुधीर वसंत हडकर,** **------ अपीलकर्ता**
**बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग, वसंत सागर हॉटेलच्या बाजूला,**
**शासकीय कुटीर-८, बॅरेक्स क्र.१९,**
**मुंबई- ४०० ०३२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (वैद्यकीय)**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,**
**पंचदीप भवन, ६ वा मजला,**
**लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन),**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,**
**पंचदीप भवन, ६ वा मजला,**
**लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. सुधीर वसंत हडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन), आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, पंचदीप भवन, लोअर पेरल, मुंबई, यांच्याकडे दि. ५.५.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.संजय बाबूराव जाधव यांच्यावर उल्हासनगर येथील प्रकरणाबाबत चालू असलेल्या केसबाबतची संपूर्ण कागदपत्रे/ दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रतीची तसेच अनुषंगिक एकूण १४ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन), आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, पंचदीप भवन, लोअर पेरल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन श्री.संजय बाबूराव जाधव यांच्यावर उल्हासनगर येथील प्रकरणाबाबत चालू असलेल्या केसबाबतची संपूर्ण कागदपत्रे/ दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रतीची तसेच अनुषंगिक एकूण १४ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी का प्रस्तावित करण्यात येऊ नये, यासंबंधी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७०/०२**

**डॉ. गिरीष संघवी,** **------ अपीलकर्ता**
**३, कृष्णा इमारत, ३४ खेतवाडी,**
**६ वा लेन, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार डॉ.गिरीष संघवी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई, यांच्याकडे दि. २१.३.२००८ रोजी अर्ज करुन, गृहनिर्माण संस्था दंड आकारु शकते का, सोसायटी फ्लॅटचा एरिया वाढवू शकते का, उप निबंधकांनी यावर कार्यवाही न केल्यास विभागाची भूमिका काय, गळती, दुरुस्ती इ.बाबत सोसायटीकडून केला जाणारा लाखो रुपयांचा खर्च इ.बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ५ च्या कलम २ (च) अनुसार अपिलकाराने मागितलेली माहिती या व्याख्येत बसत नसल्याने अपिलकारास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१९.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन गृहनिर्माण संस्था दंड आकारु शकते का, सोसायटी फ्लॅटचा एरिया वाढवू शकते का, उप निबंधकांनी यावर कार्यवाही न केल्यास विभागाची भूमिका काय, गळती, दुरुस्ती इ.बाबत सोसायटीकडून केला जाणारा लाखो रुपयांचा खर्च इ.बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. सहकारी गृहनिर्माण संस्था नमुनेदार उपविधी दि.२.७.२००१ पासून लागू करण्यात आली आहे. या उप विधीतील क्र.७२ नसार थकविलेल्या रकमेवर व्याज आकारण्याचे अधिकार सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेले आहे. संस्थेला कोणत्या आधारावर क्षेत्रफळामध्ये बदल केला याबाबत संस्थेकडून माहिती घेता येईल किंवा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे दाद मागता येईल. त्यानंतरही समाधानकारक कार्यवाही झाली नाही तर संबंधित सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे अपील करता येईल. त्यानंतर शासनाकडे पुर्ननिरीक्षणाची तरतूद अधिनियमात आहे. उपविधी क्र.१६० मध्ये संस्थेने कोणत्या दुरुस्त्या कराव्यात याचा समावेश आहे. इ. मुद्देनिहाय माहिती प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेशात नमूद करुन दि.१९.६.२००८ रोजी आदेश पारित केले आहेत. यावरुन अपिलकाराने अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयांचा खुलासा केल्याचे दिसून येते. अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक आदेश पारित केले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७१/०२**

**श्री. भारत विरचंदजी गुर्जर,** **------ अपीलकर्ता**
**७, गझरदर स्ट्रीट, श्रीजी भवन,**
**जे.एस.एस.रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**विकास आणि योजना,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. भारत विरचंदजी गुर्जर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, विकास आणि योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन, दि.२५.२.२००५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२३.४.२००८ च्या पत्राने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ (९) अनुसार माहिती पुरविता येत नाही. अपिलकाराने इमारत बांधकामासंबंधीचा प्रस्ताव सीटी सर्व्हे क्र., प्लॉट क्रमांक, परिसर इ.बाबत नमूद करुन विशिष्ट अशी माहितीची मागणी केल्यास उपलब्ध माहिती अपिलकारास देता येईल असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, विकास आणि योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.२५.२.२००५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२५.२.२००५ रोजीच्या बैठकीत आयुक्त, महानगरपालिका, मुंबई यांना दिलेलया निदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अपिलकाराची मागणी आहे. अपिलकाराने विशिष्ट अशा प्रकरणासंबंधी माहिती मागितली नाही. विशिष्ट प्रकरणासंबंधी माहिती मागितल्यास उपलब्ध माहिती अपिलकारास देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास कळविले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून यते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७२/०२**

**श्री. भारत विरचंदजी गुर्जर, ------ अपीलकर्ता**
**७, गझरदर स्ट्रीट, श्रीजी भवन,**
**जे.एस.एस.रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**बांधकाम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई- ४०० ०१०. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. भारत विरचंदजी गुर्जर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, बांधकाम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि.२८.२.२००८ रोजी अर्ज करुन, महानगरपालिकेच्या मालमत्तेची दुरुस्ती, पुनर्बांधणी, रिन्युव्हेशन, इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून, त्याकरिता मनुष्यबळ, यंत्रसामुग्री याचा मोठया प्रमाणात वापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर माहिती पुरविणे शक्य होणर नाही. तथापि, एखाद्या विशिष्ट कामाची किंवा विशिष्ट कालावधीची नेमकी माहिती हवी असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात येईल. असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.३.२००८ रोजी कळविले. अपिलकारास आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील तयार ठेवण्यात आला आहे. सदर अहवाल १००० पानांचा असल्यामुळे रु.२०००/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी माहितीपोटी रु.२०००/- एवढे शुल्क भरुन १००० प्रती कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले होते. परंतु अपिलकाराने प्रती प्राप्त

करुन घेतल्या नाहीत. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास निरीक्षणाकरिता संबंधित कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक तेवढया कागदपत्राच्या छायाप्रती उपलब्ध करुन द्याव्यात असे नमूद करुन दि.३६.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, बांधकाम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन महानगरपालिकेच्या मालमत्तेची दुरुस्ती, पुनर्बांधणी, रिन्युव्हेशन, इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७३/०२**

**श्री. भारत विरचंदजी गुर्जर,** **------ अपीलकर्ता**
**७, गझदर स्ट्रीट, श्रीजी भवन,**
**जे.एस.एस.रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**विकास आणि योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. .** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. भारत विरचंदजी गुर्जर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, विकास आणि योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१९.६.२००७ रोजी अर्ज करुन, मुख्य अभियंता, विकास आणि योजना यांच्याकडून बरीच परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत. याबाबतची पुस्तिका विभागाकडून तयार करण्यात आली आहे. त्याबाबत माहितीच्या अधिकारासंबंधीची परिपत्रके आहेत. सदर कागदपत्राची निरीक्षण करण्याची, त्यानंतर आवश्यक परिपत्रकाच्या प्रतीची मागणी केली होती.

विशिष्ट अशा परिपत्रकाचा क्रमांक दिल्यास त्याबाबत छायाप्रत अपिलकारास उपलब्ध करुन देण्यात येईल. अपिलकाराने अर्जात नमूद केल्याप्रमाणे परिपत्रकासंबंधीची विभागात पुस्तिका तयार करण्यात आलेली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.६.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २१.८.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली . अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे विभागात परिपत्रकाची पुस्तिका तयार करण्यात आलेली नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध असलेल्या परिपत्रकाच्या प्रती पुरवाव्यात असे प्रथम अपिलीय

अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना निदेश देऊन आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, विकास आणि योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मुख्य अभियंता, विकास आणि योजना यांच्याकडून बरीच परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत. याबाबतची पुस्तिका विभागाकडून तयार करण्यात आली आहे. त्याबाबत माहितीच्या अधिकारासंबंधीची परिपत्रके आहेत. सदर कागदपत्राची निरीक्षण करण्याची, त्यानंतर आवश्यक परिपत्रकाच्या प्रतीची मागणी केली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पकउत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७४/०२**

**श्री. जोक्वीम फ्लोरीनो मारीनो जोस फर्नांडीस,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-मेसर्स डीएसके लिगल, ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर,**
**एक्सप्रेस टॉवर, ४ था मजला,**
**नरीमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जनरल मॅनेजर (आस्थापना),**
**सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर,**
**नवी मुंबई- ४०० ६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**व्यवस्थापक (टाऊन सर्व्हिस),**
**सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर,**
**नवी मुंबई- ४०० ६१४.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. जोक्वीम फ्लोरीनो मारीनो जोस फर्नांडीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, यांच्याकडे दि. २००८ रोजी अर्ज करुन, अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन अनुषंगिक माहिती

मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं् देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी का प्रस्तावित करण्यात येऊ नये, यासंबंधी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७५/०२**

**श्री. अश्विन जोशी व इतर,** **------ अपीलकर्ता**
**झवेरी इमारत, व्यापारी रहिवासी भादुत मंडळ,**
**१८७, भुलेश्वर रोड, बाटा शॉपजवळ,**
**मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अश्विन जोशी व इतर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे दि.२८.१.२००८ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिकेने अर्जदाराच्या दि.१.१.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२८.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी २८ दिवस उशिराने माहिती दिली असल्याने त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याबाबत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.२६.५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने अर्जदाराच्या दि.१.१.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी उशिराने दि.२८.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीच्या अर्जावर विहित कालावधीत कारवाई करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उशिराने माहिती दिली आहे. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भविष्यात केंद्रिय माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे. सदर प्रकरणी अपिलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७६/०२**

**श्री. रविंद्र मुरलीधर कालेकर, ------ अपीलकर्ता**
**१०३/अे, अमित दर्शन सोसायटी,**
**दादाभाई x रोड नं.३,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त, (विशेष अभियांत्रिकी),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. ------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. रविंद्र मुरलीधर कालेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे दि.५.३.२००८ रोजी अर्ज करुन, अपिलकाराच्या दि.१८.१२.२००७ व दि.५.३.२००८ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.५.२००८ सुनावणी आयोजित करुन दि.७.६.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास अर्जामधील (i) b मधील उप आयुक्त (सा.प्र.) यांना अहवाल सादर केला असल्यास त्यांची प्रत व अहवाल सादर केला नसल्यास त्वरित अहवाल सादर करुन त्याची प्रत विनामूल्य अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अर्जातील अनु.क्र.५ व ६ मध्ये त्यांनी निवडलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अपिलकारास विनामूल्य देण्यात याव्यात. अपिलकारास माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पत्राद्वारे कळविण्यात यावे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अपिलकाराच्या दि.१८.१२.२००७ व दि.५.३.२००८ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवुनही अद्याप अपिलकारास माहिती देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेशं् देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७७/०२**

**श्री. अजय यशवंत देसाई, ------ अपीलकर्ता**
**अे/४, रिलायन्स एनर्जी स्टाफ क्वॉर्टर्स,**
**मागाठाणे डेपोसमोर, टाटा पॉवर हाऊस,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ङ ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रविंद्र मुरलीधर कालेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे दि.९.१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. रमेश पांडे यांना ४० टक्के जमीन देण्याचा न्यायालयाच्या आदेशाची प्रत, उर्वरित ६० टक्के जमीन म्हाडाच्या ताब्यात आहे त्याच्या सीमा दर्शविण्यात याव्यात, ठराव क्र.६०७७, दि.२३.८.२००७ ची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.४.२००८ च्या पत्राने माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २९.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. टराव क्र.६०७७ नुसार बिल्डरला ४० टक्के जागा दिल्यानंतर जी ६० टक्के जागा शिल्लक आहे त्या जागेचा नकाशा अपिलकारास त्वरित पुरविण्यात यावा. माहिती अधिकाराच्या कक्षेमध्ये ही बाब नसली तरी उपरोक्त जमिनीचे कंपाऊंड घालून कार्यकारी अभियंता, वांद्रे विभाग, मुंबई मंडळ यांनी संरक्षण करावे. व अतिक्रमण होणार नाही याची काळजी घ्यावी असे आदेश पारित केले. प्रथम अपिलाीय अधिका-याच्या आदेशानुसार जागेच्या नकाशाची प्रत मिळाली नाही. जागेचा कंपाऊंउ भिंत बांधली नाही. यामुळे अपिलकाराने

राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री. रमेश पांडे यांना ४० टक्के जमीन देण्याचा न्यायालयाच्या आदेशाची प्रत, उर्वरित ६० टक्के जमीन म्हाडाच्या ताब्यात आहे त्याच्या सीमा दर्शविण्यात याव्यात, ठराव क्र.६०७७, दि.२३.८.२००७ ची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.१०.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी हे आदेश पारित झाल्यापासून १५ दिवसांचे आत जागेच्या नकाशाची प्रत व अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३७८/०२**

**श्री. प्रकाश जगन्नाथ वाणी,** **------ अपीलकर्ता**
**केदार-४, बी.सी.रोड,**
**मरिन ड्राईव्ह, मुंबई- ४०० ०२०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रकाश जगन्नाथ वाणी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.३०.१.२००८ रोजी अर्ज करुन, आदिवासी विकास विभागातील गट -अ व गट-ब मधील अधिका-यांची वर्षवार संख्या, ज्या अधिका-यांचे गोपनीय अहवाल उत्कृष्ट किंवा अतिउत्कृष्ट श्रेणीत आहेत त्यापैकी किती अधिका-यांना गोपनीय अहवालाची माहिती प्रत्यक्ष कळविण्यात आली. किती अधिका-यांना प्रोत्साहनपर वेतन देण्यात आले, नसत्यास त्याची कारणे इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२९.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्दा क्र.१ बाबत माहितीपोटी रु.१६४/-इतके शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले. मुद्दा क्र.२ प्रश्नार्थक स्वरुपाचा असल्याने अपिलकाराने मागणी केलेली आकडेवारी अभिलेख स्वरुपात उपलब्ध नाही. मुद्दा क्र.३ व ४ बाबत प्रोत्साहनपर वेतनवाढी दिल्याची कोणतीही माहिती अभिलेख स्वरपात उपलब्ध नसल्याचे नमूद करुन अादिवासी विकास विभागातील गट अ व गट ब मधील सरळसेवा, पदोन्नतीने भरलेल्या पदाबाबतची आकडेवारी अपिलकारास उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.३.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. मुद्दा क्र.१ बाबत अपिलकाराने

मागितलेली माहिती अभिलेख स्वरुपात जशी उपलब्ध आहे तशी द्यावी. मुद्दा क्र.२,३, व ४ बाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उक्त अधिनियमातील कलम २ (च) २ (त्र) नुसार देता येत नसल्याचे दिलेले उत्तर योग्य आहे. तथापि, अपिलकारास गोपनीय अहवाल प्रत्यक्ष पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत. आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक या क्षेत्रिय कार्यालयाकडील अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्धतेनुसार देता येणे शक्य असल्यास ती अपिलकारास द्यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आदिवासी विकास विभागातील गट -अ व गट-ब मधील अधिका-यांची वर्षवार संख्या, ज्या अधिका-यांचे गोपनीय अहवाल उत्कृष्ट किंवा अतिउत्कृष्ट श्रेणीत आहेत त्यापैकी किती अधिका-यांना गोपनीय अहवालाची माहिती प्रत्यक्ष कळविण्यात आली. किती अधिका-यांना प्रोत्साहनपर वेतन देण्यात आले, नसत्यास त्याची कारणे इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. मागितलेली माहिती न देता वेगळयाच माहितीचे कागदपत्र देण्याची तयारी दर्शवून त्याबद्दल अनावश्यक रक्कम भरण्याबाबत अपिलकारास कळविले असल्याचा मुद्दा द्वितीय अपिलात उपस्थित करण्यात आला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची धारिका अपिलकारास निरीक्षणाकरिता प्रथम उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३८९/०२**

**श्री. विनोद नायर,** **------ अपीलकर्ता**
**९/१३६, सरदार नगर -४,**
**सायन, कोळीवाडा, मुंबई- ४०० ०३७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विनोद नायर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.११.१२.२००६ रोजी अर्ज करुन, म्हाडाच्या मिळकत विभागाने कार्यालयाची जागा विक्रीबाबतचे धोरण व त्यासंबंधीच्या शासन निर्णयाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन कार्यालयीन इमारतीच्या विक्रीसंबंधी म्हाडाने पारित केलेल्या ठराव क्र.४०७६ ची प्रत अपिलकारास दि.२९.५.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. अचूक माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, हाडाच्या मालमत्ता विभागाने कार्यालयाची जागा विक्रीबाबतचे धोरण व त्यासंबंधीच्या शासन निर्णयाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास अचूक माहिती उपलब्धं् करुन दिली नसल्याचा मुद्दा अपिलकाराने द्वितीय अपिलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं् देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची नस्ती अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९७/०२**

**श्री. अशोककुमार मारुती शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**अवंती अंबर बिल्डिंग,**
**अंबर तळमजला, ना.दा.रोड,**
**मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**मुंबई बांधकाम मंडळ, (सा.बां.),**
**मुंबई - ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बहुमजली इमारती बांधकाम विभाग (सा.बां.),**
**पहिला माळा, चुनाभट्टी (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. अशोककुमार मारुती शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग (सा.बां.) चुनाभट्टी, मुंबई, यांच्याकडे दि.३१.१०.२००७ रोजी अर्ज करुन, उपअभियंता, मार्गविकास उपविभाग क्र,१० अंधेरी (प.) यांनी सन २००४-०५ ते सन २००६-०७ या कालावधीत किरकोळ दुरुस्ती /विशेष दुरुस्ती, एस.डी.आर.मंडळ कार्यालयाने मंजुरी देण्यात आली, त्याची छायाप्रत व इतर १२ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग (सा.बां.) चुनाभट्टी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, उपअभियंता, मार्गविकास उपविभाग क्र,१० अंधेरी (प.) यांनी सन २००४-०५ ते सन २००६-०७ या कालावधीत किरकोळ दुरुस्ती /विशेष दुरुस्ती, एस.डी.आर.मंडळ कार्यालयाने मंजुरी देण्यात आली, त्याची छायाप्रत व इतर १२ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४०३/०२**

**श्री. अब्दुल रऊफ अझमद अली खान, ------- अपीलकर्ता**
**रुम नं.३, रियासत चाळ, संत सावता मार्ग,**
**नारीयल वाडी, मुंबई- ४०० ०१०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (झोन-१),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, ३ रा मजला,**
**शेख हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई - ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, ३ रा मजला,**
**शेख हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई - ४०० ००८. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अब्दुल रऊफ अझमद अली खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. ९.४.२००८ रोजी अर्ज करुन, बीपीटी प्लॉट नं.१५१, बॅरिस्टर नाथ पै मार्ग, द्वारका टिंबरच्या पाठीमागे चालू असलेल्या विकास कामास मिळालेल्या मंजुरीची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

प्लॉट क्र.१५१ वरीन विकास कामास जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाने परवानगी दिली नसल्याने सदर प्रकरण कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) ई/ विभाग, यांचेशी संबंधित असल्याने आवश्यक माहितीसाठी त्यांचेकडे संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.४.२००८ व डि.२.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी सहाय्यक आयुक्त, ई वॉर्ड हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांचेशी संपर्क साधण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बीपीटी प्लॉट नं.१५१, बॅरिस्टर नाथ पै मार्ग, द्वारका टिंबरच्या पाठीमागे चालू असलेल्या विकास कामास मिळालेल्या मंजुरीची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयाशी संबंधित नव्हती. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) ई/विभाग यांचेशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. परंतु अपिलकाराचा दि.९.४.२००८ चा माहितीच्या अधिकारातील अर्ज उक्त अधिनियमातील कलम ६(३( (एक( (दोन) अनुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित केला नाही. सदर जन माहिती अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाचे आत अपिलकाराचा अर्ज संबंधित अधिका-याकडे (सार्वजनिक प्राधिकरणाकडे) हस्तांतरित करावा व अपिलकारास १५ दिवसाचे आत माहिती देण्याबाबत संबंधित अधिका-यांना कळवावे. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज हस्तांतरणाची कार्यवाही विहित कालावधीत केली नाही. यामुळे त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४०५/०२**

**श्री. मुकेश रामजी पांचोळी,** **------- अपीलकर्ता**
**कनोजिया इस्टेट, २०/६, मोरारजी नगर,**
**धोबी घाट, आरे रोड, पवई, मुंबई- ४०० ०८७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड,**
**भांडूप (प.), मुंबई - ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड,**
**भांडूप (प.), मुंबई - ४०० ०७८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मुकेश रामजी पांचोळी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड, भांडूप मुंबई, यांच्याकडे दि.१४.२.२००८ रोजी अर्ज करुन, पवई आदिशंकर मार्ग, पंचकुटीर बस स्टॉपच्या जवळ, ड्रीम सर्विस सेंटरमध्ये १०x८० वर्ग फूट क्षेत्रामध्ये गाळयाचे बांधकाम केले आहे. बांधकामाला दिलेली परवानगी, प्लॅन कॉपी व अधिका-याबाबत सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर माहितीकरिता दि.३.५.२००८ रोजी कार्यालयातील श्री.कसगीकर, दुय्यम अभियंता यांची भेट घ्यावी. आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती नियमानुसार शुल्क भरुन प्राप्त करुन घ्याव्यात. काही अधिक माहिती हवी असल्यास दि.१४.५.२००८ रोजी दुरध्वनीवरुन संपर्क साधवा असे दि.२६.४.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड, भांडूप, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पवई आदिशंकर मार्ग, पंचकुटीर बस स्टॉपच्या जवळ, ठ्रीम सर्विस सेंटरमध्ये १०x८० वर्ग फूट क्षेत्रामध्ये गाळयाचे बांधकाम केले आहे. बांधकामाला दिलेली परवानगी, प्लॅन कॉपी व अधिका-याबाबत सविस्तर माहिती मागितली होती. माहितीपोटी रु.२४/-इतके शुल्क अपिलकाराने भरले असतानाही अद्याप माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश् देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४०४/०२**

**श्री. अशोककुमार मारुती शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**अवंती अंबर बिल्डिंग,**
**अंबर तळमजला, ना.दा.रोड,**
**मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**मुंबई बांधकाम मंडळ, (सा.बां.),**
**मुंबई - ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, ३ रा मजला, डी.डी.इमारत,**
**जुने जकात घर आवार, मुंबई - ४०० ०२३.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अशोककुमार मारुती शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग. जुने जकात घर, मुंबई, यांच्याकडे दि. १४.८.२००७ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागातील मंत्रालय शाखेत सन २००५-०६ व २००६-०७ या वित्तीय वर्षात किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, एस.बी.आर. व एम.ओ.डब्लू. अंतर्गत एकूण किती रक्कमेला मंजुरी देण्यात आली, दुरुस्ती कार्यक्रमाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती ही अतिशय विस्तृत स्वरुपाची असून, कगदपत्रे संख्येने जास्त आहेत. दैनंदिन कामकाज व अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन त्याच्या प्रती काढून उपलब्ध करुन देणे अवघड आहे. अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासावी. व त्यातील आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती अपिलकारास उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.९.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन अपिलकारास माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग. जुने जकात घर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागातील मंत्रालय शाखेत सन २००५-०६ व २००६-०७ या वित्तीय वर्षात किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, एस.बी.आर. व एम.ओ.डब्लू. अंतर्गत एकूण किती रक्कमेला मंजुरी देण्यात आली, दुरुस्ती कार्यक्रमाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासावी. त्यातील अपिलकारास आवश्यक असलेल्या माहितीच्या छायाप्रती आवश्यक शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.९.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिका-यांनी टाळाटाळ केली किंवा नाकारली असे नाही. अर्जावर जन माहिती अधिका-याने समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४००/०२**

**श्रीमती जयश्री नामदेव भोसले,** **------ अपीलकर्ता**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**रुम नं.बी-४८, सेनापती बापट मार्ग,**
**कामगार स्टेडियम मागे,**
**एलफिस्टन रोड, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**सहाय्यक महापालिका आयुक्त,**
**जी उत्तर विभाग कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**प्लाझा सिनेमा मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती जयश्री नामदेव भोसले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१२.१२.२००७ रोजी अर्ज करुन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सेनापती बापट मार्ग, येथील खोली बिल्डरने आपल्या फाईलमध्ये कोणाच्या मालकीची लावली आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, दादर येथील परिशिष्ट-२, सहाय्यक महापालिका आयुक्त, जी उत्तर विभाग कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग, प्लाझा सिनेमा मार्ग, दादर, मुंबई यांनी पारित केले असल्याने त्यांचे कार्यालयाकडून सर्वेबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावीत. अपिलकाराचा अर्ज संबंधित सक्षम प्राधिका-याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी

अपिलकारास दि.२०.१२.२००७ च्या पत्राने कळविले. अपिलकाराने मागण्‍ी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकारास मुदतीत उत्तर दिले असल्याचे नूमद करुन, अपिलकाराचे प्रथम अपील दि.२.८.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील खारीज केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सेनापती बापट मार्ग, येथील खोली बिल्डरने आपल्या फाईलमध्ये कोणाच्या मालकीची लावली आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रुम नं.बी-४८ विकासकाने सर्वे फाईलमध्ये सदर रुम कोणाच्या नावे दाखविण्यात आली आहे याबाबतच्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. सदर माहिती (परिशिष्ट-२) सहाय्यक महापालिका आयुक्त, जी/उत्तर विभाग, दादर (प.) यांचेकडून उपलब्ध करुन घेणेबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२०.१२.२००७ च्या पत्राने कळविले. सहाय्यक महापालिका आयुक्तांनी अपिलकारास मागणी केलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश्‍ देतो की, सहाय्यक महापालिका आयुक्त, जी/उत्तर विभाग यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई ा करण्यात येईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९९/०२**

**श्री. चंद्रकांत माधवराव केंद्रे** **------ अपीलकर्ता**
**जनसंपर्क विभाग. मऔविम, उद्योग सारथी,**
**महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पूर्व),मुंबई- ४०० ०९३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुख्यालय,**
**उद्योग सारथी, महाकाली गुंफा रोड,**
**अंधेरी (पूर्व),मुंबई- ४०० ०९३.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुख्यालय,**
**उद्योग सारथी, महाकाली गुंफा रोड,**
**अंधेरी (पूर्व),मुंबई- ४०० ०९३.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. चंद्रकांत माधवराव केंद्रे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. १५.४.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सर्वश्री सुतार, काळेगांवकर, बी.एन.पाटील, एस.पी.वझे व ढेकळे या कर्मचा-यांना त्यांच्या पदापेक्षा उच्च पदाची अर्हता धारण केल्यामुळे त्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती जुनी असल्याने सहजासहजी उपलब्ध नसल्याने सदरहू माहितीचा शोध घेण्यात येत आहे. माहिती उपलब्ध होताच पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००८ च्या पत्राने अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. माहिती बरीच जुनी असल्याने माहितीचा शोध घेऊन अपिलकारास एक महिन्याच्या कालावधीत माहिती उपलब्ध करुन दयावी असे

दि.४.६.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहितीपोटी रु.३०/-इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.१०.६.२००८ च्या पत्राने कळविले. अपिलीय अधिका-याच्या सकारात्मक आदेशानंतरसुध्दा माहिती अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. माहिती अपूर्ण देवून रक्कम भरणा करण्यासाठी कळविले आहे. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सर्वश्री सुतार, काळेगांवकर, बी.एन.पाटील, एस.पी.वझे व ढेकळे या कर्मचा-यांना त्यांच्या पदापेक्षा उच्च पदाची अर्हता धारण केल्यामुळे त्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेशं देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेल्या माहितीसंबंधीची नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९८/०२**

**श्री. एस. एस. प्रभू,** **------ अपीलकर्ता**
**बी-२३, उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले, (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक, म्हाडा,**
**रुम नं.३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप निबंधक, म्हाडा,**
**रुम नं.३६९, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. एस.एस.प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२८.१२.२००७ रोजी अर्ज करुन, पुनर्विकास कामाकरिता शास्त्रीनगर द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था लि.शास्त्रीनगर, गोरेगांव यांना दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत, दि.५.१२.२००७ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीच्या वेळेची रोजनाम्याची प्रत, श्री.सुरेंद्र मोरे यांची प्रशासक म्हणून विविध संस्थांवर नेमणूक केली आहे इ.बाबतची कालक्रमानुसार अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते..

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पुनर्विकास कामाकरिता शास्त्रीनगर द्वारका सहकारी गृहनिर्माण संस्था लि.शास्त्रीनगर, गोरेगांव यांना दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत, दि.५.१२.२००७ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीच्या वेळेची रोजनाम्याची प्रत, श्री.सुरेंद्र मोरे यांची प्रशासक म्हणून विविध संस्थांवर नेमणूक केली आहे इ.बाबतची कालक्रमानुसार अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही तर अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करण्याची उक्त अधिनियमातील कलम १९ (१) अनुसार अपिलकारास एक संधी आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान न झाल्यास अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३८६/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे, ------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.**
**भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**१० शेख, हफिजाउद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**१० शेख, हफिजाउद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई- ४०० ००८ ------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. १५.४.२००८ रोजी अर्ज करुन, आर्किटेक्ट करानी ॲन्ड सन्स कन्सलटंन्स यांनी जुन्या भाडेकरुंना स्थलांतरित करण्यासाठी राजबागच्या २ ते ५ मजल्याच्या पार्ट ऑक्युपेशन परवानगीकरिता मनपाकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, भोगवटा प्रमाणपत्राची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

राजबाग इमारतीचे आराखडे विकास नियंत्रण नियमावली (सुधारित १९९१) अन्वये मंजूर करण्यात आलेले आहेत व पूर्णत्वाचा दाखला दि.१५.९.२००४ रोजी, कार्यालयाची पाहणी केल्यानंतर मंजूर करण्यात आला आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.५.२००८ च्या पत्राने कळविले. माहिती पाच दिवसाने उशिरा मिळाली. उत्तर अनुरुप/ योग्य नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२७.८.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने

राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते..

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आर्किटेक्ट करानी ॲन्ड सन्स कन्सलटंन्स यांनी जुन्या भाडेकरुंना स्थलांतरित करण्यासाठी राजबागच्या २ ते ५ मजल्याच्या पार्ट ऑक्युपेशन परवानगीकरिता मनपाकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, भोगवटा प्रमाणपत्राची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची मूळ प्रत कार्यालयात संबंधित धारिकेवर उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलकारास मूळ प्रतीच्या अभावी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१.९.२००८ च्या पत्राने कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, (इमारत प्रस्ताव) शहर यांनी सदर प्रकरणी कागदपत्र उपलब्ध होत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/७७६/०२**

**श्री. एच.एस.कारडोजो आणि ------ अपीलकर्ता**
**श्री.बी.एस.वाणी,**
**९०१, डी, अलका भुवन,**
**साईनाथ नगर, एक्सर रोड,**
**बोरीवली (प.), मुंबई- ४०० १०३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, महापालिका मार्केट बिल्डिंग,**
**एस.व्ही.रोड,बोरीवली (प.) मुंबई- ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड,**
**२ रा मजला, महापालिका मार्केट बिल्डिंग,**
**एस.व्ही.रोड,बोरीवली (प.) मुंबई- ४०० ०९२. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. एच.एस.कारडोजो आणि श्री.बी.एस.वाणी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड, एसए.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२६.३.२००७ रोजी अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेने दि.२७.९.२००५ च्या पत्रान्वये अनधिकृत मल निस्सारण बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीनुसार तपासणी अहवालाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दि.४.५.२००७ च्या पत्रान्वये (६६ पाने) अपिलकारास उपलब्ध करुन दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांना अपिलकारास चौकशी अहवालाची प्रत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश पारित केले. दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते..

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्तृ बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वॉर्ड, एसए.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सहकारी गृहनिर्माण संस्थेने दि.२७.९.२००५ च्या पत्रान्वये अनधिकृत मल निस्सारण बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीनुसार तपासणी अहवालाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अलका भुवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जागेतून सांडपाणी व मलनिस्सारण वाहिनी नेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या दप्तरी सोसायटीची मलनिस्सारण व सांडपाणी वाहून नेणारी लाईन नसल्याबाबत सांगण्यात आले. त्यावेळी सोसायटीने महानगरपालिकेकडे ब-याच तक्रारी केल्या. संस्थेच्या तक्रारी विचारात न घेता महानगरपालिकेच्या अधिका-याने सांडपाणी मलनिस्सारण लाईनला मंजुरीसाठी तात्पुरती जोडणी काम करण्याची परवानगी दिली. आजही सदरची लाईन चालू आहे. सदर पाईप लाईन नेहमी बंद होते. त्यामुळे गटारे भरुन वाहू लागतात. त्यामुळे घाणेरडा वास येतो व अनेकांना आजारपण येते. यामुळे संस्थेच्या सभासदांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संस्थेने सांडपाणी/ मलनिस्सारण पाईप लाईनबाबत केलेल्या तक्रारीनुसार जागेची पाहणी करुन, तयार केलेल्या अहवालाची प्रत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी. संस्थेतील सभासदांच्या आरोग्याच्यादृष्टीने बंद होणा-या मलनिस्सारण पाईपलाईनबाबत केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४१६/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर,** **------ अपीलकर्ता**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.**
**चारकोप, सेक्टर क्र.३,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** . **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. हरिष चंदू बडेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी अर्ज करुन, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयात विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास रु.४५००/- ही अव्वल कारकुनाची वेतनश्रेणी मिळते. तसेच मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागातील विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास नायब तहसिलदाराची रु.५५००/-वेतनश्रेणी मिळते. त्यामुळे मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिलहयातील कर्मचा-यावर आर्थिक अन्याय होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१५.४.२००८ च्या पत्रान्वये कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून धारिकेचे निरीक्षण केल्यानंतर हव्या असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती देण्यात येईल अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास १५ दिवसाचे आत माहिती द्यावी असे दि.५.६.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.६.२००८ च्या पत्रान्वये माहिती

दिली. अपुरी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयात विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास रु.४५००/- ही अव्वल कारकुनाची वेतनश्रेणी मिळते. तसेच मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागातील विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास नायब तहसिलदाराची रु.५५००/-वेतनश्रेणी मिळते. त्यामुळे मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिलहयातील कर्मचा-यावर आर्थिक अन्याय होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. निवडणूक कार्यालयातील पदाकरिता वेतनश्रेणी ही जिल्हानिहाय मंजूर करण्यात येत नसून, ती पदनामनिहाय मंजुर करण्यात येते. एकाच पदनामासाठी मुंबई शहर जिल्हा/ मुंबई उपनगर जिल्हा यांचेसाठी एक वेतनश्रेणी आणि अन्य जिल्हयातील याच पदनामासाठी वेगळी वेतनश्रेणी निश्चित करण्यात आलेली नाही. निवडणूक कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेल्या पदासाठी वेतनश्रेणी अन्य पदाप्रमाणेच वेळोवेळी वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासनाकडून / वित्त विभागाकडून विहित करण्यात येते. सध्याची विविध पदांसाठीची वेतनश्रेणी यानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. निवडणूक कार्यालयातील पदाकरिता भारत निवडणूक आयोगानें ठरवून दिलेली मानके कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हयासाठी वेगळी मानके ठरवून दिल्याबाबतची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :- ३१/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४१७/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर,** **------ अपीलकर्ता**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.**
**चारकोप, सेक्टर क्र.३,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** . **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. हरिष चंदू बडेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.२१.१.२००८ रोजी अर्ज करुन, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयात विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास रु.४५००/- ही अव्वल कारकुनाची वेतनश्रेणी मिळते. तसेच मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागातील विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास नायब तहसिलदाराची रु.५५००/-वेतनश्रेणी मिळते. त्यामुळे मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिलहयातील कर्मचा-यावर आर्थिक अन्याय होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

अधिका-यांनी दि.२५.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. मुंबई शहर आणि उपनगर जिल्हा आणि महाराष्ट्रातील इतर जिल्हे यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी निर्माण केलेल्या पदांमध्ये तफावत का आहे, याची कारणमिमांसा करणे व तशी माहिती अपिलकारास पुरविणे हे जन माहिती अधिका-याकडून अपेक्षित नाही. व कायद्यानुसार तसे करण्याचे त्यांना अधिकार देखिल नाहीत. जी माहिती **"माहिती "** या संज्ञेमध्ये मोडत होती ती सर्व माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली आहे. **"माहिती"** या संज्ञेत अंतर्भूत असलेल्या माहितीपैकी एखादी माहिती अपिलकारास मिळालेली नाही अशी अपिलकाराची तक्रार नाही. असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१३.६.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील अमान्य करण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयात विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास रु.४५००/- ही अव्वल कारकुनाची वेतनश्रेणी मिळते. तसेच मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण महाराष्ट्रात शहरी तसेच ग्रामीण भागातील विधानसभा मतदारसंघात काम करणा-या कर्मचा-यास नायब तहसिलदाराची रु.५५००/-वेतनश्रेणी मिळते. त्यामुळे मुंबई शहर/ मुंबई उपनगर जिलहयातील कर्मचा-यावर आर्थिक अन्याय होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. निवडणूक कार्यालयातील पदाकरिता वेतनश्रेणी ही जिल्हानिहाय मंजूर करण्यात येत नसून, ती पदनामनिहाय मंजुर करण्यात येते. एकाच पदनामासाठी मुंबई शहर जिल्हा/ मुंबई उपनगर जिल्हा यांचेसाठी एक वेतनश्रेणी आणि अन्य जिल्हयातील याच पदनामासाठी वेगळी वेतनश्रेणी निश्चित करण्यात आलेली नाही. निवडणूक कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेल्या पदासाठी वेतनश्रेणी अन्य पदाप्रमाणेच

वेळोवेळी वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासनाकडून / वित्त विभागाकडून विहित करण्यात येते. सध्याची विविध पदांसाठीची वेतनश्रेणी यानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. निवडणूक कार्यालयातील पदाकरिता भारत निवडणूक आयोगानें ठरवून दिलेली मानके कार्यालयात उपस्थित नाही. तसेच मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हयासाठी वेगळी मानके ठरवून दिल्याबाबतची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००८च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४१८/०२**

**श्री. मंगेश माने,** **------ अपीलकर्ता**
**बी.डी.डी.चाळ नं.९९, रुम नं.५५,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१.** . **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मंगेश माने, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई, यांच्याकडे दि.८.४.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील एकूण मंजूर पदसंख्या, भरती, इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

मागितलेल्या माहितीबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी अपिलकारास आयोगाच्या कार्यालयात समक्ष भेटीकरिता यावे. भेटीचा दिनांक व वेळ दूरध्वनीद्वारे ठरवून घेण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.४.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकारास समक्ष भेटीकरिता कार्यालयात बोलाविण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील एकूण मंजूर पदसंख्या, भरती, इ.बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास मागितलेली माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीमध्ये संदिग्धता असल्याने तसेच स्पष्टता नसल्याने अपिलकाराला प्रत्यक्ष भेटीमध्ये संदिग्धता दूर करण्यासाठी पाचारण केले होते. परंतु अपिलकार कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. यामुळे माहिती देता आली नसल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. अपिलकार कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून संदिग्धता दूर केल्यास त्यांना आवश्यक माहिती पुरविण्यात येईल असेही त्यांनी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता काही पदे भरली असल्यास त्याबाबतची माहिती, कार्यालयातील वर्गवारीनुसार पदाबाबतची माहिती, कार्यालयातील अधिकारी/ कर्मचा-यांची नावे, धारण केलेली पदे याबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४१९/०२**

**श्री. मंगेश माने,** **------ अपीलकर्ता**
**बी.डी.डी.चाळ नं.९९, रुम नं.५५,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मंगेश माने, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दती शिवाय भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या, कार्यरत अधिकारी/ कर्मचा-यांची नांवे, पदनाम इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता कक्ष अधिकारी, प्रशा-२ हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी कक्ष अधिकारी, प्रशा-२ यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील एकूण मंजूर पदे,

विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दती शिवाय भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या, कार्यरत अधिकारी/ कर्मचा-यांची नांवे, पदनाम इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने विशेष मुद्दयावर विशेष स्वरुपाची मागणी मागितली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. याप्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीशिवाय भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या, कार्यरत अधिकारी/ कर्मचा-यांची नावे, पदनाम इ. माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३२६/०२**

**श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला,** **------ अपीलकर्ता**
**अे-२०२, गोदावरी, शांतीवन,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पिटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड,मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पिटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड,मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, यांच्याकडे दि. १२.३.२००८ रोजी अर्ज करुन, एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परिक्षेची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेच्या छायांप्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.३.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परिक्षेची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेच्या छायांप्रतीची मागणी केली होती. यापूर्वी कार्तिकेय गुप्ता यांनी अशाच प्रकारची एमएचटी-सीईटी २००६ च्या प्रश्पपत्रिकाच्या प्रतींची मागणी केली होती. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन यांनी प्रश्नपत्रिकाची प्रत अपिलकारास दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. अपिलावर मा.मुख्य माहिती आयुक्तांनी आदेश पारित करुन अपिलकाराची मागणी अमान्य केली होती. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२९४७/०६ दाखल करण्यांत आली होती. मा.उच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका उपलब्य करुन देणे आवश्यक नाही असे आदेशात नमूद केले आहे. अपिलकाराने विभागीय प्राधिका-यांच्या कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर केल्यास उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेची छायाप्रत उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. प्रश्नपत्रिकेची प्रत विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता नसल्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेता या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३२६/०२**

**श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला,** **------ अपीलकर्ता**
**अे-२०२, गोदावरी, शांतीवन,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पिटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड,मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पिटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड,मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, यांच्याकडे दि. १२.३.२००८ रोजी अर्ज करुन, एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परिक्षेची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेच्या छायांप्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.३.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०१.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परिक्षेची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेच्या छायांप्रतीची मागणी केली होती. यापूर्वी कार्तिकेय गुप्ता यांनी अशाच प्रकारची एमएचटी-सीईटी २००६ च्या प्रश्पपत्रिकाच्या प्रतींची मागणी केली होती. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन यांनी प्रश्नपत्रिकाची प्रत अपिलकारास दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. अपिलावर मा.मुख्य माहिती आयुक्तांनी आदेश पारित करुन अपिलकाराची मागणी अमान्य केली होती. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२९४७/०६ दाखल करण्यांत आली होती. मा.उच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही असे आदेशात नमूद केले आहे. अपिलकाराने विभागीय प्राधिका-यांच्या कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर केल्यास उत्तरपत्रिका व नमुना उत्तर पत्रिकेची छायाप्रत उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. प्रश्नपत्रिकेची प्रत विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता नसल्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेता या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४२६/०२**

**श्री. सुरेश गावडे व इतर,** **------ अपीलकर्ता**
**जयंत प्रोव्हिजन स्टोर्स, दुकान क्र.९,**
**आराम शॉपिंग सेंटर, संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. सुरेश गावडे व इतर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २४.१.२००८ रोजी अर्ज करुन, परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था आणि शास्त्रीनगर म्युनसिपल व्यापारी सेंवा संघ यांच्या पुनर्वसनाकरिता सिटी सर्वे क्र.६२९, वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत पूर्व परवानगीने उपस्थित राहून आवश्यक ते शुल्क भरुन संबंधित उपलब्ध कागदपत्रांचे निरीक्षण केल्यांनंतर विहित शुल्क आकारुन माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था आणि शास्त्रीनगर म्युनसिपल व्यापारी सेंवा संघ यांच्या पुनर्वसनाकरिता सिटी सर्वे क्र.६२९, वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कार्यालयातील कागदपत्राचे निरीक्षण करण्याबाबत कळविले होते. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. या परिस्थितीत जन माहिती अधिका-याना शास्ती लावण्याची अपिलकाराची मागणी मान्य करता येत नाही. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसेल, जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल अशा परिस्थितीत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची एक संधी अधिनियमात उपलब्ध आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहिल.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९१/०२**

**श्री. तमीम इब्राहीम रुपावाला,**
**द्वारा-रॉयल एंटरप्रायझेस,** **------ अपीलकर्ता**
**डी-२०५, अनसा इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**साकी विहार रोड, मुंबई- ४०० ०७२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एल वॉर्ड,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, पहिला मजला,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**वरिष्ठ निरीक्षक, परवाना,**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एल वॉर्ड,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, पहिला मजला,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. तमीम इब्राहीम रुपावाला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, परवाना, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे दि. २५.१.२००८अर्ज करुन, कारखाना परवान्याबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.०२.०२.२००८ च्या पत्राने मुद्देनिहाय माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित

केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास योग्य माहिती दिल्याचे समर्थन करुन दि.१७.४.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिताअपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, परवाना, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कारखाना परवान्याबाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.२.२००८ च्या पत्राने मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलकाराने द्वितीय अपिलामध्ये नवीन मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितली असल्याचे दिसून येते. अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकारास द्वितीय अपिलात नवीन मुद्दयांची माहिती मागण्याची तरतूद नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या दि.२४.१.२००८ च्या अर्जास अनुसरुन समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब. मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३८७/०२**

**श्री. किशोर का. घोगरे,** **------ अपीलकर्ता**
**३८, तृप्ती सदन को.ऑप.हौ.सो.लि.**
**काजुपाडा,साकीनाका, मुंबई- ४०० ०७२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एल वॉर्ड,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, पहिला मजला,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता,(इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानरगपालिका, एल वॉर्ड,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, पहिला मजला,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०७०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. किशोर का.घोगरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे दि. ०२.०२.२००८ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, कुर्ला (प.) एल विभागातील प्रभाग क्र.१५० ते १५७ येथील इमारती व कारखाने खात्यांतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये व कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी नोटीस रजिस्टर कोर्ट रजिस्टर डिबेक्शन रजिस्टर, डिमॉलिशन रजिस्टर, घर दुरुस्ती परवानगी दिलेल्या प्रकरणांची नोंदवही इ.अभिलेख ठेवतात याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. संबंधित कागदपत्राचे निरीक्षण करण्याकरिता अपिलकारास कार्यालयात उपस्थित रहाणबाबत कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकाराने जन माहिती अधिका-याशी संपर्क साधावा असे नमूद करुन आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिताअपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, कुर्ला (प.) एल विभागातील प्रभाग क्र.१५० ते १५७ येथील इमारती व कारखाने खात्यांतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये व कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी नोटीस रजिस्टर कोर्ट रजिस्टर डिबेक्शन रजिस्टर, डिमॉलिशन रजिस्टर, घर दुरुस्ती परवानगी दिलेल्या प्रकरणांची नोंदवही इ.अभिलेख ठेवतात याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर कृती निश्‍चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यास १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधिनियातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३८८/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी (राव),** **------ अपीलकर्ता**
**जे-२२०अनसा इंडल प्रेम को.ऑप.हौ.सोृलिृ**
**साकीविहार रोड, साकीनाका, मुंबई- ४०० ०७२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आर.पी. यजुर्वेदी (राव) यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.०१.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.त्रिपाठी, अभियंता यांच्या पदस्थापनेच्या आदेशाची प्रत, त्यांना नेमून दिलेल्या कामाबाबतच्या आदेशाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.१.२००८ च्या पत्राने अर्जातील मुद्दा क्र.ए.बी.सी. बाबत माहिती दिली. अर्जातील मुद्दा क्र.डी.ई.एफ. बाबतची माहिती उक्त अधिनियमातील कलम-२ (च) खाली मोडत असल्याने देय नाही असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन

अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिताअपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यानी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.त्रिपाठी, अभियंता यांच्या पदस्थापनेच्या आदेशाची प्रत, त्यांना नेमून दिलेल्या कामाबाबतच्या आदेशाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जातील डी.ई.एफ. मुद्दयाबाबतची माहिती अधिनियमातील कलम २ (च) चा उल्लेख करुन अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली नाही. श्री. त्रिपाठी यांची पदस्थापना केल्यानंतर पहिल्या वर्षातील कार्यालयातील उपस्थितीबाबतची माहिती, श्री.त्रिपाठी यांना नेमून दिलेले काम, श्री.त्रिपाठी यांच्या अनुपस्थितीचा कालावधी, रजा, प्रवास, त्यावरील खर्च इ.अनुषंगिक माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली नाही. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३४९/०२**

**श्री. रमेश केशव धोत्रे व इतर** **------ अपीलकर्ता**
**२०, सप्तशृंगी सोसायटी लि.**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, एच/पूर्व विभाग,**
**मुंबई.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. रमेश केशव धोत्रे व इतर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच/पूर्व विभाग, मुंबई, यांच्याकडे दि.१५.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सप्तशृंगी सहकारी गृहनिर्माण संस्था, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी सन २००५-०६ व २००६-०७ वर्षात केलेली गुंतवणूक, संस्थेकडे असलेल्या सभासद व सहयोगी सभासदांच्या बाबतीत दि.५.१०.२००७ व दि.१७.१०.२००७ च्या पत्राने घेतलेल्या हरकतीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. जनउ माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१९.३.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तर स्वरुपात असल्याने माहिती, ही माहितीच्या अधिकारात येत नसल्याने देणे बंधनकारक नाही. अपिलकार यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने सविस्तरपणे मुद्देनिहाय माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास त्वरित माहिती द्यावी असे आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.०२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच/पूर्व विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सप्तशृंगी सहकारी गृहनिर्माण संस्था, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी सन २००५-०६ व २००६-०७ वर्षात केलेली गुंतवणूक, संस्थेकडे असलेल्या सभासद व सहयोगी सभासदांच्या बाबतीत दि.५.१०.२००७ व दि.१७.१०.२००७ च्या पत्राने घेतलेल्या हरकतीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपिलकार तसेच उत्तरवादी सुनावणीकरिता हजर नव्हते. सबब. मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३४९/०२**

**श्रीमती झहिदा झुबेर मर्चंट,** **------ अपीलकर्ता**
**४० रझाग मंजिल, ३ रा मजला,**
**एल.जे.रोड, माहीम, मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/नार्थ विभाग, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/नार्थ विभाग, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती झहिदा झुबेर मर्चंट, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि.५.३.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.मोहम्मद इस्माइल सुलेमान, एल.जे.रोड, माहीम, मुंबई समोरील १७/ए, बालमिया चाळ यांनी इस्माइल गॅरेजकरिता बीएमसीकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, बीएमसीने मंजूर केलेल्या आराखडयाची प्रत, अग्निशामन अधिका-यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत इ, अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीच्या कागदपत्रांचा जाणिवपूर्वक शोध घेतला असता कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे अपिलकारास माहिती पुरविता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.४.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१४.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राचा जन माहिती अधिका-यांनी जाणिवपूर्वक शोध घेतला असता आवश्यक कागदपत्रे सापडली नसल्याने अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती

देता आलेली नाही. सदर बाब नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.५.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.मोहम्मद इस्माइल सुलेमान, एल.जे.रोड, माहीम, मुंबई समोरील १७/ए, बालमिया चाळ यांनी इस्माइल गॅरेजकरिता बीएमसीकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, बीएमसीने मंजूर केलेल्या आराखडयाची प्रत, अग्निशामन अधिका-यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत इ, अनुषंगिक माहिती मागितली होती. इस्माईल गॅरेजबाबत संबंधित नस्ती/कागदपत्र जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडली नसल्याने सदर प्रकरणी अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता आली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मनपा, जी/उत्तर विभाग, यांनी कागदपत्र शोध घेऊनही सापडत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९५/०२**

**श्रीमती ॲनी एम.आसगोलकर,** **------ अपीलकर्ता**
**सोरेस बिल्डिंग, ३ रा मजला, फ्लॅट नं.८,**
**नटवर नगर ५, अशोक ठाकूर कंपाऊंडजवळ,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ईस्ट विभाग, आझाद रोड, गुंडावली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ईस्ट विभाग, आझाद रोड, गुंडावली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.** **------ उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती ॲनी एम.आसगोलकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. २०.२.२००८ रोजी अर्ज करुन, सोरेस इमारतीतील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.३ फ्लॅटधारकाने स्नानगृह आणि प्रसाधनगृहाच्या खिडकीच्या वाढीव कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.५.२००८ रोजी उत्तर दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट विभाग, अंधेरी मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सोरेस इमारतीतील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.३ फ्लॅटधारकाने स्नानगृह आणि प्रसाधनगृहाच्या खिडकीच्या वाढीव कामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. चटई क्षेत्राव्यतिरिक्त जागेचे विस्तारिकरण मनपा अधिनियमानुसार करता येत नाही. सदर प्रकरणी चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले नसल्याने संबंधिताविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास अर्जावर समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४०२/०२**

**श्री. बाळासाहेब एस. कुरुप,** **------ अपीलकर्ता**
**२ रा मजला, कविता कॉम्प्लेक्स,**
**कॉलेज रोड, नाशिक- ४२२ ००५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह परिवहन आयुक्त,**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ३ व ४ था मजला,**
**चेतना कॉलेजजवळ, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त (अं.१)**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ३ व ४ था मजला,**
**चेतना कॉलेजजवळ, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------ उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बाळासाहेब एस. कुरुप, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, शासकीय वसाहत, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, वाहनासाठी योग्यता प्रमाणपत्र मंजूर करणे तथा योग्यता प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे यासंदर्भात मोटार वाहन कायद्यातील संबंधित तरतुंदी, केंद्रिय मोटर वाहन नियम मधील तरतुदी तसेच महाराष्ट्र मोटर वाहन नियम क्र.४५ (११) अन्वये निर्धारित केलेला एम.व्ही. इनस्पेक्शन नमुना याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१४.२.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अर्जातील मुद्दा क्र.९ ते १७ बाबत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम

अपिलीय अधिका-यांनी दि.१५.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन माहितीच्या अधिनियमातील माहिती संज्ञेची केलेली व्याख्या विचारात घेऊन अपिलकारास अपेक्षित माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-याला निदेश देऊन दि.२१.४.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, शासकीय वसाहत, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वाहनासाठी योग्यता प्रमाणपत्र मंजूर करणे तथा योग्यता प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे यासंदर्भात मोटार वाहन कायद्यातील संबंधित तरतुंदी, केंद्रिय मोटर वाहन नियम मधील तरतुदी तसेच महाराष्ट्र मोटर वाहन नियम क्र.४५ (११) अन्वये निर्धारित केलेला एम.व्ही. इनस्पेक्शन नमुना याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. माहिती याचा अर्थ कागदपत्रावर उपलब्ध असलेली माहिती. अपिलकाराने प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागितली आहे. या स्वरुपात दस्तऐवजात माहिती उपलब्ध नाही. तसेच अपिलकाराने अर्जात विचारलेले प्रश्न तपासून जन माहिती अधिका-यांनी उत्तर तयार करुन देणे अपेक्षित नाही. अपिलकार जन माहिती अधिकारी यांचे मत विचारीत आहेत. योग्यता प्रमाणपत्र देण्याविषयीचे नियम स्वयं:स्पष्ट असताना जन माहिती अधिका-यांनी त्यांचे वैयक्तिक मत प्रदर्शित करणे अपेक्षित नाही असे लेखी निवेदन सादर करुन जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. एखाद्या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहितीच केवळ या अधिनियमाच्या तरतुदीनुसार माहिती मागणा-यास मागता येईल. अभिलेखावरील कागदपत्राची छाननी वा पाहणी करुन त्यावर निष्कर्ष काढून माहिती देणे अधिनियमाच्या तरतुदीत अभिप्रेत नसल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास चुकीची माहिती दिली असे म्हणून त्यांच्यावर शास्ती लादणे उचित होणार नाही. जन माहिती अधिका-याचा एखाद्या बाबीसंबंधीचा निष्कर्ष चुकीचा वाटत असेल तर त्यासंबंधात या अधिनियमा व्यतिरिक्त इतर कायद्याच्या तरतुदीखाली वेगळी अशी योग्य ती कार्यवाही योग्य त्या प्राधिकरणाकडे करण्याचा मार्ग

अपिलकाराला उपलब्ध आहे.अपिलकाराने अर्जातील मुद्दा क्र.९ ते १७ बाबत होय/नाही अशी माहिती मागितली असल्याने अपिलकाराचे समाधान होण्याच्या दृष्टीकोनातून जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी विवरणपत्र १ नुसार माहिती देण्याचे कबूल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक माहिती दिली असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४०७/०२**

**श्री. सुरेश गावडे व इतर,** **------ अपीलकर्ता**
**जयंत प्रोव्हिजन स्टोर्स, दुकान क्र.९,**
**आराम शॉपिंग सेंटर, संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टीपीएस-५, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टीपीएस-५, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. सुरेश गावडे व इतर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, सांताक्रूझ, मुंबई, यांच्याकडे दि.५.५.२००८ रोजी अर्ज करुन, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई येथील सिटी सर्वे क्र.६२९ (पी.टी.), सर्वे क्र.३४१, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट दुकान क्र.२८ ते ४९ समोर ऑक्टोबर,२००५ ते मे, २००६ या कालावधीत विटांची भिंत बांधण्यात आली असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.४.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी सात दिवसांचे आत देण्याबाबत नमूद करुन दि.१६.६.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-याने अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, शासकीय वसाहत, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई येथील सिटी सर्वे क्र.६२९ (पी.टी.), सर्वे क्र.३४१, शास्त्रीनगर, म्युनिसिपल मार्केट दुकान क्र.२८ ते ४९ समोर ऑक्टोबर,२००५ ते मे, २००६ या कालावधीत विटांची भिंत बांधण्यात आली असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर जन माहिती अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमजबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४२५/०२**

**श्री. सुरेश गावडे व इतर,** **------ अपीलकर्ता**
**जयंत प्रोव्हिजन स्टोर्स, दुकान क्र.९,**
**आराम शॉपिंग सेंटर, संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सुरेश गावडे व इतर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथाा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२४.१.२००८ रोजी अर्ज करुन, शास्त्रीनगर म्युनिसिपल मंडई व्यापारी सेवा संघ व परिश्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट क्र.सिटीएस ६२९, (पार्ट) व्हिलेज वांद्रा येथील नियोजित एस. आर. ए. पुनर्वसन प्रकल्पासंबंधी अनुषंगिक एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, शास्त्रीनगर म्युनिसिपल मंडई व्यापारी सेवा संघ व परिश्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट क्र.सिटीएस ६२९, (पार्ट) व्हिलेज वांद्रा येथील नियोजित एस. आर. ए. पुनर्वसन प्रकल्पासंबंधी अनुषंगिक एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती अपिलकारास देण्यात आलेल्या नाहीत असे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीच्या अधिकारातील अर्जावर जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलिय अधिकारी यांनी विहित कालावधीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची कोटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अणिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासूपन १५ दिवसांचे आत माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात सेईल. भविष्यात माहितीच्या अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१३९३/०२**

**श्री. रामेश्वर बि.विश्वकर्मा,** **------ अपीलकर्ता**
**कलावती इस्टेट, रुम नं.२,**
**गावदेवी रोड, भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अभियंता,**
**एम. एस. ई. डी.कंपनी जि.**
**जी.के.डब्लू. कंपाऊंड, एल.बी.एस.मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एम. एस. ई. डी.कंपनी लि.**
**जी.के.डब्लू. कंपाऊंड, एल.बी.एस.मार्ग,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.** **------ उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रामेश्वर बि.विश्वकर्मा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.७.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथाा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१५.४.२००८रोजी अर्ज करुन, कलावती इस्टेट, रुम नं.२, गावदेवी रोड, भांडूप (प.) मुंबई येथील के.जे.इंजिनियरिंग वर्क्स या अवैध कंपनीला विद्युत पुरवठा केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, कलावती इस्टेट, रुम नं.२, गावदेवी रोड, भांडूप (प.) मुंबई येथील के.जे.इंजिनियरिंग वर्क्स या अवैध कंपनीला विद्युत पुरवठा केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपोटी विहित शुल्क भरण्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.८.५.२००८ रोजी पत्र पाठवून कळविले होते. अपिलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्या वेळी प्रतिपादन केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २०.६.२००८ व ४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. अपिलकार सुनावणीसाठी हजर राहिले नाहीत. पुन्हा सदर प्रकरणी दि.२०.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. त्यावेळी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती विनाशुल्क देण्याची तयारी दर्शविली. परंतु, अपिलकाराने माहिती घेण्यास व सुनावणीच्या कागदपत्रावर सही करण्यास नकार दिला. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.८.२००८ च्या पत्रान्वसे सर्व कागदपत्राच्या प्रती पाठवून दिल्या असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. परंतु सदर अहवालासोबत अपिलकारास दिलेल्या कागदपत्राच्या प्रती आयोगास सादर केल्या नाहीत. त्यामुळे अपिलकारास माहिती दिल्याची खात्री होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आवश्यक त्सा कागदपत्राच्या प्रती अपिलकारास पत्राने उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १३८४/०२**

**श्री. एम.डी. मराठे, ------ अपीलकर्ता**
**बी- ७/५१, एम.आय.जी.कॉलनी,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-५,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------ उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. एम.डी.मराठे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथाा मिळकत व्यवस्थापक-५, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. ११.४.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड ॲक्ट १९७० नुसार इमारतीच्या संलग्न जागा गाळेधारकांना व्यक्तिगतरित्या भाडेपट्टयाने देण्यात येते का, महाराष्ट्र गृहनिर्माण ॲक्ट १९७० लागू झाल्यामुळे सदर अधिनियम, १९७० पूर्वी वितरण झालेले इमारती/ गाळे यांनाही लागू होतो असे असल्यास लागू करण्याबाबतच्या ठरावाच्या आदेशाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याचें म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-५, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड ॲक्ट १९७० नुसार इमारतीच्या संलग्न जागा गाळेधारकांना व्यक्तिगतरित्या भाडेपट्टयाने देण्यात येते का, महाराष्ट्र गृहनिर्माण ॲक्ट १९७० लागू झाल्यामुळे सदर अधिनियम, १९७० पूर्वी वितरण झालेले इमारती/ गाळे यांनाही लागू होतो असे असल्यास लागू करण्याबाबतच्या ठरावाच्या आदेशाची प्रत इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. राज्य माहिती आयोगाचे दि.१४.२.२००८ च्या आदेशान्वये श्री.मराठे, अपिलकार यांना नस्तीची पहाणी करण्याकरिता कार्यालयात बोलाविले होते. श्री.मराठे हे दि.५.४.२००८ रोजी कार्यालयात हजर झाले. त्यांनी फ्री होल्ड लँडच्या परिपत्रकाबाबत मागणी केली. याबाबतचा अहवाल अपिलकारास दि.२४.४.२००८ रोजी देण्यात आला. अपिलकाराने कार्यालयात उपलब्ध असलेल्या नस्तीची पाहणी केली. नियम १९७० बाबत सविस्तर टिप्पणी सादर केलेल्याच्या प्रतीची मागणी केली. ती त्यांना देण्यात आली. अपिलकार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र.५०५१/२००८ अन्वये दावा दाखल केला असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. यावरुन अपिलकारास माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. आवश्यक माहिती मिळाली नसल्याचा अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कगदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावेत. त्यांनंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १३८५/०२**

**श्री. मंगेश माने,** **------ अपीलकर्ता**
**बी- ७/५१, एम.आय.जी.कॉलनी,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (आस्था-४),**
**सामाजिक न्याच व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (आस्था-४),**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. मंगेश माने, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथाा अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सामाजिक न्याय विभागातील एकूण मंजूर पदसंख्या, विहित मार्गान भरलेली पदे, वर्गवारीनुसार एकूण पदे, कर्मचारी/ अधिका-यांचे नांव, पदनाम, कर्तव्ये, जबाबदा-या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२८.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले की, अपिलकाराच्या अर्जामध्ये नमूद केलेली नेमकी कोणती माहिती अपिलकारास आवश्यक आहे याचा अर्थबोध होत नाही. यामुळे जन माहिती अधिका-याशी वैयक्तिकरित्या संपर्क साधल्यास आवश्यक ती माहिती देता येईल असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२७.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचा विषय सामाजिक न्याय विभागातील विविध कार्यासनातील जन माहिती अधिका-यांशी संबंधित असल्याने अर्जाच्या प्रती सर्व संबंधित कार्यासनांकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आल्या.

अपिलकारास माहिती देण्याचे कळविण्यात आले. संबंधित कार्यासनांनी अपिलकारास १५ दिवसात माहिती द्यावी असे नमूद करुन दि.२७.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सामाजिक न्याय विभागातील एकूण मंजूर पदसंख्या, विहित मार्गान भरलेली पदे, वर्गवारीनुसार एकूण पदे, कर्मचारी/ अधिका-यांचे नांव, पदनाम, कर्तव्ये, जबाबदा-या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नसल्याचे सदर प्रकरणी दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, खुद्द सामाजिक न्याय विभागातील मंजूर पदे, भरलेली पदे, अधिकारी/ कर्मचा-यांची नांवे, पदनाम इ. अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १३९२/०२**

**श्री. विष्णू भिमराव पवार,** **------ अपीलकर्ता**
**सचिव, देवरत्न नगर रहिवासी महासंघ,**
**द्वारा-२ अे/२०३, इंद्रप्रस्थ देवरत्न नगर,**
**एस.एम.रोड, चुनाभट्टी, मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (पणन कक्ष),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कलानगर,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (पणन),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कलानगर,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. विष्णू भिमराव पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (पणन),मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. १९.३.२००८ रोजी अर्ज करुन, देवरत्न नगर संकुलातील पाच इमारती ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निवासासाठी देण्यात आलेल्या आहेत, त्या कोणत्या तत्वावर देण्यात आलेल्या आहेत, सदर इमारती कोणाच्या ताब्यात आहेत, इ. १० मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (पणन),मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, देवरत्न नगर संकुलातील पाच इमारती ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निवासासाठी देण्यात आलेल्या आहेत, त्या कोणत्या तत्वावर देण्यात आलेल्या आहेत, सदर इमारती कोणाच्या ताब्यात आहेत, इ. १० मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती सन २००२ मधील असून, कार्यालयातील जुन्या अधिकारी/कर्मचारी वर्गाची इतर कार्यालयात बदली झाली आहे. बदली झालेल्या कर्मचारी/ अधिकाऱ्याच्या मदतीने माहिती संकलित करण्यात येत असल्यामुळे आणखी १५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. अपिलकारास १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यानी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. सदर बाब लक्षात घेऊन मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी कबुल केल्याप्रमाणे अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## **आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १३८३/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३९/२/३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरानगर पोलीस चौकीसमोर, सर्विस रोड,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**अभियांत्रिकी शाखा/ बाब,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**अभियांत्रिकी शाखा, एच/पूर्व विभाग,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, अभियांत्रिकी शाखा, एच/पूर्व विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२.५.२००८ रोजी अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील सर्वे क्र.३५५, हिस्सा क्र.अे (१) पै.न.भू.क्र.२९ अ (पै) नेहरुनगर, गोळीबार, ७ वा रस्ता, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई या ठिकाणी मे.शिवालिक व्हेन्चर्स यांचा विकासक नामे पार्षद असो. यास तळमजला + सात मजला स्वरुपाची तात्पुरती संक्रमण शिबिरे उभारण्याची जी परवानगी दिली आहे त्या आराखडयाच्या साक्षांकित प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, अभियांत्रिकी शाखा, एच/पूर्व विभाग, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील सर्वे क्र.३५५, हिस्सा क्र.अे (१) पै.न.भू.क्र.२९ अ (पै) नेहरुनगर, गोळीबार, ७ वा रस्ता, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई या ठिकाणी मे.शिवालिक व्हेन्चर्स यांचा विकासक नामे पार्षद असो. यास तळमजला + सात मजला स्वरुपाची तात्पुरती संक्रमण शिबिरे उभारण्याची जी परवानगी दिली आहे त्या आराखडयाच्या साक्षांकित प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कागदपत्रावर उपलब्ध आहे. माहिती शुल्कापोटी रु.१५६/-इतकी रक्कम आठ दिवसांच्या आत भरल्यानंतर आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.६.२००८ च्या पत्राने कळविले असल्याचे सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सदर पत्राची प्रत सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती पुरविण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविलेली दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने माहितीपोटी आवश्यक ते शुल्क भरुन जन माहिती अधिका-यांकडून आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपिलकाराने विहित शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिका-याने अपिलकारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४१३/०२**

**श्री. इकबाल दाऊद शेख,** **------ अपीलकर्ता**
**९/९, जोगनी इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स,**
**बी.एन.पुरव मार्ग, सायन,**
**चुनाभट्टी (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिहवन कार्यालय,**
**मध्यवर्ती कारागृहाजवळ, ठाणे-४०० ६०१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**प्रादेशिक परिहवन कार्यालय,**
**मध्यवर्ती कारागृहाजवळ, ठाणे-४०० ६०१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. इकबाल दाऊद शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मध्यवर्ती कारागृहाजवळ, ठाणे, मुंबई, यांच्याकडे दि. १४.११.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.अस्फाक उल हक खान, रा. घर नं.१४, जंगली पीरदर्गा ट्रस्ट वरळी, हिल रोड यांनी तीन वाहने नोंदणीकरिता खोटी कागदपत्रे दाखल केल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ४० प्रमाणे मोटार वाहनाच्या प्रत्येक मालकाने ते वाहन सर्वसामान्यपणे जेथे ठेवण्यात येत असेल अशी त्याची निवासाची किंवा व्यवसायाची जागा ज्याच्या अधिकार क्षेत्रात येत असेल अशा नोंदणी प्राधिकरणाकडे वाहनाची नोंदणी करुन घेतली पाहिजे. सदर प्रकरणी श्री.अस्फाक उल हक खान यांनी तिनही वाहने ही त्यांच्या व्यावसायानिमित्त त्याच्या तत्कालिन तात्पुरत्या पत्त्यावर नोंदणी केली असून, त्याने

कायमचा वास्तव्याचा पत्ता हा वरळी, मुंबई असा विहित फॉर्ममध्ये जाहिर केला आहे. सदर वाहनाची नोंदणी मोटार वाहन कायद्याप्रमाणे झाल्यामुळे नोंदणी रद्द करणे उचित होणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.१२.११.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नसल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मध्यवर्ती कारागृहाजवळ, ठाणे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.अस्फाक उल हक खान, रा. घर नं.१४, जंगली पीरदर्गा ट्रस्ट वरळी, हिल रोड यांनी तीन वाहने नोंदणीकरिता खोटी कागदपत्रे दाखल केल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. श्री.अस्फाक उल हक खान यांनी व्यावसायाकरिता नोंदणी केलेल्या तीन वाहनांबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत उत्तर दिले असल्याने जन माहिती अधिका-यांना दंडित करण्याची अपिलकाराची मागणी मान्य करता येत नाही. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४१४/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.**
**भालचंद मार्ग, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे दि. ५.३.२००८ रोजी अर्ज करुन, फायर ब्रिगेडच्या एन.ओ.सी.प्रमाणे दोन पॅसेंजर लिफ्टपैकी एक लिफ्ट बेसमेंटपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. परंतु, तशी रचनाही करण्यात आलेली नाही. तरीही जन माहिती अधिका-याकडून राजबाग इमारतीकरिता बी.सी.सी. कसे देण्यात आले इ. अनुषंगिक सात मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१०.३.२००८ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने दाखल केलेल्या अर्जातील माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपात असल्याने जन माहिती अधिका-यांनी केलेला खुलासा योग्य असल्याचे नमूद करुन दि.५.५.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळयात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, फायर ब्रिगेडच्या एन.ओ.सी.प्रमाणे दोन पॅसेंजर लिफ्टपैकी एक लिफ्ट बेसमेंटपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. परंतु, तशी रचनाही करण्यात आलेली नाही. तरीही जन माहिती अधिका-याकडून राजबाग इमारतीकरिता बी.सी.सी. कसे देण्यात आले इ.अनुषंगिक सात मुद्दयांवर माहिती मागितली होती. दि.३.३.२००८ रोजी केलेल्या इनस्पेक्शनमध्ये बेसमेंटमध्ये अर्धा तास सेल्पक्लोजिंग फायद रेझिस्टंट डोअरची व्यवस्था तसेच पहिल्या माळयावर सुध्दा अर्धा तास सेल्पक्लोजिंग फायद रेझिस्टंट डोअरची व्यवस्था केलेली नाही असे अनदिर्शनास आले आहे. म्हणून काय्रकारी अभियंता/ इमारत प्रस्ताव शहर यांना तशा प्रकारे कळवून योग्य ती कार्यवाही करण्यास कळविण्यात आले आहे. दोन पॅसेजर लिफ्टपैकी एक लिफ्ट बेसमेंटपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना तशी व्यवस्था केलेली नाही असे पाहणी केल्यावर आढळले आहे. म्हणून काय्रकारी अभियंता/ इमारत प्रस्ताव शहर यांना तशा प्रकारे कळवून योग्य ती कार्यवाही करण्यास कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशामन अधिकारी, मुंबई अग्निशामन दल यांनी अपिलकारास दि.१०.३.२००८ च्या पत्राने उत्तर दिले आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, शहर यांनी सदर अनियमिततेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास कळविल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. याप्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**अपील क्र.२००८/ १४२०/०२**

**श्री. नवीनचंद्र किरपाशंकर उपाध्याय,** **------ तक्रारदार**
**सी-४०, लक्ष्मीकृपा इमारत,**
**साईबाब को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**दप्तरी सर्व्हिस रोड, नॅशनल हायवे,शांताराम पाडा,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-------- गैरतक्रारदार**

## - विवेचन -

तक्रारदार श्री. नविनचंद्र उपाध्याय, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारदाराने गैरतक्रारदार तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, धनजीवाडी चाळ येथ्रील सहकारी गृहनिर्माण संस्थ्रेबाबत झोपडपट्टी प्राधिकरणाकडून किती सदनिकाधारकांना ओळखपत्र देण्यात आले, अभियांत्रिकी कक्षाकडे किती लोकांचे पैसे जमा आहेत, तसेच पात्र नावांची प्रमाणित यादी देण्याबाबत मागणी केली होती.

तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संस्थेकडून घेण्यात यावी असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले. तसेच, गैरतक्रारदाराकडे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन दिली. अन्य माहिती संदर्भात तक्रारदारास माहिती देण्याबाबत गैरतक्रारदाराने संबंधित गृहनिर्माण संस्थेस निदेश दिले होते. संस्थेने तक्रारदारास माहिती दिली नसल्याने तक्रारदराने राज्य माहिती आयोगाकडे दि.७.७.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. सदर अपिलावर राज्य माहिती आयोगात सुनावणी आयोजित करण्यात आली. तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती गैरतक्रारदाराने स्वतः माहिती संकलित करुन एकत्रित स्वरुपात तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.२५.२.२००८ रोजी आदेश पारित केले. राज्य माहिती आयोगाने आदेश देवूनही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार

दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदाराने गैरतक्रारदार तथा सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, धनजीवाडी चाळ येथ्ील सहकारी गृहनिर्माण संस्थे्बाबत झोपडपट्टी प्राधिकरणाकडून किती सदनिकाधारकांना ओळखपत्र देण्यात आले, अभियांत्रिकी कक्षाकडे किती लोकांचे पैसे जमा आहेत, तसेच पात्र नावांची प्रमाणित यादी देण्याबाबत मागणी केली होती. तक्रारदारास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या ओळखपत्राबाबत माहिती मिळाली आहे. अभियांत्रिकी विभाग, उपजिल्हिाधिकारी विभाग व सहाय्यक नगर रचनाकार या विभागाकडून माहिती तक्रारदारास मिळाली नव्हती. सर्व संबंधित विभागाकडून माहिती संकलित करुन तक्रारदारास एकत्रित माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाने दि.२५.२.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने सर्व माहिती संकलित करुन क्र.मुंबई/सनि/झोपुप्रा/३/३३६/सन २००८, दि.२.७.२००८ च्या पत्रानुसार तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे गैरतक्रारदाराने सुनावणीच्या वेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन गैरतक्रारदाराने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. गैरतक्रारदाराने तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास तक्रारदाराने आवश्यक अधिक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता माहितीच्या अधिकारात सर्व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करुन माहितीची मागणी करणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४२१/०२**

**श्री. रविकांत बी. देवगडकर,** **------ अपीलकर्ता**
**मराठी विभाग, पाटकर वर्दे कॉलेज,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**चिकित्सक समूह ट्रस्ट,**
**प्राचार्य, पाटकर वर्दे कॉलेज, एस.बी.रोड,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**चिकित्सक समूह ट्रस्ट,**
**प्राचार्य, पाटकर वर्दे कॉलेज, एस.बी.रोड,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रविकांत बी. देवगडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा चिकित्सक समूह ट्रस्ट, प्राचार्य, पाटकर वर्दे कॉलेज, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे दि. ११.१.२००८ रोजी अर्ज करुन, चिकित्सक समूह चॅरिटेबल ट्रस्ट, गोरेगांव, मुंबई या ट्रस्टबाबत अनुषंगिक चार मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकाराने चिकित्सक समूह ट्रस्ट बाबत माहिती मागितली आहे. सदर ट्रस्ट खाजगी असल्याने माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नसल्याचे वकिला मार्फत अपिलकारास दि.१९.३.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा चिकित्सक समूह ट्रस्ट, प्राचार्य, पाटकर वर्दे कॉलेज, गोरेगांव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, चिकित्सक समूह चॅरिटेबल ट्रस्ट, गोरेगांव, मुंबई या ट्रस्टबाबत अनुषंगिक चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. ज्या सार्वजनिक प्राधिकरणास शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय, संस्था, कोणतेही प्राधिकरण इ.ना माहितीचा अधिकार अधिनिमय लागू आहे. खाजगी ट्रस्टला शासनामार्फत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे वित्त पुरवठा केला जात नसल्यास अशा ट्रस्ट माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाहीत. सदर विश्वस्थ संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकाराने संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणी आवश्यक वाटते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दिलेले उत्तर समर्पक असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४२२/०२**

**श्री. ए.एस. रानगांवकर,** **------ अपीलकर्ता**
**४२, माणिक अपार्टमेंट, भवानी शंकर रोड,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. ए.एस.रानगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि.१५.४.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. सी.बी.छाजेड यांनी फ्लॅट क्र.११, १२ व १३ मध्ये अनधिकृतरित्या दुरुस्तीचे काम करीत असल्याने त्यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत मागणी करुन अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१४.५.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पुरवावी असे नमूद करुन दि.२०.६.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री. सी.बी.छाजेड यांनी फ्लॅट क्र.११, १२ व १३ मध्ये अनधिकृतरित्या दुरुस्तीचे काम करीत असल्याने त्यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत मागणी करुन अनुषंगिक माहिती मागितली होती. श्री.सी.व्ही. छाजेड यांच्या विरुध्द एम.आर.टी.पी. ॲक्ट, १९६६ अनुसार कारवाई सुरु केली. श्री.छाजेड यांच्याविरुध्द केलेल्या कार्यवाहीच्या छायाप्रती अपिलकारास दि.१४.५.२००८ च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्या आहेत. अर्जातील मुद्दा क्र.३ बाबत कार्यालयात माहिती उपलब्ध नाही. मुद्दा क्र.४.५.६ बाबत मागितलेली माहिती माहितीच्या अधिकार कक्षेत येत नसल्याचे दि.१४.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले आहे. श्री.छाजेड यांनी अवैधरित्या फ्लैटची दुरुस्ती सुरु केल्याबाबत त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याची अपिलकाराची मागण होती. एम.आर.टी.पी.ॲक्टर, १९६६ अन्वये श्री.छाजेड यांच्या विरुध्द कारवाई सुरु करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. परंतु श्री.छाजेड यांनी सुरु केलेले दुरुस्तीचे कामाबाबत पुढे काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती अपिलकारास दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अवैधरित्या दुरुस्तीच्या कामाविरुध्द सुरु करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावा.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यां येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४४६/०२**

**श्री. हरिगेन सिंह,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- श्री. महावीर ओझा,**
**रुम नं.३१, दुसरा माळा, ३९ रामवाडी,**
**काळबादेवी रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**धर्मादाय आयुक्त, यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला,**
**८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा मनोनीत कार्यवाहक महामंत्री,**
**श्री रामलील सेवा केंद्र,**
**जयहिंद्र बिल्डिंग नं.१, ५ वा मजला,**
**भुलेश्वर, मुंबई- ४०० ००२.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. हरिगेन सिंह, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मनोनीत कार्यवाहक महामंत्री, श्री रामलीला सेवा केंद्र, भुलेश्वर, मुंबई, यांच्याकडे दि.८.२..२००८ रोजी अर्ज करुन, २००५-०६ या वर्षी आयोजित केलेल्या रामलीला महोत्सवाकरिता जमा करण्यात आलेल्या निधीसंबंधीच्या पावत्यांचे क्रमवार विवरण, शिल्लक रकमेसंबंधीचे विवरण, आजीवन सदस्यांकडून प्राप्त झालेला निधी इ.संबंधीची पूर्ण अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मनोनीत कार्यवाहक महामंत्री, श्री रामलीला सेवा केंद्र, भुलेश्वर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, २००५-०६ या वर्षी आयोजित केलेल्या रामलीला महोत्सवाकरिता जमा करण्यात आलेल्या निधीसंबंधीच्या पावत्यांचे क्रमवार विवरण, शिल्लक रकमेसंबंधीचे विवरण, आजीवन सदस्यांकडून प्राप्त झालेला निधी इ.संबंधीची पूर्ण अनुषंगिक माहिती मागितली होती. श्री रामलीला सेवा केंद्र खाजगी असल्याने अपिलकाराचा अपील अर्ज पुढील कार्यवाहीकरिता अपिलीय अधिका-यांनी दि.९.६.२००८ च्या पत्रान्वये श्री रामलीला सेवा केंद्राकडे पाठवून सदर न्यासाच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटून आवश्यक असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याकरिता पाठपुरावा करावा असे अपिलकारास कळविले. खाजगी न्यास, संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू नसल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तरामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. श्री रामलीला सेवा केंद्राने रामलीला महोत्सवासाठी सन २००५-०६ या वर्षी जमा केलेला निधी, केलेला खर्च, शिल्लक रक्कम इ.संबंधीची माहिती मागितली आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी श्री रामलीला सेवा केंद्रास कळवूनही केंद्राने माहिती दिली नाही. श्री रामलीला महोत्सव निधीमध्ये व्यापक भ्रष्टाचार झाला असल्याने अपिलकाराने द्वितीय अपीलात नमूद केले आहे. सदर बाब विचारात घेऊन धर्मादाय आयुक्तांनी खाजगी संस्थाना लागू असलेल्या नियमानुसार सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन अपिलकारास माहिती पुरवावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४४८/०२**

**श्री. महावीर प्रसाद सैनी,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- हॉटेल प्रेसिडेन्ट,**
**महाराष्ट्र नगर,वाद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. महावीर प्रसाद सैनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१०.३.२००८ रोजी अर्ज करुन, सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, यांच्या दि.१६.२.२००८ च्या पत्रास अनुसरुन दि. २९.२.२००८ रोजी अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, श्री.वझरकर यांय्या दालनात घेतलेल्या जबाबाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ,  सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,  यांच्या दि.१६.२.२००८ च्या पत्रास अनुसरुन दि. २९.२.२००८ रोजी  अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, श्री.वझरकर यांय्या दालनात घेतलेल्या जबाबाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. महाराष्ट्र नगरविकास एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कर्ष एसआरए गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र नगर एसआरए गृहनिर्माण संस्था या तीन संस्थांच्या जनरल बॉडी निवडणुकीत निवडून आलेली व्यवस्थापक समिती व तिचे पदाधिकारी तसेच या तिन्ही संस्थांनी उघडलेले खाते क्रमाक व कोणत्या व्यक्तिच्या हस्ताक्षराने खाते कार्यान्वित आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.  अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही संस्था पातळीवरील असून ती संस्थेकडून प्राप्त करावी असे अपिलकारास दि.२५.२.२००८ च्या पत्रानवयें जन माहिती अधिका-यांनी कळविले. संस्थेने माहिती पुरविली नसल्याने अपिलकाराने संस्थे विरुध्द प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले होते. अपिलकाराने उपस्थित केलेला मुद्दा हा संस्थेच्या व्यवस्थापनाबाबत असून, संस्थेच्या उपविधीनुसार १०३ सभासदांनी संस्थेला अर्ज करावा. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आदेश पारित करण्यात आले होते. यावरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक आदेश पारित केले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४४९/०२**

**श्री. महावीर प्रसाद सैनी,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- हॉटेल प्रेसिडेन्ट,**
**महाराष्ट्र नगर,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का)**
**उपनगरे, नवीन प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. महावीर प्रसाद सैनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१४.१.२००८ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जारी केलेले एलओआय, ले आऊट, प्रत्येक पुनर्वसन इमारतीचे आयओए, सी.सी. व परिशिष्ट-२ व पुरवणी परिशिष्ट-२ च्या छायाप्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपोटी रु.१५२/-इतके शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२३.६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जारी केलेले एलओआय, ले आऊट, प्रत्येक पुनर्वसन इमारतीचे आयओए, सी.सी. व परिशिष्ट-२ व पुरवणी परिशिष्ट-२ च्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कर्ष को.ऑप.हौ.सोसायटी नियोजितचे परिशिष्ट-२ न देता भलत्याच को.ऑप.हौ.सोसायटीच्या नावाने परिशिष्ट-२ देण्यात येत होते. म्हणून अपिलकाराने परिशिष्ट-२ घेतले नाही असे अपिलकाराने प्रथम अपिलात नमूद केले होते. जोडपत्र-२ मध्ये नवव्या मुद्दयावर " झोपडपट्टीचे स्थानिक नाव शासकीय वसाहत, महाराष्ट्र नगर असून, झोपडपट्टीधारकाच्या नियोजित संस्थेचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कर्ष को.ऑप.हौ.सोसायटी (नियोजित) आहे." याचाच अर्थ जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास देऊ केलेले परिशिष्ट-२ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कर्ष को.ऑप.हौ.सोसायटीचेच (नियोजित)आहे. असा प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.६.२००८ च्या आदेशात खुलासा केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने कार्यालयातील संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध परिशिष्ट-२ च्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४५०/०२**

**श्री. भालचंद्र चांदोरकर,** **------ अपीलकर्ता**
**१/२२, नाताळवाला टेरेस,**
**गोखले रोड, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **-------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. भालचंद्र चांदोरकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि. ६.९.२००७ रोजी अर्ज करुन, अर्धपगारी रजेबाबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २ (च) मधील नमूद माहितीच्या व्याख्येमध्ये अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा समावेश होत नसल्याने अपिलकाराची विनंती मान्य करता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.४.१०.२००७ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अर्धपगारी रजेबाबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. हाफकीन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचा-याच्या मागण्यासंदर्भात विधान परिषदेत विशेष उल्लेख म्हणून श्रीमती संजीवनी रायकर, विपस यांनी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास दि.१४.१२.२००१ रोजी पत्र दिले होते. यासंदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीची अपिलकाराने माहिती मागितली होती. अपिलकाराच्या मागणीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हाफकिन महामंडळाच्या कर्मचा-यांच्या मागण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/ १४५१/०२**

**श्री. भालचंद्र चांदोरकर,** **------ अपीलकर्ता**
**१/२२, नाताळवाला टेरेस,**
**गोखले रोड, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. भालचंद्र चांदोरकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि. ६.९.२००७ रोजी अर्ज करुन, भूतपूर्व हाफकिन संस्थेचे दि.१.९.१९७५ मध्ये (१) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ लि. व (२) हाफकिन संस्था प्रशिक्षण, संशोधन व तपासणी अशी दोन विभागात विभागणी करण्यात आली. विभागणीच्यावेळी दोन्ही संस्थेतील कर्मचा-यांना दि.१.९.१९७५ पूर्वी अस्तित्वात असलेले कोणतेही लाभ कर्मचा-यांना कमी असणार नाहीत असे शासन आदेश निर्गमित केले. परंतु प्रत्यक्षात सेवा शर्ती कमी दिल्या. याबाबत हाफकिन महामंडळाच्या कर्मचा-यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. नव्याने निर्माण झालेले महामंडळ व संस्था यांची निर्मिती नियमानुसार नाही असा न्यायालयाने निकाल दिला. म्हणून कर्मचा-यांना दि.१.९.७५ पासून सर्व आर्थिक फायदे लागू करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती माहितीच्या व्याख्येमध्ये समावेश होत नसल्याने अपिलकाराची विनंती अमान्य करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.४.१०.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.११.२००७रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी

दि.१५.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, हाफकिन महामंडळातील कर्मचा-यांच्या मागण्यासंदर्भात अनुषंगिक माहिती मागितली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हाफकिन महामंडळातील कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४५२/०२**

**प्रो.डॉ.डी.आर.भारद्वाज,** **------ अपीलकर्ता**
**प्रकाश ड्रायफ्रूटस्, ७ काकाजी नगर,**
**बस टर्मिनस समोर,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी आणि आर विभाग,**
**१ ला मजला, नारायण जोशी मार्ग,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी आणि आर विभाग,**
**१ ला मजला, नारायण जोशी मार्ग,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार प्रो.डॉ.डी.आर.भारद्वाज, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, पी आणि आर विभाग, कांदिवली (प.) मुंबई, यांच्याकडे दि. १०.४.२००७ रोजी अर्ज करुन, काकाजी नगर येथील मूळ भाडेकरु (निवासी आणि व्यापारी) टप्प्याटप्प्याने स्थलांतरीत करीत असल्याबाबत प्रकल्पाच्या सद्य:स्थितीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीपोटी आवश्यक शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.२१.५.२००७ च्या पत्राने अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, पी आणि आर विभाग, कांदिवली (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, काकाजी नगर येथील मूळ भाडेकरु (निवासी आणि व्यापारी) टप्प्याटप्प्याने स्थलांतरीत करीत असल्याबाबत प्रकल्पाच्या सद्यःस्थितीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून संबंधित नस्तीची पाहणी केल्यानंतर आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.५.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. कार्यालयात अपिलकार उपस्थित राहिले नसल्याने त्यांना जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे दिसून येते. अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास आवश्यक माहिती प्राप्त करुन देण्याच्यादृष्टीने अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार एक संधी उपलब्ध होते. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४५४/०२**

**श्री. रजनिश कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**१/१९, वरळी बी.डी.डी.चाळ,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**प्रशासकीय इमारत, पहिला मजला,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रजनीश कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. १३.३.२००८ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षातील उत्तर मुंबई विभागात अदा केलेल्या सर्व देयकाची कामाच्या नावासह यादी, खात्याच्या नियोजनासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी व वापर इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून, या कामासाठी अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे लागणार आहे. तसेच कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वापरावी लागणार आहे. त्यासाठी प्रचंड खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण केल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क आकारुन उपलब्ध करुन देता येतील, असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२८.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.७.२००८ सुनावणी आयोजित केली. जन माहिती

अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलकारास निरीक्षणानंतर महत्वाची वाटणारी विविक्षित माहिती सशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. माहिती अधिका-याने कालमर्यादेचे पालन केले नाही. यामुळे माहिती विनामूल्य देण्याबाबत अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षातील उत्तर मुंबई विभागात अदा केलेल्या सर्व देयकाची कामाच्या नावासह यादी, खात्याच्या नियोजनासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी व वापर इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने संबंधित नस्तीचे निरीक्षण केल्यानंतर अपिलकारास माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविल्याचे दिसते. यावरुन अपिलकारास माहिती देण्यास जनमाहिती अधिका-यांनी टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४५५/०२**

**श्री. रजनिश कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**१/१९, वरळी बी.डी.डी.चाळ,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**३ रा मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर,**
**आवार, मुंबई- ४०० ०२३.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. रजनिश कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर, जुने जकात घर, आवार, मुंबई, यांच्याकडे दि. २५.२.२००८ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षातील उत्तर मुंबई विभागात अदा केलेल्या सर्व देयकाची कामाच्या नावासह यादी, खात्याच्या नियोजनासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी व वापर इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून, या कामासाठी अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे लागणार आहे. तसेच कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वापरावी लागणार आहे. त्यासाठी प्रचंड खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे अपिलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे निरीक्षण केल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क आकारुन उपलब्ध करुन देता येतील, असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ८.७.२००८ सुनावणी आयोजित केली. जन माहिती

अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपिलकारास निरीक्षणानंतर महत्वाची वाटणारी विविक्षित माहिती सशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. माहिती अधिका-याने कालमर्यादेचे पालन केले नाही. यामुळे माहिती विनामूल्य देण्याबाबत अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षातील उत्तर मुंबई विभागात अदा केलेल्या सर्व देयकाची कामाच्या नावासह यादी, खात्याच्या नियोजनासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी व वापर इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने संबंधित नस्तीचे निरीक्षण केल्यानंतर अपिलकारास माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविल्याचे दिसते. यावरुन अपिलकारास माहिती देण्यास जनमाहिती अधिका-यांनी टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४५६/०२**

**श्री. निपूण मठकर, ------ अपीलकर्ता**
**बी-५, जीवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजयनगर,**
**नालासोपारा (पूर्व), जि.ठाणे- ४०० २०८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त प्रबंधक,**
**लोकआयुक्त यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ ला मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक,**
**लोकआयुक्त यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, १ ला मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२. -------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. निपूण मठकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक, लोकआयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, लोक आयुक्त कार्यालयातील एकूण पदसंख्या, भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.६.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. महत्वाची माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितलेली नाही. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास दि.१३.६.२००८ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली असल्याचे नमूद करुन दि.२४.७.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक, लोकआयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, लोक आयुक्त कार्यालयातील एकूण पदसंख्या, भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवारीनुसार पदसंख्या इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. लोक आयुक्त आणि उप लोकआयुक्त कार्यालयासंबंधीची सर्वंकष माहिती पूर्ण भरुन महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दि.१३.६.२००८ च्या पत्राने दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१०४१/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा,** **------ अपीलकर्ता**
**कासा अल्मेडा फ्लॅट नं.१०३,**
**१. सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड समोर,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**विभागीय जिल्हा निबंधक सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा), तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**सहकार बाजार बिल्डिंग, ४ था मजला,**
**वांद्रे रेल्वे स्टेशनसमोर,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. लेस्ली अल्मेडा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१०.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार बाजार बिल्डिंग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.८.८.२००७ रोजी अर्ज करुन, सॅलसेट कॅर्थालिक को.ऑप.हौ.सोसायटीबाबत अनुषंगिक ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने सदरची माहिती संस्थेकडून लेखी अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३०.८.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२२.१०.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार बाजार बिल्डिंग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सॅलसेट कॅर्थालिक को.ऑप.हौ.सोसायटीबाबत अनुषंगिक ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. व्यवस्थापक समितीच्या निवडून आलेल्या सभासदांनी दिलेल्या बंधपत्राच्या प्रती, श्री.कॉरमेल गोन्साल्वीस यांनी सही केलेल्या फॉर्मची प्रत, वायनी फेरेरा, बाझील मोन्टेरो, मारी रॉड्रीक्स, हेन्री गोन्साल्वीस इ.सदस्यांनी सही केलेल्या बंधपत्राची प्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने संस्थेकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलकारास दि.३०.८.२००७ च्या पत्राने कळविले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१११६/०२**

**श्री. मोईन अख्तर कुरेशी आणि विमल भारती, ------ अपीलकर्ता**
**५८६, जे.एस.एस.रोड,**
**चिराबाजार, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२. -------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मोईन अख्तर कुरेशी आणि विमल भारती, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभागात इमारती विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या प्रती, वकीलाने दिलेल्या नोटीसा, त्यास दिलेली उत्तरे, सहपत्र इ. दि.१.१.२००५ ते ३१.१२.२००६ आणि १.१.२००७ या कालावधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे व्यापक स्वरुप असल्याने त्यासाठी प्रमाणाबाहेर लेखनसामुग्रीचा वापर अपेक्षित आहे. कार्यालयाचे दैनंदिन कामकाज करुन मनुष्यबळाअभावी माहिती तयार करणे शक्य होत नाही त्यामुळे विहित कालावधीत अपिलकारास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.८.२००७ च्या पत्राने कळविले. माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने विशिष्ट स्वरुपाच्या माहिती ची मागणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन

२द्यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभागात इमारती विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या प्रती, वकीलाने दिलेल्या नोटीसा, त्यास दिलेली उत्तरे, सहपत्र इ. दि.१.१.२००५ ते ३१.१२.२००६ आणि १.१.२००७ या कालावधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलकाराने विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी करावी. त्यानंतर आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१११७/०२**

**श्री. गिरीश पटेल,** **------ अपीलकर्ता**
**५८६, तं.एस.एस.रोड,**
**चिराबाजार, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.** **-------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. गिरीश पटेल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००७ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागाने श्री.रमेश भाटीया यांच्या कालावधीत मनपा अधिनियम कलम ३५४-अे अनुसार निर्गमित केलेल्या नोटीसीच्या प्रतीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद करुन दि.१०.१.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागाने श्री.रमेश भाटीया यांच्या कालावधीत मनपा अधिनियम कलम ३५४-अे अनुसार निर्गमित केलेल्या नोटीसीच्या प्रतीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१२.७.२००७ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. सदर माहिती खोटी असल्याचे अपिलकाराने द्वितीय अपिलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. माहितीच्या अधिकारातील अर्जावर भविष्यात विहित कालावधीत कार्यवाही करण्यात येईल अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४५७/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी,** **------ अपीलकर्ता**
**३०२/अे, नव आसावरी को.ऑप.हौ.सो.लि.**
**१८२, जे. बी.नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्य अभियंता रस्ते यांचे कार्यालय,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्य अभियंता रस्ते यांचे कार्यालय,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आर.पी.यजुर्वेदी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, रस्ते यांचे कार्यालय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी अर्ज करुन, पश्चिम उपनगरात साकी विहार पवई रोड, सहार रोड, ए.के.रोड खणून टी.टी.एम.एल.चे केबल टाकण्यास एम.एम.आर.डी.ए.ने परवानगी दिली असल्याबाबतची एकूण सहा मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. व दि.२.७.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती सात दिवसाचे आंत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, रस्ते यांचे कार्यालय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पश्चिम उपनगरात साकी विहार पवई रोड, सहार रोड, ए.के.रोड खणून टी.टी.एम.एल.चे केबल टाकण्यास एम.एम.आर.डी.ए.ने परवानगी दिली असल्याबाबतची एकूण सहा मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती सात दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश देवूनही त्यांनी अपिलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११०९/०२**

**श्री. नरेंद्र गजानन गांधी,** **------ अपीलकर्ता**
**रा.पारसनगर, बिल्डिंग नं.१,**
**अपार्टमेंट नं.१/बी/१०२, शंकर लेन,**
**कांदिवली (प.), मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, चेतना कॉलेजसमोर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिलदार बोरीवली, नाटकवाला लेन,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली (प.) मुंबई- ४०० ०९२.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नरेंद्र गजानन गांधी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, नाटकवाला लेन, एस.व्ही.रोड, बोरीवली (प.) बोरीवली, मुंबई, यांच्याकडे दि. २१.११.२००७ रोजी अर्ज करुन, महसूल गाव वळणई, ता.बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्वे नं./हिस्सा नं.६-२, ६-३ व ७-२ या मिळकतीमध्ये अर्जदाराचे हक्क नोंद करण्याचे अर्जाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारातील अर्जात तहसिलदाराकडील अहवालाचा क्रमांक अथवा दिनांक नमूद केला नसल्यामुळे अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. सबब अर्जाबाबत तहसिलदार, बोरीवली यांच्या कार्यालयाशी संपर्क साधवा असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.११.२००७ च्या पत्राने कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील तालुका/ गावचे मूळ अभिलेख पडताळणी करुन पुढील कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार

करावी. केलेल्या कार्यवाहीबाबत अपिलकारास कळवावे असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.७.२००७ च्या पत्राने जन माहिती अधिका-यांना कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.२.२००८ च्या पत्राने माहिती पुरविली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता, रस्ते यांचे कार्यालय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महसूल गाव वळणई, ता.बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्वे नं./हिस्सा नं.६-२, ६-३ व ७-२ या मिळकतीमध्ये अर्जदाराचे हक्क नोंद करण्याचे अर्जाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक त्या उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१०४०/०२**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३९/२/३, नवजीवन को.ऑप.हौ.सो.**
**इंदिरानगर, पोलीस चौकीसमोर,**
**सर्विस रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग,,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग,,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०..** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग, वांद्र (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२५.५.२००७ रोजी अर्ज करुन, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास न.भू.क्र.७५१, न्यु ब्युटिक शॉपिंग सेंटर, राजस्थान हॉटेल शेजारी, खार (प.), मुंबई यासंदर्भात जे लेखी उत्तर पाठविण्यांत आले त्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे संबंधित इमारत मालकाने मंजूर झालेला आराखडा जो जन माहिती अधिका-यांना दाखविला त्याची साक्षांकित नक्कल मिळण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.७.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. मंजूर आराखडयाची प्रत इमारती प्रस्ताव विभागाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलकारास पुरविण्या बाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना निदेश देऊन दि.१७.७.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याच्या

कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/प. विभाग, वांद्र (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास न.भू.क्र.७५१, न्यु ब्युटिक शॉपिंग सेंटर, राजस्थान हॉटेल शेजारी, खार (प.), मुंबई यासंदर्भात जे लेखी उत्तर पाठविण्यांत आले त्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे संबंधित इमारत मालकाने मंजूर झालेला आराखडा जो जन माहिती अधिका-यांना दाखविला त्याची साक्षांकित नक्कल मिळण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. इमारती प्रस्ताव विभागाकडून मंजूर आराखडयाची प्रत प्राप्त करुन घेऊन अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.७.२००७ रोजी आदेश दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मंजूर आराखडयाची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही विहित कालावधीत केली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/११३१/०२**

**श्री. मनुभाई लखानी (मा.सचिव),** **------ अपीलकर्ता**
**बॉम्बे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन,**
**मधु कंपाऊंड, २ रा मजला, सोनावाला क्रॉस रोड,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त,**
**महाराष्ट्र विक्रीकर भवन (नविन),**
**जी-९, नववा मजला, माझगांव, मुंबई- ४०० ०१०.**

**जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त,**
**महाराष्ट्र विक्रीकर भवन (नविन),**
**जी-९, नववा मजला, माझगांव, मुंबई- ४०० ०१०** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मनुभाई लखाने, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त, महाराष्ट्र विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई, यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी अर्ज करुन, बॉम्बे सेल्स टॅक्स ॲक्ट १९५९ आणि व्हॅट २००२ अंतर्गत नोंदणीकृत वितरकांची माहिती व १५ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.१०.२००७ च्या पत्राने माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.१०़२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.४.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने सदर माहिती चाळीस ठिकाणाहून जमा करावी लागणार असल्यामुळे याकरिता मोठया प्रमाणात मनुष्यबळ, वेळ लागणार असल्याने जन माहिती अधिकारी अपिलकारास माहिती पुरवू शकत नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती अपिलकारास पुरविणे बंधनकारक असल्याने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती पुरवावी असे निदेश देवून दि.१२.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या

कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त, महाराष्ट्र विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बॉम्बे सेल्स टॅक्स अॅक्ट १९५९ आणि व्हॅट २००२ अंतर्गत नोंदणीकृत वितरकांची माहिती व १५ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.१०.२००७ च्या पत्रान्वये चार मुदद्यांबत माहिती उपलब्ध करुन दिली. अर्जातील उर्वरित ११ मुद्दयांबाबतची माहिती राज्यातील संबंधित विक्रीकर सह आयुक्त यांचेशी संबंधित असल्याने सर्व संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यांनंतर पुरवण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविल्याचे दिसून येते. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१११९/०२**

**श्री. मोईन अख्तर कुरेशी आणि विमल भारती, ------ अपीलकर्ता**
**५८६, जे.एस.एस.रोड,**
**चिराबाजार, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी,**
**मरीनलाईन्स, मुंबई- ४०० ००२. . -------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मोईन अख्तर कुरेशी आणि विमल भारती, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे दि. ३.५.२००७ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागात दि.१.१.२००३ पासून आजतागायत मनपा अधिनियम कलम ३५१ प्रमाणे किती नोटीसा निर्गमित केल्या, नोटीशीची प्रत, अंतिम आदेशाची प्रत, न्यायालयाच्या स्थगिती/ इंजेक्शनची प्रत, मनपा अधिनियमातील कलम ३५४-अे अनुसार निर्गमित केलेल्या नोटीशीची प्रत, आदेशाची प्रत, एमआरटीपी अन्वये निर्गमित केलेल्या नोटीसची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या नोटीस/ आदेश इ.च्या अंदाजे २००० छायाप्रती होतील. सदर काम मनुष्यबळाअभावी दैनंदनि कामकाज करुन करणे शक्य नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.८.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय

अधिका-यांनी दि.५.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन केले. अपिलकाराने विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद करुन दि.२८.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही, प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती पुरविण्याबाबत आदेश पारित केले नाहीत यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी वॉर्ड, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभागात दि.१.१.२००३ पासून आजतागायत मनपा अधिनियम कलम ३५१ प्रमाणे किती नोटीसा निर्गमित केल्या, नोटीशीची प्रत, अंतिम आदेशाची प्रत, न्यायालयाच्या स्थगिती/ इंजेक्शनची प्रत, मनपा अधिनियमातील कलम ३५४-अे अनुसार निर्गमित केलेल्या नोटीशीची प्रत, आदेशाची प्रत, एमआरटीपी अन्वये निर्गमित केलेल्या नोटीसची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-याने दि.२८.१२.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४७३/०२**

**श्री. निखिल जयंतीलाल गांधी,** **------ अपीलकर्ता**
**१८५- अे,श्री शिवम को.ऑप.हौ.सोसायटी,**
**फ्लॅट अे-७, ३ रा मजला, एस.व्ही.रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३) मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. निखिल जयंतीलाल गांधी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई, यांच्याकडे दि.१४.५.२००८ रोजी अर्ज करुन, दि.२.५.२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.२.५.२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. संस्थेच्या बैठकीकरिता कायद्याप्रमाणे सभासदाच्यावतीने अन्य व्यक्ती, सभासद नसलेली व्यक्ती उपस्थित राहू शकत नाही. याबाबत अपिलकाराने तक्रार अर्ज करुन केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४७५/०२**

**श्री. मेनिनो फ्रान्सिस्को, ग्रेगोरी फर्नांडीस,** **------ अपीलकर्ता**
**१०१-बी, फ्लॉरेन्स मिठागर रोड,**
**कंडेरपाडा, दहिसर (प.),मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ विभाग,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाण पुलाजवळ,**
**दहिसर (प.) मुंबई- ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ विभाग,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाण पुलाजवळ,**
**दहिसर (प.) मुंबई- ४०० ०६८.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मेनिनो फ्रान्सिस्को, ग्रेगोरी फर्नांडीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ विभाग, दहिसर, मुंबई, यांच्याकडे दि. १२.५.२००८ रोजी अर्ज करुन, रॉक कॅस्टल सहकारी गृहनिर्माण संस्था, मिठागर रोड, दहिसर, मुंबई येथील अवैध बांधकामाबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास असे कळविले की, यापूर्वी सदर प्रकरणी अपिलकाराने माहिती मागितली होती. संबंधित माहिती अपिलकारास दि.१.३.२००८ च्या पत्राने पुरविली आहे. आणखी काही माहिती हवी असल्यास संबंधित नस्तीची अपिलकाराने पाहणी करावी. त्यानंतर अपिलकारास आवश्यक माहिती पुरविण्यात येईल असे दि.१०.६.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध माहिती पुरवावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.७.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक, अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ विभाग, दहिसर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रॉक कॅस्टल सहकारी गृहनिर्माण संस्था, मिठागर रोड, दहिसर, अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.८.८.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४७६/०२**

**श्री. चैन रुप छाजर,** **------ अपीलकर्ता**
**अंबिका प्लाय पॅलेस, अण्णा नगर,**
**न्यू लिंक रोड, लक्ष्मी इंडस्ट्रीजवळ,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. चैन रुप छाजर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२५.४.२००८ रोजी अर्ज करुन, मौ.आंबिवली, न्यू लिंक रोड येथील अण्णनगर शिवशक्ती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारत क्र.१ मध्ये निवासी सदनिका धारकाची छायाप्रतीसह यादी मिळण्याबाबत माहिती मागितली होती.

संस्थेच्या पुनर्वसन इमारतीतील सदनिका धारकांच्या छायाप्रतीची अपिलकाराने मागणी केली आहे. सदरची माहिती संस्था पातळीवरील असल्याने अपिलकाराने आवश्यक माहिती संस्थेकडून प्राप्त करावी. तशा सूचना संस्थेस देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.५.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मौ.आंबिवली, न्यू लिंक रोड येथील अण्णनगर शिवशक्ती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारत क्र.१ मध्ये निवासी सदनिका धारकाची छायाप्रतीसह यादी मिळण्याबाबत माहिती मागितली होती. पुनर्वसन इमारत क्र.१ मधील निवासी सदनिका धारकांची फोटोसहित अपिलकाराने यादी मागितलेली आहे. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संस्थेकडून माहिती घेण्याबाबत कळविले. अपिलकारास संस्थेकडून माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, इमारत क्र.१ मधील निवासी सदनिकाधारकांची परिशिष्ट-२ मधील माहिती जन माहिती अधिका-यांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर परिशिष्ट-२ ची छायाप्रत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४७७/०२**

**श्री. दिनकर सिताराम साटम,** **------ अपीलकर्ता**
**६०१, श्रध्दा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**नटवर नगर, रोड नं.३,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**महाराष्ट्र राज्य वित्तीय कॉर्पोरेशन,**
**युनायटेड इंडिया बिल्डिंग, १ ला मजला,**
**सर पी.एम.रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**महाराष्ट्र राज्य वित्तीय कॉर्पोरेशन,**
**युनायटेड इंडिया बिल्डिंग, १ ला मजला,**
**सर पी.एम.रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. दिनकर सिताराम साटम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय कॉर्पोरेशन, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२१.११.२००६ रोजी अर्ज करुन, सेवानिवृत्ती वेतनाच्या अनुज्ञेय रकमा वेळेवर दिल्या नसल्याने व्याजासहित सेवानिवृत्ती लाभ देण्याबाबत अनुषंगिक मागणी केली होती.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीकरिता कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.५.२००७ च्या पत्राने कळविले. तसेच, आवश्यक माहितीपोटी रु.७८/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे दि. २३.१०.२००७ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय कॉर्पोरेशन, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सेवानिवृत्ती वेतनाच्या अनुज्ञेय रकमा वेळेवर दिल्या नसल्याने व्याजासहित सेवानिवृत्ती लाभ देण्याबाबत अनुषंगिक मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्याच्या दृष्टीने सोईचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कार्यालयातील नस्तीचे निरीक्षण करण्याकरिता बोलाविले होते. अपिलकार कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. अपिलकार हे दि.३१.५.९९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलकारास दि.२७.९.१९९९ रोजी राहिलेली भविष्यनिर्वाह निधीची रक्कम वितरित केली. अपिलकार यांच्या संदर्भात महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी सेवानिवृत्तीची रक्कम देण्यापूर्वी कायदेशीर सल्ला घेण्याचे आदेश दिले असल्याचे सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादप केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कायदेशीर सल्ला तात्काळ प्राप्त करुन अपिलकारास सर्व सेवानिवृत्ती लाभ देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावी.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३०/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४७८/०२**

**श्री. आनंद मनोहर हेलगांवकर,** **------ अपीलकर्ता**
**राजेंद्रनगर, ९/१४३, दत्तपाडा रोड,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन, मुंबई विभाग,**
**विद्याविहार, किरोल रोड,**
**कुर्ला (प.), मुंबई- ४०० ०८४.**

**जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,**
**मुंबई- ४०० ००८.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आनंद मनोहर हेलगांवकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई, यांच्याकडे दि.०९.१.२००८ रोजी अर्ज करुन, राज्य परिवहन महामंडळाचे राजेंद्रनगर बोरीवली येथील इमारत क्र.८, ९ व १० साठी सन १९८० नंतर आजपर्यंत किती रुपये दुरुस्तीपोटी खर्च केला, कोणकोणत्या ठेकेदाराकडून कोणकोणत्या कामासाठी किती देयके दिली, सेवा आकारापोटी व भाडयापोटी कर्मचा-याकडून किती रक्कम कपात केली, कर्मचारी किती रकमेच्या भाडे भत्त्यापासून वंचित राहिले याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास असमाधानकारक व अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, राज्य परिवहन महामंडळाचे राजेंद्रनगर बोरीवली येथील इमारत क्र.८, ९ व १० साठी सन १९८० नंतर आजपर्यंत किती रुपये दुरुस्तीपोटी खर्च केला, कोणकोणत्या ठेकेदाराकडून कोणकोणत्या कामासाठी किती देयके दिली, सेवा आकारापोटी व भाडयापोटी कर्मचा-याकडून किती रक्कम कपात केली, कर्मचारी किती रकमेच्या भाडे भत्त्यापासून वंचित राहिले याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. राज्य परिवहन कर्मचा-यांनी विनंती केल्यानंतर त्यांना उपलब्ध रिकामी सदनिका दिल्यानंतर त्यांच्या वेतनानुसार मिळणारा घरभाडे भत्ता त्यांना मिळत नाही. गाळयासाठी नियमानुसार सेवा कर व अधिभार भरावा लागतो. याबाबत अपिलकाराने मागितलेली अनुषंगिक माहिती लेखाधिकारी यांच्याकडून घेता येईल. इमारत क्र.८, ९ व १० सेल डीड रक्कम रु.५,५७,२५४/-व जमिनीची लिज डीड रक्कम रु.६६,९३६/- असे एकुण रु.६,२४,१९०/- भरुन इमारती मालकी हक्काने घेतलेली आहे. त्यामुळे या इमारतीवर कोणत्याही प्रकारे कोणाचाही मालकी हक्क राज्य परिवहन महामंडळाशिवाय प्रस्तापित होऊ शकत नाही. सदर इमारतीतील गाळे सेवानिवास म्हणून परिहवन महामंडळास दिलेले आहेत. खरेदीच्या प्रती पाहिजे असल्यास रजिस्ट्रेशन कार्यालय, वांद्रे येथे संपर्क साधावा. सदर माहिती १० वर्षापेक्षा अधिक कालावधीची असल्याने खरेदी खताच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देता येत नाहीत. राजेंद्रनगर बोरीवली येथील सदनिकेच्या दुरुस्ती कामासाठी केलेल्या खर्चाचा तपशील, ठेकेदाराचे नांव, कामाचा तपशील अपिलकारास उपलब्ध करुन दिला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन जन माहिती अधिका-याने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास दिली असल्याचे दिसून येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\DECEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४८०/०२**

**श्री. पारस उत्तमचंद जैन,**
**५,कल्याणी बंगला, नाशिक वजन काटयाच्या मागे,**
**इंदिरा नगर, नाशिक- ४२२ ००९.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग,**
**जोंबनपुत्र आवार, ग्रँटरोड (पूर्व), मुंबई- ४०० ००७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग,**
**जोंबनपुत्र आवार, ग्रँटरोड (पूर्व), मुंबई- ४०० ००७.** **-------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. पारस , यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग, ग्रँटरोड, मुंबई, यांच्याकडे दि. १५.४.२००८ रोजी अर्ज करुन, मालमत्ता क्र.डी-११७३, २९९ डी, महापुर्णाप्रसाद बिल्डिंग, राजा राममोहन रॉय मार्ग, लेखा क्र.डी-०१-०२६-००-७ यासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१४.५.२००८ च्या पत्राने असे कळविले की, उपलब्ध अहवालानुसार मालमत्ता ट्रस्टच्या नावे आहे. ती कधीपासून त्यांच्या नावावर आहे, तसेच नोंदणीबाबत दिलेल्या अर्जाची व त्यासोबत कागदपत्रे व इतर काही पुरावे उपलब्ध नाहीत. धर्मादाय आयुक्त यांच्याकडील दिलेल्या कागदपत्रासंबंधी त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधवा. मालमत्ता कराची देयके श्री.चंद्रकांत थत्ते यांच्या नांवावर अधिदान करण्याकरिता फार पूर्वीपासून पाठविण्यात येते. परंतु त्यांचा अर्ज किंवा तत्सम काही पुरावे कार्यालयात उपलब्ध नाहीत. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आवश्यक माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे नमूद करुन दि.१०.७.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास अर्जातील मुद्दा क्र.१ ते ५ मुद्दयाबाबत दि.१८.७.२००८ च्या पत्राने उत्तर दिले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग, ग्रँटरोड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मालमत्ता क्र.डी-११७३, २९९ डी, महापुर्णाप्रसाद बिल्डिंग, राजा राममोहन रॉय मार्ग, लेखा क्र.डी-०१-०२६-००-७ यासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. मालमत्ता हस्तांतरण प्रकरणाबाबत अपिलकाराने माहिती मागितली. मागील ५ वर्षाचा हस्तांतरण प्रकल्पाचा अभिलेख कार्यालयात जतन केलेला आहे. संदर्भित मालमत्तेचे हस्तांतरण मागील ५ वर्षामध्ये झालेले नसल्यामुळे मुद्दा क्र.१ ते ५ बाबत मालमत्ता हस्तांतरणासंबंधी माहिती देता येत नाही. मालमत्तेच्या देयकातील पत्त्यात श्री.चंद्रकांत थत्ते यांचे नावे कसे आले याबाबतची सविस्तर माहिती सहाय्यक आयुक्त/डी विभाग, (करनिर्धारण व संकलन) यांचेकडून घेण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१८.७.२००८ च्या पत्राने कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उक्त अधिनियमातील कलम ६ (३) (दोन) खालील परंतुकानुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाची प्रत विहित कालावधीत पाठवून तसे अर्जदारास जन माहिती अधिका-यांनी अवगत करणे आवश्यक आहे. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अर्जाचे हस्तांतरण करण्याची कार्यवाही विहित कालावधीत केल्याचे दिसून येत नाही. यामुळे अपिलकार माहिती मिळण्यापासून वंचित राहिले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराचा अर्ज हे आदेश प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांचे आत संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरण करुन अपिलकारास अवगत करावे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४८१/०२**

**श्रीमती अभिलाषा अनिल कवळे,**
**बी/००५, ब्लू बेल इमारत, सेंट्रल ॲव्हेन्यू,**
**हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई- ४०० ०६९.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग (निवास व्यवस्था),**
**शासकीय कुटीर क्र.८, फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मुंबई- ४०० ०२१.**

**जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक,**
**सामान्य प्रशासन विभाग (निवास व्यवस्था),**
**शासकीय कुटीर क्र.८, फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मुंबई- ४०० ०२१.** **-------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्रीमती अभिलाषा अनिल कवळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक, सामान्य प्रशासन विभाग, शासकीय कुटीर क्र.८, मुंबई, यांच्याकडे दि.१६.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील कलम ७(२)(ब),१५(अ)(२), २७ (१) अन्वये ज्यांना संरक्षण मिळाले व नंतर सर्वोच्च न्यायालयाकडील अधिग्रहित गाळेधारक यांचे बाजूने अंतिम निकाल दिला व कायम भाडेकरी म्हणून ज्यांना संरक्षण मिळाले अशा तत्कालिन अधिग्रहित जागांची यादी व गाळेधारकांची यादी यांची प्रमाणित प्रत मिळणेबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.२.२००८ च्या पत्राने कळविले की, कोणतीही अधिकृत यादी प्रसिध्द केली नसल्यामुळे यादी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. श्री.अनिल कवळे यांना पवई येथे देण्यात आलेले निवासस्थान साप्रवि (का-२३/अ) कडून देण्यात आले असल्यामुळे याबाबतच्या माहितीकरिता व अर्जातील क्र.१ (क) येथील माहितीकरिता कार्यासन-२३/अ कडे संपर्क साधावा. मुद्दा क्र.१ (ड) येथील माहिती कार्यासन-२३ संबंधी नसल्यामुळे सदर माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकार

सुनावणीकरिता हजर राहिले नाहीत. अपिलाबाबत अपिलकारास कोणत्याही प्रकारचे स्वारस्य नसल्याचे दिसून येते. असे नमूद करुन दि.२२.७.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक, सामान्य प्रशासन विभाग, शासकीय कुटीर क्र.८, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील कलम ७(२)(ब),१५(अ)(२), २७ (१) अन्वये ज्यांना संरक्षण मिळाले व नंतर सर्वोच्च न्यायालयाकडील अधिग्रहित गाळेधारक यांचे बाजूने अंतिम निकाल दिला व कायम भाडेकरी म्हणून ज्यांना संरक्षण मिळाले अशा तत्कालिन अधिग्रहित जागांची यादी व गाळेधारकांची यादी यांची प्रमाणित प्रत मिळणेबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जातील मुद्दा क्र.१ (ब), १ (क) व १ (ड) कार्यासन-२३ संबंधी नसल्याने माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.२.२००८ च्या पत्राने कळविले. परंतु उक्त अधिनियमातील कलम ६ (३) (दोन) अनुसार अपिलकाराचा अर्ज संबंधित जन माहिती अधिका-याकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही विहित कालावधीत केलेली नाही. सदर जन माहिती अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांचे आत अपिलकाराचा अर्ज संबंधित जन माहिती अधिका-यांकडे हस्तांतरित करावा. मागणीबाबत अपिलकारास तात्काळ माहिती देण्याबाबत कळवून तसे अपिलकारास अवगत करावे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**सबब, अपील अंशमः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१४८२/०२**

**श्री. अर्जुनलाल एम. छाब्रिया,**
**बेले व्हिस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,**
**लेक व एलआयसी ऑफीसमोर,**
**एस.व्ही.रोड, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अर्जुनलाल एम.छाब्रिया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि.१०.६.२००८ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, येथील अनधिकृत बांधकाम पाडण्यात आल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.११.७.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी, येथील अनधिकृत बांधकाम पाडण्यात आल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्यास आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केले नाही, माहिती दिली नाही. सदर प्रथम अपिलीय अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५१०/०२**

**श्री. शिरीष गोतेचा,**
**३, गोतेचा इस्टेट, साईनाथ रोड,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग,**
**मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शिरीष गोतेचा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (मेंटेनन्स.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी अर्ज करुन, मनपा अधिनियमांतर्गत प्लॉट क्र.६१, आनंद रोड येथील परमानंद हॉटेलला दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (मेंटेनन्स.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग, मालाड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मनपा अधिनियमांतर्गत प्लॉट क्र.६१, आनंद रोड येथील परमानंद हॉटेलला दिलेल्या नोटीसीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी, पी/उत्तर विभाग, मनपा यांचेकडून माहिती प्राप्त झाली असल्याने सदर प्रकरणी दिनांक ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेली सुनावणी रद्द करण्यांत यावी असे अपिलकाराने आयोगास लेखी अर्जान्वये कळविले आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०८/०२**

**श्री. धोंडीराम दासा जाधव,**
**घर क्र.३४९, राहुलनगर, नागवाडी भाग-१,**
**पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०० ०८९.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सेंट मार्टीन रोड,**
**वांद्रे(प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा अनुभाग अभियंता (परिरक्षण)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,सेंट मार्टीन रोड,**
**वांद्रे(प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. धोंडीराम दासा जाधव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अनुभाग अभियंता, (परिरक्षण), बृहन्मुंबई महानगरपालिका, सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि. १६.१२.२००७, १८.१२.२००७, ५.२.२००८, ११.२.२००८ (दोन अर्ज) १२.३.२००८ व दि.१७.३.२००८ असे एकूण ७ अर्ज सादर करुन, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.) मुंबई कार्यालयातील हजेरीपटाच्या पानाच्या छायांकित प्रती , जॉब स्लीपची प्रत, हजेरीपटामधील शेवटच्या पानाची प्रत, दैनंदिन कार्यक्रमाची प्रत, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकूण ७ प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अनुभाग अभियंता, (परिरक्षण), बृहन्मुंबई महानगरपालिका, सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.) मुंबई कार्यालयातील हजेरीपटाच्या पानाच्या छायांकित प्रती , जॉब स्लीपची प्रत, हजेरीपटामधील शेवटच्या पानाची प्रत, दैनंदिन कार्यक्रमाची प्रत, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५०९/०२**

**श्रीमती कविता प्रकाश देशमुख,**
**ई/९-३, स.गो.बर्वेनगर,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८४.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग,**
**जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती कविता प्रकाश देशमुख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, (अनुज्ञापन), बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. १३.२.२००८ रोजी अर्ज करुन, तेजस्वी महिला मंडळ या संस्थेने घाटकोपर (प.) रेल्वे स्टेशनच्या दुतर्फा रस्त्यालगत व रस्त्यावरील अनधिकृत/ अधिकृत दुकाने, स्टॉल्स, टप-या इ. सर्व बांधकामाची लेखी माहिती व संबंधित दस्तऐवजाच्या प्रती मिळण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.८.४.२००८ च्या पत्राने असे कळविले की, माहितीपोटी कार्यालयात रु.६६/- इतके शुल्क भरुन माहिती उपलब्ध होईल. अर्जातील मुद्दा क्र.ब, क, ड संदर्भात सहाय्यक अभियंता, एन विभाग यांच्याकडून माहिती मिळेल. तरी त्या विभागात संपर्क साधावा. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, (अनुज्ञापन), बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, तेजस्वी महिला मंडळ या संस्थेने घाटकोपर (प.) रेल्वे स्टेशनच्या दुतर्फा रस्त्यालगत व रस्त्यावरील अनधिकृत/ अधिकृत दुकाने, स्टॉल्स, टप-या इ. सर्व बांधकामाची लेखी माहिती व संबंधित दस्तऐवजाच्या प्रती मिळण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने माहितीपोटी कार्यालयात रु.६६/-इतके शुल्क भरुन ३३ अनुज्ञा पत्राच्या प्रती प्राप्त केल्या. त्या सर्व प्रती अत्यंत अस्पष्ट असल्याने कोणताही बोध होत नाही. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या प्रती या रामनिरंजन झुनझुनवाला कॉलेज ते वेलकम हॉटेल या मर्यादित ठिकाणी असलेल्या स्टॉल धारकांच्या आहेत. जे.पी.रोडवरील उर्वरित जागेवर असलेल्या स्टॉलच्या माहितीबाबत योग्य त्या खुलाशासह तपशील द्यावा. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या अस्पष्ट छायाप्रती संगणीकृत / टायपिंग करुन द्याव्यात अशी अपिलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपिलकारास एक संधी आहे. या प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५११/०२**

**श्री. कुशाल गोविंद गमरे,**
**साईप्रेरणा सहकारी संस्था मर्या.**
**फ्लॅट २४४, रुम -२४, सेक्टर-२,**
**चारकोप, कांदिवली, (प.), मुंबई- ४०० ०६७.** ------**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१..** ------- **उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. कुशाल गोविंद गमरे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१६.२.२००८ रोजी अर्ज करुन, साई प्रेरणा सहकारी संस्था, प्लॉट क्र.२४४, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली, मुंबई या संस्थेच्या पदाधिका-यांच्या कागदपत्राची व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.३.२००८ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, साई प्रेरणा सहकारी संस्था, प्लॉट क्र.२४४, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली, मुंबई या संस्थेच्या पदाधिका-यांच्या कागदपत्राची व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची अपिलकारास अधिनियमातील तरतुदीनुसार संधी आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपिलकारास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५१२/०२**

**श्री. अशोक के. कुदर,**
**भावेश्वरी दर्शन बिल्डिंग नं.५६,**
**खोली नं.७, पहिला मजला,**
**नटवर नगर रोड नं.४,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६०.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
**विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. अशोक के. कुदर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई, यांच्याकडे दि.१.४.२००८ रोजी अर्ज करुन, वरळी बी.डी.डी.चाळ क्र.३४, खोली क्र.७ या खोलीची भाडेदारी सध्या कोणाच्या नावे आहे, भाडेदारी हस्तांतरित करताना भाडेकरुने कोणते पुरावे सादर केले, भाडेदारी हस्तांतरित करताना न्यायालयाचे आदेश होते का, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.९.२००८ च्या पत्राने मुद्देनिहाय माहिती दिली. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वरळी बी.डी.डी.चाळ क्र.३४, खोली क्र.७ या खोलीची भाडेदारी सध्या कोणाच्या नावे आहे, भाडेदारी हस्तांतरित करताना भाडेकरुने कोणते पुरावे सादर केले, भाडेदारी हस्तांतरित करताना न्यायालयाचे आदेश होते का, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. खोलीची भाडेदारी श्री.दामोदर कुड्डू भंडारी यांच्या नावे त्यांनी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने वारसा हक्क या सदराखाली कार्यालयाने दि.१३.२.२००७ नुसार दि.१४.३.२००७ रोजी बीडीडी चाळ क्र.३४, खोली क्र.७ हस्तांतरित करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविल्याचे सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपिलकारास बीडीडी चाळ क्र.३४ मधील खोली क्र.७ च्या भाडेदारी हस्तांतरणाबाबत माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५१३/०२**

**श्री. मनोज कुमार यादव,**
**तपस्या टाईम्स, १ ला मजला,**
**साकीनाका इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**ब्लू स्टार समोर, साकीनाका,मुंबई- ४०० ०७२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. मनोजकुमार यादव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.११.२.२००८ रोजी अर्ज करुन, चार बंगला म्हाडा अंधेरी (प.) येथील वर्सोवा टेलिफोन एक्सचेंजच्या पाठीमागील संस्था व बंगल्याच्या बांधकामास दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, चार बंगला म्हाडा अंधेरी (प.) येथील वर्सोवा टेलिफोन एक्सचेंजच्या पाठीमागील संस्था व बंगल्याच्या बांधकामास दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्‍चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५१४/०२**

**श्रीमती डी.एम.वारापेन,**
**५, स्कायलार्क अपार्टमेंट,**
**६ डी युनियन पार्क रोड,**
**खार (प.), मुंबई- ४०० ०५२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्रीमती डी.एम.वारापेन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि. २५.२.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.डी-११४३ येथील भाडेकरुंची यादी, फोटोपास आणि घराचे क्षेत्रफळ इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.डी-११४३ येथील

भाडेकरुंची यादी, फोटोपास आणि घराचे क्षेत्रफळ इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे एकच अधिकारी असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत अपिलकारास आवश्यक ती माहिती दिली नाही. सदर अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ३१/१२/२००८.**